CMYK

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. १ डिसेंबर २०२५ | वर्ष – ३ रे | अंक २३५ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### बिबट्याने घेतला चिमुकलीचा जीव

**गोंदिया :** गोंदिया जिल्ह्यात बिबट्याने एका चिमुकलीचा जीव घेतला आहे. वडिलांसोबत शेतात गेलेल्या चिमुकलीवर दबा धरून बसलेल्या बिबट्याने हल्ला केल्याची घटना गोंदियाच्या तिरोडा तालुक्यातील इंदोरा निमगाव येथे घडली. बिबट्याच्या हल्लयात गंभीर जखमी झालेल्या गोंदिया येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान रात्री तिचा मृत्यू झालाय. रुची देवानंद पारधी (वय ९), रा. इंदोरा निमगाव असे मृत बालिकेचे नाव आहे.

### महापरिनिर्वाण दिनानिमित्त रेल्वेच्या विशेष गाड्या

**मुंबई :** मध्यरेल्वेने महापरिनिर्वाण दिनानिमित्त आंबेडकरी अनुयायांसाठी ४ डिसेंबर ते ८ डिसेंबरपर्यंत १५ विशेष अनारक्षित रेल्वेगाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. नागपूर, नाशिक, वर्धा या विविध जिल्ह्यातून रेल्वेगाड्या चालवण्यात येणार आहे. या अनुयायांची गैरसोय होऊ नये, यासाठी रेल्वे १५ विशेष रेल्वेगाड्यांची घोषणा केली आहे.

### गर्भवती विवाहितेची गळफासाने आत्महत्या

**नांदेड :** पहिली मुलगी झाल्याने दुसऱ्यांदा मुलगीच व्हावी यासाठी दिल्या जाणाऱ्या सततच्या त्रासाला कंटाळून एका गर्भवती विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केली. नांदेड शहरातील विठ्ठल नगरमध्ये ही घटना घडली. हिंगोली जिल्ह्यातील रहिवाशी प्रतीक्षा भोसले हिचा २०२३ मध्ये नांदेडमधील लक्ष्मण भोसले याच्याशी विवाह झाला होता. मार्च २०२४ मध्ये प्रतीक्षाला मुलगी झाली. पण मुलगा पाहिजे म्हणून प्रतीक्षाला त्रास देण्यास सुरुवात झाली. स्कुल व्हॅनसाठी माहेरावरून पाच लाख रूपये आणण्यासाठीही सातत्याने त्रास देण्यात आला.

### अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यास अटक

**पुणे :** पुणे शहरात अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या एका रिक्षाचालकाला अंमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली आहे. आरोपीकडून ६ लाख १८ हजार रुपये किमतीचे ३० ग्रॅम मेफेड्रोन आणि वाहतुकीसाठी वापरलेली रिक्षा असा एकूण ७ लाख २८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अदिल करिम बागवान (वय ३५, रा. येवलेवाडी) असं अटक करण्यात आलेल्या आरोपीचं नाव आहे. रिक्षाचालक असलेला बागवान हा अमली पदार्थांची तस्करी करत असल्याची गोपनीय माहिती अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. पोलिसांनी तत्काळ त्या ठिकाणी सापळा रचून त्याला ताब्यात घेतलं.

### ६०० शेतकऱ्यांवर गुन्हा दाखल

**यवतमाळ :** यवतमाळमध्ये ५०० ते ६०० शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. निम्न पैनगंगा प्रकल्पाविरोधात झालेल्या आंदोलनात दगडफेक केल्याप्रकरणी पारवा पोलिसांनी हे गुन्हे दाखल केले आहेत. काल खडका येथे धरण विरोधी संघर्ष समितीने आक्रमक पवित्रा घेत निम्न पैनगंगा प्रकल्पाचं काम थांबवलं होतं. पोलिसांचा बंदोबस्त जुगारुन आंदोलक शेतकऱ्यांनी काम थांबवलं होतं. यावेळी काही आंदोलकांनी आक्रमक होतं दगडफेक केली होती.

# भय्याजी काणे यांनी ईशान्य भारतात उभारलेले कार्य दूरदृष्टीचे उदाहरण : भय्याजी जोशी



**पुणे :** ईशान्य भारतासारख्या प्रतिकूल व आव्हानात्मक वातावरणात केवळ आत्मीयता, जिव्हाळा आणि राष्ट्रीयत्वाच्या भावनेच्या बळावर स्व. भय्याजी काणे यांनी शिक्षणाचे भक्कम कार्य उभे केले, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य सुरेश तथा भय्याजी जोशी यांनी केले. पूर्व विकास प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित भय्याजी काणे जन्मशताब्दी सांगता समारंभात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

बी.एम.सी.सी. महाविद्यालयातील टाटा सभागृहात पार पडलेल्या कार्यक्रमाला क्वीकहिल टेक्नॉलॉजीचे संस्थापक कैलास काटकर, रा.स्व. संघाचे पुणे महानगर संघचालक रवींद्र वांजरवाडकर, प्रतिष्ठानचे अध्यक्ष ड. प्रदीप कदम व कार्यवाह जयवंत कोंडविलकर उपस्थित होते.

भय्याजी जोशी म्हणाले की, राष्ट्रभावनेचा संस्कार शालेय वयात रुजवणे अत्यावश्यक आहे आणि या दृष्टीने भय्याजी काणे यांनी शिक्षण क्षेत्राला मिशन म्हणून स्वीकारले. ईशान्येतील सामाजिक समन्वय, आदिवासी जनजातींमधील ऐक्य व सीमाभागातील एकात्मता ही भारताच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वाची असून या दिशेने प्रतिष्ठानचे कार्य 'मध्यांहकाळात' प्रवेशले असले तरी त्याची गती वाढविण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रमुख पाहुणे कैलास काटकर यांनी भय्याजी काणे यांच्या ईशान्य भारतातील ध्येयदृष्टीनिष्ठ कार्याचे कौतुक करताना, वंचित आदिवासी समाजाच्या जीवनात झालेला सकारात्मक परिवर्तनाचा प्रवास प्रेरणादायी असल्याचे सांगितले. या कार्याला समाजाने व्यापक सहयोग देण्याचे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमात ईशान्य भारतातील प्रतिष्ठानच्या प्रकल्पांचा आढावा घेणारा लघुपट, जन्मशताब्दी वर्षात राबवलेल्या उपक्रमांची माहिती, विद्यार्थिनींचे स्वागतगीत आणि सांस्कृतिक सादरीकरण करण्यात आले. सूत्रसंचालन शिरीष आपटे यांनी तर आभार प्रदर्शन चेतन कुलकर्णी यांनी केले.

# २० नगरपालिकांच्या निवडणुका पुढे ढकलल्या

## प्रभागात कार्यकर्त्यांचा हिरमोड; पुणे, धाराशिव, सोलापूर, चंद्रपूरचा समावेश

**मुंबई :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा (एश्रशल-ींळेप) अखेर बिगुल वाजला असून २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतांच्या निवडणुका संपन्न होत आहेत. त्याच पार्श्र्वभूमीवर प्रचार अंतिम टप्प्यात आला असताना आता काही जिल्ह्यातील नगरपालिकांच्या निवडणुकांना, काही प्रभागातील निवडणुकांना ब्रेक लागला आहे. राज्यातील साधारण २० जिल्ह्यातील काही नगरपालिकांच्या (छसरीरिश्रिळङ्गर) प्रभागात निवडणुका पुढे ढकलण्यात आल्याने कार्यकर्त्यांचा हिरमोड झाला आहे. त्यामध्ये, पुणे (झींपश), सोलापूर, चंद्रपूर, यवतमाळ, अहिल्यानगर, धाराशिव, नांदेड जिल्ह्याचा समावेश आहे. दरम्यान, राज्यात २ डिसेंबर रोजी नगरपालिका निवडणुकांसाठी मतदान होत असून ३ डिसेंबर रोजी निकाल जाहीर होणार आहे.




निवडणुकांच्या प्रचारतोफा अंतिम टप्प्यात आल्या असताच काही नगरपालिकांतील विविध प्रभागांच्या निवडणुका पुढे ढकलल्या आहेत. त्यामध्ये, सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा नगरपालिका आणि नगरसेवकपदाची निवडणूक लांबणीवर पडली असून आता २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यासाठीचा, सुधारित कार्यक्रम जाहीर करण्यात आलाय. यापूर्वी न्यायालयीन प्रक्रियेत मंगळवेढा नगरपालिकेची निवडणूक अडकली होती. नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांबाबत असणाऱ्या न्यायालयीन केसेसचे आदेश २७ नोव्हेंबरला आल्याने मंगळवेढा नगरपालिका निवडणुकीला निवडणूक आयोगाने स्थगिती दिलेली होती. आता मंगळवेढा नगरपालिका निवडणुकीचा सुधारित कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

### निवडणूक पुढे का ढकलली?

निवडणूक आयोगाने म्हटले की, ४ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्यातील २४६ नगरपरिषद व ४२ नगरपंचायतींसाठी कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. मात्र, नामनिर्देशनपत्रांची छाननी झाल्यानंतर दाखल झालेल्या अपीलांचे निकाल २२ नोव्हेंबरनंतर लागू लागले. यामुळे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी नियमांनुसार उमेदवारांना नामनिर्देशनपत्र मागे घेण्यासाठी आवश्यक असलेले तीन दिवसांचा अवधी न देता थेट मतदान चिन्हे वाटप केली. महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ मधील १७ (१) (ब) या तरतुदींनुसार ही कार्यवाही नियमबाह्य असल्याचे आयोगाने नमूद केले.



# एकाच कुटुंबातील चौघांची आत्महत्या

**नाशिक :** नाशिक जिल्ह्याच्या देवळा तालुक्यातील फुले माळीवाडा येथे आज सकाळी उघडकीस आलेल्या एका धक्कादायक घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. एकाच कुटुंबातील चार जणांचे मृतदेह घरात आढळून आले असून, मृतांमध्ये पती, पत्नी आणि त्यांच्या दोन्ही अल्पवयीन मुलांचा समावेश आहे. या घटनेमागील कारण अद्याप अस्पष्ट असून, प्राथमिक पाहण्यात ही घटना आत्महत्येची असल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. मृतांमध्ये गोविंद बाळू शेवाळे (४०), त्यांची पत्नी कोमल गोविंद शेवाळे (३५), मुलगी खुशी गोविंद शेवाळे (८) आणि दीड-दोन वर्षांचा मुलगा श्याम गोविंद शेवाळे यांचा समावेश आहे.

**देवळा तालुक्यातील फुले माळीवाडा येथील हृदयद्रावक घटना**

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोविंद बाळू शेवाळे याने स्वतः दोरीने फाशी घेऊन आत्महत्या केली असल्याचे दिसून येत आहे. तर पत्नी, एक मुलगी, एक मुलगा यांचा मृतदेह झोपलेल्या अवस्थेत असल्याचे आढळून आले आहे. मात्र एकाच कुटुंबातील चार मृतदेह आढळल्याने नाशिकमध्ये खळबळ उडाली आहे.

घटनेची माहिती मिळताच देवळा पोलीस पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांच्यासोबत पोलीस कॉन्स्टेबल हे घटनास्थळी उपस्थित असून अधिक तपासासाठी नाशिक विभागीय फॉरेन्सिक टीम उपस्थित झाले आहेत. पोलिसांकडून पंचनामा करण्यात आला आहे. पोलिसांनी मृतदेह पोस्टमार्टमसाठी सरकारी रूग्णालयात पाठवले आहेत. कुटुंबाने असा टोकाचा निर्णय का घेतला? याबाबत अद्याप कारण समोर आलेले नाही. या प्रकरणाचा तपास करण्यात येत आहे. मात्र, फुले माळवाडी परिसरात घडलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे गावातील वातावरण शोकाकुल झाले आहे. आता या प्रकरणात नेमके काय समोर येणार हे पाहणे महत्त्वाचे आहे.

# आमच्याकडे नीती, नियत अन् निधीही; मुख्यमंत्री

**चंद्रपूर :** आम्ही प्रचारसभेत विरोधकांवर टीका करत नाही. त्यांची उणीदुणी काढत नाही, त्यांचा कमकुवतपणा दाखवित नाही. आम्ही विकासाचे 'मॉडेल' घेऊन आलो आहोत. आमच्याकडे नीती, नियत आणि निधीदेखील आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

फडणवीस म्हणाले, छोट्या शहरांमध्ये निधी देऊन त्यांचा चेहरा बदलू शकतो. शहरांमध्ये संधी असल्यामुळे गावातील लोक शहराकडे जातात. पण, नियोजन नसल्यामुळे शहरांची अवस्था बिकट झाली. २०१४नंतर पंतप्रधान मोदींनी पहिल्यांदा देशातल्या शहरांसाठी विविध योजना सुरू केल्या. त्या योजनांच्या माध्यमातून लाखो कोटी रुपये शहरांच्या विकासासाठी दिले. शहरातील घरांचे पट्टे आम्ही देणार आहोत, म्हणजे त्यांचा विकास करता येईल, असा विश्वासही



फडणवीस यांनी व्यक्त केला.

लॉयड मेटल्सनंतर टाटा स्टील आणि जेएसडब्ल्यू प्रकल्पदेखील गडचिरोलीत आले आहेत. येत्या काळात ही गुंतवणूक केवळ गडचिरोली पुरती मर्यादित राहणार नाही. ती भंडारा, गोंदिया आणि चंद्रपूरपर्यंत विस्तारेल. पवनी आणि साकोलीमध्ये विकासकामे केली जाणार आहेत, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. भंडाऱ्यातील सभेत बोलताना त्यांनी विकासाचे चित्र मांडले.

व्यासपीठावर आमदार परिणय फुके, भाजपचे जिल्हाध्यक्ष आशू गोंडाणे, माजी खासदार सुनील मेंढे उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले, भाजप सरकार सत्तेत आल्यानंतर लाडकी बहीण योजना बंद होणार, असा दावा करून विरोधकांनी चुकीची माहिती पसरवली. जोपर्यंत मी मुख्यमंत्री आहे तोपर्यंत ही योजना बंद केली जाणार नाही. लाडक्या बहिनींना लखपती दीदींमध्ये रूपांतरित केले जाईल. गेल्या दीड वर्षांत ५० लाख बहिणींना लखपती दीदींमध्ये रूपांतरित केले आहे. लाडक्या बहिणींना मुख्य प्रवाहात आणले जाईल, असे ते म्हणाले.

## रोहिणी खडसेंच्या कार्यक्रमात हाणामारी

**जालना :** जालन्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रोहिणी खडसे यांनी एक प्रचारसभा घेतली. या सभेत महिलांची तुंबळ हाणामारी झाली. अंबडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रचारसभेत महिलांची हाणामारी झाली. श्रद्धा चांगले यांच्यासाठी रोहिणी खडसेंनी घेतलेल्या प्रचारसभेत हाणामारी झाली. ही हाणामारी क्षुल्लक कारणावरुन झाल्याचे समजते. कुठल्याश्या मुद्यावरुन महिलांमध्ये शाब्दिक वाद झाला. थोड्याच वेळात महिलांनी एकमेकींना धक्काबुक्की करत हाणामारी सुरू केली.

# तीन साखर कारखाने ठप्प; गुळ निर्मिती युनिटही पडले बंद

**बीड :** बीड जिल्ह्यात ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आंदोलनाने निर्णायक वळण घेतलं असून परिस्थिती आणखी चिघळली आहे. भाववाढीच्या मागणीसाठी गेल्या महिनाभरापासून सुरु असलेल्या आंदोलनाने आता तीव्र स्वरूप धारण केलं आहे. शेतकऱ्यांनी कोयता बंद, वाहतूक बंद, कारखाना बंद अशी घोषणा देत ऊस तोडणी आणि वाहतूक पूर्णपणे रोखून धरली आहे.

भाववाढीच्या मागणीसाठी शेतकरी आक्रमक झाले आहेत. शेतकऱ्यांच्या प्रमुख मागणीमध्ये पहिली उचल ३ हजार रुपये, तर अंतिम दर ४ हजार रुपये प्रति टन करावा अशी आहे. या मागणीसाठी अनेक बैठका झाल्या, आंदोलने झाली, पण तोडगा न निघाल्याने शेतकऱ्यांचा संताप उसळला आहे. त्याआधी शेतकऱ्यांनी गावागावात आंदोलन छेडले.

टायर पेटवून रास्ता रोको केला आणि दोन वेळा माजलगाव येथे राष्ट्रीय महामार्ग रोखून धरला. कारखानदार आणि शेतकरी प्रतिनिधींमध्ये झालेली बैठक निष्फळ ठरल्याने संघर्ष आणखी तीव्र झाला आहे.

सध्या बीड जिल्ह्यातील तीन मोठे साखर कारखाने आणि तीन गुळ निर्मिती युनिट बंद पडली आहेत. यात आमदार प्रकाश सोळंके यांच्या सुंदरराव सोळंके कारखान्याचा, मोहन जगताप यांच्या छत्रपती सहकारी साखर कारखान्याचा आणि जय महेश खासगी साखर कारखान्याचा समावेश आहे. तसेच तीन मोठ्या गुळ कारखान्यांसह लहान उद्योगही ठप्प झाले आहेत.



प्रतिकात्मक फोटो



# काहीजण मला संपवायच्या मागे लागलेत : मुंडे

**बीड :** नगरपरिषद निवडणूक आपल्यासाठी महत्त्वाची आहे. आता फक्त माझं राजकारणच नाही तर मलाच संपायच्या मागे लागले आहेत. पण, अशा वेळेला तुम्ही माझ्यासोबत राहणार की माझी साथ सोडणार? ज्या लोकांनी परळीला बदनाम केले त्या लोकांना उत्तर देण्यासाठी ही निवडणूक आहे. तुमच्या प्रत्येक अडचणी ही माझी अडचण म्हणून मी सोडवली आहे. कोणतीही गडबड करू नका, अशी आर्त साद माजी मंत्री आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार धनंजय मुंडे यांनी परळीकरांना घातली आहे. परळी नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बरकतनगर भागात झालेल्या प्रचार सभेतून ते बोलत होते.

धनंजय मुंडे म्हणाले की, विधानसभा निवडणुकीच्या वेळेला जे वातावरण होतं, तेच वातावरण आता नगरपरिषद निवडणुकीच्या वेळेला आहे. आज तुम्ही माझ्यासाठी शेअर म्हणाले म्हणून मी माझ्या भाषणात शेर म्हणणार नाही. मी माझी जबाबदारी या ठिकाणी नेहमीच बजावली आहे. नगरपरिषदेकडून मला आयटीआय सुरू करायचं आहे. यामुळे रोजगाराला मदत होईल. इथले अतिक्रमण नियमित करून घरकुल देण्याचे काम आपण केले आहे. धनंजय मुंडे नेहमीच तुमच्या कामाला आला आहे. तुम्ही माझ्या दरवाजात काम घेऊन आलात आणि तुम्ही रिकाम्या हाताने परत गेला, असं कधीच झालं नाही. आपले मत वाया जाऊ देऊ नका. नगरपरिषद निवडणूक आपल्यासाठी महत्त्वाची आहे, असे त्यांनी म्हटले.

धनंजय मुंडे पुढे म्हणाले की, आता फक्त माझं राजकारणच नाही तर मलाच संपायच्या मागे लागले आहेत. पण, अशा वेळेला तुम्ही माझ्यासोबत राहणार की माझी साथ सोडणार? ज्या लोकांनी परळीला बदनाम केले त्या लोकांना उत्तर देण्यासाठी ही निवडणूक आहे. मी तुमचे प्रत्येक कर्तव्य पूर्ण केलं आहे, त्याला संपवण्याचा प्रयत्न केला जात आहे. मी काम करण्याच्या लायक राहिलो नाही तुमचे काम कोण करणार? तुमच्या प्रत्येक अडचणी ही माझी अडचण म्हणून मी सोडवली आहे. कोणतीही गडबड करू नका, असे म्हणत त्यांनी हात जोडून उपस्थितांना विनंती केली. हे सगळे निवडून आले तर माझी ताकद वाढेल. तुमच्या मनात माझ्याबद्दल असलेले प्रेम माझी ताकद आहे. तुम्ही मला प्रत्येक वेळेला अडचणीत साथ दिली याचे उपकार मी विसरू शकत नाही. मी माझ्या कातड्याचे जोडे जरी तुम्हाला घातले तरी मी तुमचे उपकार फेडू शकत नाही. राष्ट्रवादी काँग्रेसकडे अल्पसंख्यांक मंत्रालय आहे. याचा आपल्याला विकासासाठी फायदा होईल. लोकसभेला इथून ताईला किती मतं मिळाले याच्याबद्दल मी काही बोलणार नाही. रेल्वेमध्ये मी इथली जागा जाऊ दिली नाही, असे देखील धनंजय मुंडे यांनी म्हटले.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जिल्ह्यात ओसरलेला थंडीचा कडाका पुन्हा परतला !

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० नोव्हेंबर :** मागच्या काही दिवसापूर्वी लातूर जिल्ह्यातून ओसरलेला थंडीचा कडाका आता पुन्हा परतला आहे. अचानक वाढलेल्या या थंडीने नागरिक चांगलेच गारठून जाताना दिसत आ-हेत. मध्यंतरी चक्रीवादळाच्या परिणामामुळे जिल्ह्यात सुरु झालेली थंडी अचानक ओसर-ली होती.अपेक्षेप्रमाणे वातावरणात झालेला हा बदल काही दिवसांचाच ठरला. मागच्या काही दिवसात जिल्ह्याच्या अनेक भागात थंडी कमी झाली होती. मात्र यावर्षी पावसाळ्यात चांगला पाऊस झाल्याने जिल्हाभरात हा हिवाळा चांगलाच जाणवणार असल्याचे संकेत मिळाले होते. त्यानुसार नागरिकांनी अगोदरपासून थंडीपासून बचाव करण्यासाठी स्वेटर्स, गरम कपड्यांची खरेदी करून ठेवली असल्याचे पाहावयास मिळाले. काही दिवसांच्या चढ – उतारानंतर आता किमान डिसेंबर जानेवारी असे दोन महिने तरी कडाक्याची थंडी पडणार असल्याचा अंदाज हवामान तज्ज्ञांकडून व्यक्त केला जात आहे. जिल्ह्याच्या अनेक भागात यावर्षी अगदी हुडहुडी भरणारीथंडी जाणवणार असल्याचेही हवामान तज्ञांचे मत आहे. त्यामुळे लातूर जिल्ह्याला यावर्षी प्रदीर्घ कालखंडानंतर हुडहुडी भरवणाऱ्या थंडीचा सामना करावा लागणार आहे.



# लातूर पोलीस दलाचा व्यापक रुटमार्च

## ४५ पोलीस अधिकाऱ्यांसह ५०० हून अधिक पोलीस कर्मचारी–होमगार्ड सक्रिय

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० नोव्हेंबर :** लातूर जिल्ह्यातील चार पोलीस ठाण्यांच्या हद्दीत स्थानिक स्वराज्य संस्थांतर्गत होणाऱ्या नगर परिषद व नगर पंचायत निवडणूक मतदानाच्या पार्श्र्वभूमीवर रविवारी रुट मार्च काढण्यात आला. या निवडणूक प्रक्रियेसाठी ४५ पोलीस अधिकारी, राज्य राखीव दलाच्या सहा तुकड्या होमगार्डसह एकूण ५०० पो-लीस कर्मचारी–होमगार्डच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पो-लीस प्रशासनाने हा रुटमार्च केला.







जिल्हाभरात मतदान प्रक्रिया शांततेत, सुरक्षिततेत आणि निष्पक्ष वा-तावरणात पार पडावी, तसेच कोणतीही अनुचित प्रकार अथवा कायदा व व्यवस्था धोक्यात आणणारी परिस्थिती उद्भवू नये म्हणून जिल्हाभरात रूट मार्च, बंदोबस्त, निगराणी व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. लातूर जिल्ह्यात उदगीर, अहमदपूर, औसा आणि निलंगा पोलीस ठाण्यांमध्ये एकाचवेळी प्रभावी रूट मार्च काढण्यात आला. गुन्हेगार, समाजकंटक, गोंधळ निर्माण करणारे घटक व बेकायदेशीर कृत्यांवर अंकुश आणून नागरिकांमध्ये सुरक्षिततेचा भाव निर्माण करून कायदा व सुव्यवस्था धोक्यात आणू शकणाऱ्या शक्यतांना आधीच नियंत्रणात आणणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

सदरच्या रूट मार्चमध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलिस ठाणे प्रभारी अधिकारी, पोलीस कर्मचारी,होमगार्ड,दंगा नियंत्रण पथक, शीघ्र कृती दलाचे जवान, राज्य राखीव दलाचे जवान यांनी सहभागी होऊन विविध संवेदनशील भागातून हा मार्च काढला. सदर निवडणूक प्रक्रिया ला-तूर जिल्ह्यातील प्रत्येक मतदान केंद्रे (बूथ) चे वर्गीकरण करून वर्गवारीनुसार अतिरिक्त बंदोबस्त व विशेष गस्त ठेवण्यात आली आहे.निवडणूक बंदोबस्त करिता २५ पोलीस निरीक्षक सहाय्यक पोलीस निरीक्षक दर्जाचे २७ पोलीस अधिकारी, पाच पोलीस उप-ाधीक्षक, ५५० पोलिस अंमलदार, ४२५ होमगार्ड, राज्य राखीव दलाच्या सहा तुकड्यांचा समावेश आहे.

महिला पोलिसांचा स्वतंत्र ताफा महिलांच्या सुरक्षेसाठी तैनात करण्यात आला आहे. ०५ उपविभागीय पोलीस अधिकारी स्वतः फील्डवर उतरून सतत पेट्रोलिंगवर असणार असून विशेष गस्त पथके निवडणूक काळात दिवसरात्र कार्यरत राहणार आहेत. ज्या ठिकाणी पूर्वी तणावजन्य घटना घडल्या आहेत किंवा मतदारसंघात स्पर्धा अधिक तीव्र आहे, त्या भागात अतिरिक्त पोलीस तैनात केले आहेत.

**समाज माध्यमावर करडी नजर**

निवडणूक काळात खोटी माहिती, धार्मिक किंवा जातीय भावना भडकवणारे संदेश, एडिटेड व्हिडिओ/पोस्ट, बॅनर किंवा फेक न्यूज पसरल्यास त्यावर कडक कारवाई करण्यात येणार आहे. पोलीस प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, संशयास्पद पोस्ट/मेसेज त्वरित पोलिसांना कळवा. आचारसंहितेचा भंग करणारी सामग्री शेअर करू नये.

तणाव वाढविणारे फेक मेसेज, व्हिडिओ, कटिंग्स याबाबत सतर्क रा-हावे. कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकारात गुंतल्यास कठोर कायदेशीर कारवाई होणार आहे. सायबर शाखा, विशेष देखरेख पथक आणि नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत आहेत.

जामिनावर असलेले गुन्हेगार, गुनाहगार प्रवृत्तीचे व्यक्ती, बदमाशांवर विशेष नजर असून हद्दपारी प्रस्ताव, प्रतिबंधक कलमे, तडीपारी, शस्त्र जप्ती आदी उपाययोजना दारूबंदी व मटका, सट्टा यावर विशेष छापे, मतदान केंद्र परिसरात परिघ नियंत्रण, वाहन तप-ासणी नाके–महत्त्वाच्या मुख्य रस्त्यांवर कडक तपासणी करण्यात येत असून मोजणी केंद्रांवर स्वतंत्र पोलिस बंदोबस्त तयार करण्यात आलेला आहे. एकंदरीत लातूर जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुका निर्विघ्न, निष्पक्ष आणि सुरळीत पार पाडण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण लातूर पोलीस दल पूर्ण क्षमतेने तैनात असून मतदान व मतमोजणी या दोन्ही प्रक्रिया सुरक्षिततेत पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासन कटिबद्ध असल्याचे सांगण्यात आले.

# एमईएच्या वतीने व्यावसायिक, उद्योजकांचा आज मेळावा

## ■ विविध मान्यवरांची उपस्थिती : व्यवसाय वाढीसंदर्भात होणार मार्गदर्शन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० नोव्हेंबर :** मराठा समाजातील व्यावसायिक व उद्योजकांच्या हितासाठी काम करणाजया मराठा इंटरप्रिनियर्स असोसिएशनच्या वतीने लातूर जिल्ह्यातील व्यावसायिक व उद्योजकांचा मेळावा आज दि. १ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात व्यवसाय व उद्योग विस्ताराच्या संधीवर मार्गदर्शन होणार असून या मेळाव्यासाठी विविध मान्यवरांची उपस्थितीत राहणार आहे. या मेळाव्यास जिल्ह्यातील मराठा समाजातील व्यावसायिक व उद्योजकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन एमईएच्या वतीने करण्यात आले आहे.

भारतात व्यवसाय व उद्योगाच्या विविध संधी समोर येत आहेत. जगा-तील सर्वात मोठी अर्थव्यवस्था होण्याच्या दृष्टीने भारताची वाटचालसुरु असून यामध्ये व्यावसायिक व उद्योजकांचा मोठा हातभार आहे. त्यामुळेच मराठा समाजातील व्यावसायिक व उद्योजकांच्या हितासाठी महाराष्ट्रात मराठा इंटरप्रिनियर्स असोसिएशन दहा वर्ष पासून कार्यरत आहे. या असोसिएशनच्या माध्यमातून राज्यभरातील मराठा समाजातील व्यावसायिक व उद्योजकांना मार्गदर्शन करण्यात येते. याचाच एक भाग म्हणून लातूर येथे आज दि. १ डिसेंबर रोजी लातूर जिल्ह्यातील मराठा समाजातील व्यावसायिक व उद्योजकांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्यासाठी माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, माजी मंत्री आ. अमित देशमुख, आ. विक्रम काळे, आ. अभिमन्यू पवार, माजी आ. धिरज देशमुख यांच्यासह नॅचरल शुगरचे चेअरमन बी.व्ही. ठोंबरे व प्रसिध्द वास्तू विशारद गोपाळ शिंदे यांची उपस्थिती राहणार आहे. हा मेळावा औसा रोडवरील छत्रपती चौक, वाडा हॉटेल येथे दुपारी २ ते ५ या वेळेत पार पडणार आहे.

या मेळाव्यात व्यावसायिक व उद्योजकांना विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन होणार असून आपला व्यवसाय व उद्योग वाढविण्यासाठी वेगवेगळ्या संधीबाबत विस्तृत चर्चा होणार आहे. या मेळाव्यास जिल्ह्यातील व्यावसायिक व उद्योजकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन एमईएचे अध्यक्ष विक्रम गायकवाड, संजय शिंदे, विक्रम नरसाळे, सिद्राम साठे यांनी केले आहे.

## जि.प. अतिरिक्त शिक्षकांच्या संयोजनाची प्रक्रिया सुरू

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० नोव्हेंबर :** लातूर जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त शिक्षकांच्या संयोजनाची प्रक्रिया सुरु झाली असून दि. २ व दि. ४ डिसेंबर २०२५ रोजी तालुका आणि जिल्हा स्तरावर समायोजन केले जाणार आहे. यामधून अपंग शिक्षकांना सूट देण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषद प्रशासनाच्या वती-ने देण्यात आली आहे.जिल्हा परिषद शाळांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांपैकी २०२४ –२५ च्या संचमान्यतेमुळे अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन कारण्यासंबहद्दीची प्रक्रिया दि. २९ नोव्हेंबरपासून सुरु झाली आहे.

मंगळवार, दि. २ डिसेंबर रोजी तालुकास्तरावर तर दि. ४ डिसेंबर रोजी जिल्हा स्तरावर ही प्रक्रिया राबवली जाणार आहे. प्रतिवर्षी सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांच्या संख्येअभावी अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन करण्याबाबात शासनाने निर्देश आहेत. त्या अनुषंगाने २०२४ –२५ च्या संचमान्यतेप्रमाणे विद्यार्थ्यांची पटसंख्या निश्र्चित झाली असल्याने आपआपल्या तालुक्यातील अतिरकीत ठरत असलेल्या शिक्षकांचे समायोजन केले जात आहे.

तालुक्यातील अतिरिक्त शिक्षकांची यादी प्रसिद्ध झाली असून सोमवार, दि. १ डिसेंबर रोजी अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांकडून आक्षेप मागविले जाणार आ-हेत. अतिरिक्त झालेल्या शिक्षकांचे तालुकास्तरावर दि. २ डिसेंबरला समायोजन केले जाणार आहे. तालुकास्तरावर समायोजन प्रक्रिया पार पडल्यानंतर तालुक्यात पद शिल्लक नसल्याने अतिरिक्त शिक्षकांची यादी मंगळवारीच प्राथमिक शिक्षण विभागाकडे सादर करण्यात येणार आहे. अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे आता आपल्याला कोणत्या जागेवर कार्यान्वित होण्याचे आदेश दिले जातात याकडे लक्ष लागून राहिल्याचे निदर्शनास येत आहे.

## जुन्या पेन्शन योजनेच्या मागणीसाठी शिक्षक संघाचे धरणे आंदोलन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० नोव्हेंबर :** शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी व टीईटी अनिवार्यतेसंबंधी झा-लेले नवीन संशोधन रद्द करून शिक्षण अधिकार कायदा लागू होण्यापूर्वीच्या शिक्षकांना सेवेत संरक्षण देण्यात यावे, या मागणीसाठी शिक्षकांनी नुकतेच नवी दिल्लीतील जंतरमंतर याठिकाणी धरणे आंदोलन केले.

सर्वोच्च न्यायालयाने दि. १ सप्टेंबर रोजी शिक्षकांच्या पात्रतेविषयी दिलेल्या निकालात २ वर्षात ज्या शिक्षकांची सेवा पाच वर्षापेक्षा अधिक शिल्लक आहे, त्यांच्यासाठी टीईटी अनिवार्य केली आहे. यावर शिक्षक संघाच्यावतीने केंद्राने यात हस्तक्षेप करून शिक्षकांच्या सेवेचे संरक्षण केले जावे, सेवाशर्तींच्या आधारे झालेल्या निवडी कायम ठेवण्यात याव्यात अशी मागणी लावून धरली आहे. अन्य कोणत्याही कर्मचाऱ्यांना नियुक्तीनंतर पात्रता परीक्षा लागू नाही. मग ती केवळ शिक्षणाचं का? असा सवालही शिक्षक संघाने उपस्थित केला आहे. यावेळी शिक्षक संघाचे प्रदेश उपाध्यक्ष परमेश्वर बालकुंदे, विभागीय अध्यक्ष सुनील हाके, सुनील बिराजदार, गोविंद कांदे, अनिल हुलगे, बंकट जाधव, रंगनाथ सगर, बालाजी बिडवे, भाग्यश्री चव्हाण, विजयकुमार चव्हाण, नागेश लोहार, विलास मेहत्रे, संगमेश्वर शिवणे, पांडुरंग येलमटे माधव अंकुशने, रवी भोसले यांसह अनेकांची उपस्थित होती.

# विजेच्या लपंडावाने बाभळगाव परिसरातील नागरिक वैतागले

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० नोव्हेंबर :** लातूर शहरापासून जवळच असलेल्या बाभळगाव परिसरातील नागरिक मागच्या काही दिवसात सततच्या विजेच्या लपंडावाने अक्षरशः वैतागून गेले आहेत. महावितरणच्या कार्यालयात याची तक्रार करायला गेल्यावरही तेथे कोणीही भेटत नसल्याची तक्रार नागरिकांनी माजी मंत्री आ. अमित देशमुख यांच्याकडे केली आहे.

बाभळगाव येथील ३३ केव्ही उपकेंद्रांतर्गत बाभळगाव, सारोळा, सोनावती, धनेगाव, शिवणी, सेलू, सिरसी, कटापुर व शिकणादर आदी गावांना वीज पुरवठा केला जातो. मात्र मागच्या काही दिवसांपासून या गावचे नागरिक सततच्या वीज जाण्याने अक्षरशः त्रस्त झाले आ-हेत. कधी वीज जाईल किंवा गे-लेली वीज कधी परत येईल याची शाश्वती नसल्याने नागरिकांची ससेहोलपट होत आहे. तासन-तास वीज गुल असल्याने प्रत्येक व्यावसायिकही महावितरणच्या कार्यपद्धतीला कमालीचा वैतागला असल्याचे दिसून येत आहे.

ग्रामीण भागात सतत विजेच्या लपंडावाने शेतकऱ्यांनाही पिकांना पाणी देण्यासाठी देवाप्रमाणे लाईटची वाट बघत बसावे लागत आहे. लाईटची वाट पाहण्यात वेळ जाण्याने शेतकऱ्यांना त्यांच्या अन्य कामांकडे लक्ष देणे कठीण होत आहे. सततच्या वीज जाण्याने त्रस्त झालेल्या नागरिकांनी महावितरणच्या कार्यालयात संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्याबाबतची समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला. परंतु अगदी दुपारच्या वेळीही महावितरणच्या कार्यालयात एकही जबाबदार



अधिकारी अथवा कर्मचारी भेटत नसल्याच्या तक्रारी आहेत. महावितरणच्या अधिकाऱ्यांच्या या मनमानी कारभाराची तक्रार नागरिकांनी आ. अमित देशमुख यांच्याकडेही एका निवेदनाव्दारे केली आहे.

# लातूर जिल्हा इंजिनियर असोसिएशनची कार्यकारिणी जाहीर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० नोव्हेंबर :** लातूर जिल्हा इंजिनियर असोसिएशन (एसीईए) ची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून नव्या पदाधिकाऱ्यांनी शहराच्या विकासात अभियंत्यांची भूमिका अधिक प्रभावीपणे बजावण्याचे आश्वासन दिले आहे. अभियंता म्हणून समाजाशी, नागरिकांशी आणि स्थानिक प्रशासनाशी सुसंवाद ठेवत दर्जेदार व पारदर्शक कामे करण्याची बांधिलकी नव्या कार्यकारिणीने व्यक्त केली.

असोसिएशनच्या बैठकीत सर्वानुमते कार्यकारिणीची रचना करण्यात आली. नव्या कार्यकारिणीत अध्यक्ष मनोज देशमुख, उपाध्यक्ष संतोष नाशिककर, सचिव वसीम शेख, सहसचिव अरुण पंचगल्ले, कोषाध्यक्ष अमोल सेलूकर, सहकोषाध्यक्ष ऋषिकेश निगडीकर यांच्यासह रिझवान गडीवाले, संदीप उच्चेकर, सिद्धलिंग सोरडे, विठ्ठल भोस-



ले, दिनेश सरवडीकर यांची कार्यकारिणी विशेष सदस्य म्हणून निवड करण्यात आली. नवीन टीममध्ये अनुभवी तसेच तरुण अभियंत्यांचा समतोल साधण्यात आला असून अभियांत्रिकी क्षेत्रातील विविध शाखांचे प्रतिनिधित्व सुनिश्चित केले आहे.

निवडीनंतर बोलताना नूतन पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, ला-तूर शहराच्या विकासाचा पाया मजबूत करण्यासाठी अभियंत्यांची जबाबदारी महत्त्वाची आहे. शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, बांधकाम गुणवत्ता, सार्वजनिक प्रकल्प, तांत्रिक सल्ला, आपत्ती व्यवस्थापन, सुरक्षा नियमांचे पालन अशा अनेक क्षेत्रांमध्ये अभियंते थेट भूमिका बजावतात. त्यामुळे नागरिकांसाठी सर्वो त्तम अभियांत्रिकी सेवा उपलब्ध व्हाव्यात, ही आमची प्राथमिकता असेल.

### नागरिकांसाठी उत्तरदायी अभियांत्रिकी सेवांचे आश्वासन

यावेळी पदाधिकाऱ्यांनी शहरा-तील वाढत्या नागरी मागण्यांचा अभ्यास, तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि टिकाऊ प्रकल्पांना प्राधान्य, नागरिकांसाठी अभियांत्रिकी मार्गदर्शन केंद्र उभारण्याचा विचार, तरुण अभियंत्यांसाठी कौशल्यवर्धन कार्यशाळा, मानक दर्जानुसार कामांची पडताळणी आणि जनजागृती, पर्यावरणपूरक बांधकामांसाठी प्रोत्साहन याबाबत काम करण्यासंदर्भात बैठकीत चर्चा केली.

अभियंता असोसिएशन ही केवळ तांत्रिक संस्था नसून सामाजिक जबाबदारी पार पाडणारा घटक होत आहे, असेही पदाधिकाऱ्यांनी नमूद केले. लातूरमध्ये दर्जेदार व सुरक्षित पायाभूत सुविधा उभारण्याच्या उद्दिष्टाने नवी कार्यकारिणी सज्ज झाली असून आगामी काळात नागरिक–अभियंता संवाद वाढवण्यावर भर देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

एसीईएची नवी टीम कार्यरत होताच शहराच्या तांत्रिक विकासाला नवी गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## लातुरात पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० नोव्हेंबर :** लातूर येथील व्हीएस पँथर्स युवा संघटनेच्या वतीने टिपू सुलतान जयंती सप्ताहानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण सोहळा नुकताच संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्हीएस पँथर्सचे जिल्हा कार्याध्यक्ष अकबर शेख हे होते. या सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून संघटनेचे संपर्क प्रमुख आनंद जाधव, देवा गायकवाड, विलास कसबे, स्वप्नील कांबळे, गौस शेख, युनूस शेख आदी मान्यवरांची उपस्थिती होती. व्हीएस पँथर्सचे संस्थापक अध्यक्ष युवा नेते विनोद खटके, प्रदेशाध्यक्ष सचिन मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात टिपू सुलतान जयंती सप्ताह साजरा करण्यात आला. त्यानिमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला, विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. चित्रकला स्पर्धेत सदाफ युनूस सय्यद याने २१०० रुपयांचे प्रथम पारितोषिक पटकावले. द्वितीय पारितोषिकविराजविशाल गव्हाणे याने-तर तृतीय पारितोषिक शाफाही फर्जंद शेख याने पटकावले. वक्तृत्व स्पर्धेत साकिफ शफिक शेख याने प्रथम, ज्ञानेश्वरी भगवान जामगे हिने पटकावले. आर्वी देविदास राठोड, लक्ष्मी राजू कांबळे, महेश भैया, मोहम्मद शेख, अक्रम कुरेशी, फातिमा शेख, सदाफ सय्यद, सृष्टी जगताप यांनाही उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### गंगापूर प्रभाग सहा ब, प्रभाग चार ब मधील निवडणूक स्थगित

**गंगापूर :** गंगापूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या प्रभाग क्रमांक सहा मधील ब आणि प्रभाग क्रमांक चार मधील क्रमांक ब या दोन निवडणूक स्थगित करण्यात आलेली आहे. मा. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार प्रभाग क्र. ६ मधील जागा क्रमांक 'ब' तसेच प्रभाग क्र. ४ मधील जागा क्रमांक 'ब' येथील निवडणूक स्थगित करण्यात आलेली आहे. त्यामुळे दिनांक २ डिसेंबर रोजी प्रभाग क्र. ६ मध्ये अध्यक्ष पद व जागा क्रमांक 'अ' साठी मतदान होईल. प्रभाग क्र. ४ मध्ये अध्यक्ष पद व जागा क्रमांक 'अ' साठी मतदान होईल.म्हणूनच प्रभाग क्र. ६ आणि प्रभाग क्र. ४ मधील प्रत्येक मतदाराने दोन मते देणे अपेक्षित आहे १. एक मत – अध्यक्ष पदासाठी २. दुसरे मत – जागा क्रमांक 'अ' साठी या अनुषंगाने, प्रभाग क्र. ६ आणि प्रभाग क्र. ४ मधील मतदान यंत्रे दिनांक ३० नोव्हेंबर २०२५ रोजी पुनःतयार करून सील करण्यात आली आहेत. अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी नवनाथ वगवाड, सहाय्यक निवडणूक अधिकारी संतोष आगळे यांनी माहिती दिली आहे.

### शेतात तुरीला ड्रोनद्वारे फवारणी

**सोयगाव, दि.३० नोव्हेंबर :** उत्पादन खर्च व ऊत्पन्न याचा ताळामेळ बसत नाही. परीनामी पिकावर रोगराई येऊन ऊत्पन्न घटते. आतंरपीकात फवारणी करताना किटकनाशकचा धोका मजूराला होऊ शकतो म्हणून ड्रोन फवारणी फायदयाची आहे.शेती क्षेत्रात नवनविन प्रयोग करणारे कृषीभूषण, शेतकरी अनेक शेती विषयी पुरस्कार प्राप्त शेतकरी अरूण सोहणी यांना सिताफळात घेतलेल्या आंतरपीक तुरीला ड्रोन व्दारे फवारीणी केली. तसेच ईतर शेतकरी सुध्दा त्याचा प्रयोग बघत फवारणी साडी ड्रोन ची निवड करत आहे.

### छ. संभाजीनगर–जळगाव महामार्गावर अपघात

**फर्दापूर :** छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर हॉटेल गजल समोर दोन मोटरसायकल यांच्या मध्ये अपघात यामध्ये दोन्ही मोटरसायकल एकाच दिशेने जात असताना गजल हॉटेल च्या वळणावर हा अपघात झाला. यातील मोटरसायकल क्रमांक एम एच ऐ व्हि ७८५६ यावर विजय बारी वय ४८ रा शिरसोली जिल्हा जळगाव व आशाबाई बारी वय ३५ तर दुसरी मोटरसायकल क्रमांक एम एच १८सी जी ६५४३ यावरील विशाल पावारा वय १८ तुळशीराम सोळंके, रा शिरपूर जिल्हा धूळे यांनी वळणावर ओव्हरटेक करण्याच्या नादात बारी यांच्या गाडीला धडक दिली. असल्याने बारी यांचा पाय फ्रॅक्चर झाल्याने जळगाव येथे हलवण्यात आले तरी दुसरे मोटरसायकल चालक यांना अजिंठा ग्रामीण रुग्णालयात चालवण्यात आले.

### पिरामल फायनान्सचा महाराष्ट्रात विस्तार

**मुंबई :** पिरामल फायनान्स लिमिटेडने आज महाराष्ट्रभर मोठ्या विस्ताराची घोषणा केली असून आर्थिक वर्ष २०२८ पर्यंत एकूण १.५ लाख कोटी रुपये एयूएम गाठण्याचे चे लक्ष्य ठेवले आहे. महाराष्ट्र पिरामल फायनान्ससाठी सर्वात मोठ्या बाजारपेठांपैकी एक असून नाशिक, नागपूर, पुणे आणि कोल्हापूरसह राज्यातील प्रमुख शहरांमध्ये ७७ शाखांच्या मदतीने १,२१,००० हून अधिक ग्राहकांना सेवा पुरवली जाते. राज्यात गृहकर्जे आणि बिझनेस लोन्ससाठी विशेषतः मोठी मागणी दिसून येत आहे.

### तळागाळातील खेळाडूंसाठी टेनिस प्रशिक्षणाचे लोकशाहीकरण

**छत्रपती संभाजीनगर :** भारतात लवकरच टेनिस प्रशिक्षण अधिक उपलब्ध होणार आहे, ज्याचे श्रेय दोन तरूण खेळाडूंना जाते. ते आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करत मोठ्या शहरांपलीकडे प्रशिक्षण उपलब्ध असण्यामधील तफावत दूर करत आहेत. औरंगाबादमधील आदिश शेळके आणि मुंबईमधील भाग्यश्री मीना हे दोघेही २१ वर्षीय टेनिस खेळाडू आणि आयआयटी पुणे येथे कम्प्युटर सायन्सचे शिक्षण घेणारे विद्यार्थी आहेत. या दोघांनी नेक्स्टप्लेएआय प्लॅटफॉर्म डिझाइन केला आहे, जे मशिन लर्निंगचा उपयोग करत टेनिस व्हिडिओजचे विश्लेषण करते, ज्यामधून स्ट्रोक्स, फूटवर्क आणि सामन्यामधील मूव्हमेंट्सबाबत वैयक्तिकृत अभिप्राय मिळतात. यामागे द्वितीय व तृतीय श्रेणीच्या शहरांमधील उदयोन्मुख टेनिस खेळाडूंना मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याचा मनसुबा आहे, जे सामान्यत: महागड्या शैक्षणिक संस्थांमध्ये व उच्च प्रशिक्षकांकडून मिळते.

### एनडीटीव्ही कलाकारांचा एआयला सलाम!

**छत्रपती संभाजीनगर :** एण्डटीव्हीवरील लोकप्रिय कलाकार प्रियमवदा कांत, योगेश त्रिपाठी आणि रोहिताश्र्वा गौड यांनी शूटिंगपासून दैनंदिन कामांपर्यंत एआयचा होत असलेला प्रभाव स्पष्ट केला आहे. 'घरवाली पेडवाली'ची अभिनेत्री प्रियमवदा कांत सांगते की एआयमुळे कंटेंट प्लॅनिंग, फोटो एडिटिंग आणि मेकअप–आऊटफिट ट्रायल्स अधिक जलद आणि प्रभावीरीत्या पार पाडता येतात. ती म्हणते, एआय वेळ वाचवतो, पण सर्जनशीलतेची खरी चमक मानवी बुद्धीच देऊ शकते. 'हप्पू की उलटन पलटन'मधील योगेश त्रिपाठी एआयचा वापर सोशल मीडिया व्यवस्थापन, कंटेंट तयारी आणि डायलॉग प्रॅक्टिससाठी करतात. एआय–आधारित एपिसोडचा उल्लेख करताना ते म्हणाले, तंत्रज्ञानाने नात्यांमधील ऊब कमी होऊ नये, उलट वाढली पाहिजे. 'भाबीजी घर पर है' फेम रोहिताश्र्वा गौड यांच्या मते, एआय आता स्मार्ट साथीदार झाला आहे. डायलॉग रिव्हिजन, लूक टेस्ट आणि कंटेंट आयडियाजसाठी तो अत्यंत उपयुक्त ठरतो. मालिकेतील एआय–विनोदी एपिसोडलाही प्रेक्षकांची सकारात्मक दाद मिळाली.

### ध्येयापासून दूर नेणारे घटक ओळखणे गरजेचे – प्रा. डॉ. कैलास इंगळे

**छत्रपती संभाजीनगर :** आपला वेळ, वाचन, लेखन आणि नातेसंबंध कोण हिरावतोय हे ओळखले तरच यश सुरक्षित राहते, असे प्रतिपादन प्रा. डॉ. कैलास इंगळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला–वाणिज्य महाविद्यालयात आयोजित दोन दिवसीय विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन व प्लेसमेंट कार्यशाळेत केले. कार्यशाळेचे उद्घाटन आजीवन शिक्षण विस्तार विभागाचे संचालक डॉ. सुधाकर शेंडगे यांनी केले. त्यांनी युवकांनी सकारात्मक वृत्ती जोपासून ध्येयाकडे वाटचाल करण्याचे आवाहन केले. प्रा. डॉ. साईकुमार बोराळकर यांनी स्पर्धा परीक्षेतील संधींचे मार्गदर्शन केले, तर उद्योजक राजेंद्र पुराणे यांनी उद्योगातील संघर्ष व यशाची सूत्रे सांगितली.

### इंटरनेट बँकिंगचा अविस्मरणीय अनुभव देणार

**छत्रपती संभाजीनगर :** नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाची पूर्ण मालकीची उपकंपनी असलेल्या एनपीसीआय भारत बिलपे लिमिटेडने बँकिंग कनेक्टसह डिजिटल पेमेंटचा अत्यंत आधुनिक दृष्टिकोन सादर केला आहे. हा एक नवीन इंटरऑपरेबल प्लॅटफॉर्म आहे जो इंटरनेट आणि मोबाइल बँकिंगच्या अनुभवाची पुनर्परिभाषा करण्याचे आश्र्वासन देतो. आरबीआय गव्हर्नर माननीय श्री. संजय मल्होत्रा यांच्या उपस्थितीत ग्लोबल फिनटेक फेस्टिव्हल २०२५ दरम्यान हे बँकिंग कनेक्ट लाँच करण्यात आले. आजच्या नेट बँकिंग वर्कफ्लोमध्ये अनेकदा गुंतागुंतीची ग्राहक क्रेडेन्शियल्स आणि नॉन स्टँडरडाईज्ड सेटलमेंट प्रक्रिया अशा अनेक गोष्टींची एकत्रितरित्या गरज भासते. व्यापारी, पेमेंट ॲग्रीगेटर ऑनबोर्डिंगला १० ते १५ दिवस लागू शकतात. ज्यामुळे पेमेंट व्यवस्थेत तणाव निर्माण होऊ शकतो.

# दोन दिवसीय संगीत महोत्सव संपन्न

**छत्रपती संभाजीनगर, ३० नोव्हेंबर :** देवमुद्रा अ मूव्हमेंट स्कूल – सांस्कृतिक ट्रस्ट, छत्रपती संभाजीनगर आणि धृवपद गुरुकुलम ट्रस्ट, हैद्राबाद यांच्या संयुक्त विद्यमाने २२ व २३ नोव्हेंबर रोजी दोन दिवसीय सांस्कृतिक – शास्त्रीय नृत्य व धृपद संगीत महोत्सव संपन्न झाला. नृत्य महोत्सवाचे हे १२वे तर संगीत महोत्सवाचे पहिले वर्ष होते.

२२ नोव्हेंबरला भरतनाट्यम आणि कथकच्या सौभाग्य प्रतिभा नृत्य स्पर्धेने कार्यक्रमाला सुरुवात झाली. दुसऱ्या सत्रात डॉ. राज्यलक्ष्मी सेठ यांच्या मार्गदर्शनाखाली देवमुद्रा ग्रुपने ललिता देवी चरितम् – कूचिपुडी नृत्यनाटिका सादर केली. हैद्राबादचे नृत्यकलाकार डॉ. कला कृष्ण यांच्या विद्यार्थ्यांनी आंध्र नाट्यम व पेरीनी तांडवम सादर केले. आंध्र नाट्यम क्षेत्रातील योगदानासाठी डॉ. कला कृष्ण यांना क्रिष्ण प्रतिभा २०२५ या राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले.

२३ नोव्हेंबरला डॉ. कला कृष्ण यांची अभिनय जावली कार्यशाळा आयोजित केली. त्यानंतर भोपाळचे धृपद बंधू संजीव व मनीष यांनी धृपद गायन सादर केले. त्यांना पखवाज वादक गणेश भुतेकर व तानपुरा साथ दीपा शुक्ला आणि शरद लोखंडे यांनी दिली. पुढे डॉ. राज्यलक्ष्मी सेठ यांच्या मार्गदर्शनाखाली श्री नारायण वर्णमाला ही कूचिपुडी नृत्यनाटिका सादर झाली. सौभाग्य प्रतिभा स्पर्धेत विविध गटांमध्ये जवळपास ५० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. भरतनाट्यम, कथक आणि दुहेरी गटांत विजेते घोषित करण्यात आले. परीक्षक म्हणून डॉ. जयंत शेवतेकर, मुक्ता सोमण, वर्षा पंडित, सुनीला गोल्लापुडी आणि मीनल देशमुख यांनी कार्य पाहिले. कार्यक्रमास पोलिस आयुक्त शर्मिष्ठा घार्गे वालावलकर आणि उद्योजिका मोहिनी केळकर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. संपूर्ण महोत्सव देवमुद्रा टीमने डॉ. व्ही. सौम्याश्री आणि विजया रामम यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी केला.



# मराठवाडा युवक विकास मंडळातर्फे डॉ. शेषराव पठाडेंचा सपत्नीक सत्कार

**छत्रपती संभाजीनगर, ३० नोव्हेंबर :** राजश्री शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन समितीवर डॉ.शेषराव पठाडे यांची निवड झाल्याबाबत त्यांच्यासह पत्नी स्वाती पठाडे यांचा त्यांच्या निवासस्थानी मराठवाडा युवक विकास मंडळातर्फे महाराष्ट्र राज्य बालहक्क आयोगाचे माजी अध्यक्ष आणि भाजपाचे जेष्ठ नेते प्रवीण घुगे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.



याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष नरहरी शिवपुरे, तिरुपती विहार मित्र मंडळाचे ज्येष्ठ सदस्य अभय सोभावणे, पत्रकार अनिल लाले, संतोष कुलकर्णी, सचिन रुद्रे, संदीप शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. शेषराव पठाडे ३० वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात असून, शाहिरी कलाक्षेत्रातही त्यांचे उल्लेखनीय स्वरूपाचे योगदान आहे. मराठी शाहिरी वाङ्मयाचे चिकित्सक अभ्यासक म्हणून त्यांना ओळखले जाते. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या विभागात गेली पाच वर्षे त्यांनी तासिका तत्त्वावर सहाय्यक प्राध्यापक म्हणून अध्ययनाचे कार्य केले आहे. विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमधून त्यांनी विविध विषयांवरील संशोधन पेपर सादर केलेले आहेत. राज्याच्या सांस्कृतिक विभागाकडून पठाडे यांना शाहिरी वाङ्मयाच्या अभ्यासासाठी सीनियर फेलोशिप मिळालेली असून, विविध १० पुस्तकांचे त्यांनी लेखन आणि संपादन केलेले आहे. पठाडे आकाशवाणी आणि दूरदर्शनचे जेष्ठ कलावंत असून, आपल्या लोकरंजन लोककला प्रतिष्ठान या संस्थेच्या वतीने शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा सातत्याने ते प्रचार आणि प्रसार करीत असतात. जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने प्रकाशित छत्रपती छत्रपती संभाजी नगर पर्यटन आणि महावस्त्र पैठणी या कॉफी टेबल बुकमध्येही त्यांच्या संशोधनपर लेखांचा समावेश करण्यात आलेला आहे.

# दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूलमध्ये आनंद नगरी उत्साहात साजरी



**बिडकीन, ३० नोव्हेंबर :** पैठण तालुक्यातील निलजगाव येथील दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल येथे आनंद नगरी उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान बरोबर व्यावहारिक ज्ञान मिळावे व संपूर्ण विकास व्हावा यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष ओम प्रकाश जैस्वाल, मुख्याध्यापक मयूर स्वामी तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक भाऊ साहेब मोगल यांच्या हस्ते फित कापून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी काहीना काही खाद्य पदार्थ बनवून आणले होते, त्यांनी दुकानदाराची भूमिका तर बाकीच्या विद्यार्थ्यांनी ग्राहकाची भूमिका पार, आनंद नगरीत विविध प्रकार व्यंजन जसे वडापाव, समोसा, भेळ, गुलाबजाम, ब्रेड वडा, इडली सांबार, खीर, पॉप कॉर्न, लिंबू सरबत इत्यादि पदार्थ पाहून पाहुण्यांनी मुलांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकांनी सुद्धा स्वतः च्या पैशातून विविध पदार्थांची खरेदी करून जिभेचे चोचले पूर्ण केले. विद्यार्थ्यांचा संपूर्ण विक्री झाली असता मिळालेल्या पैशातून त्यांच्या चेहर्यावर एक वेगळाच आनंद दिसत होता.

# विद्यार्थ्यांनी शिल्पकलेतून साकारले गणपती बाप्पा!

**छत्रपती संभाजीनगर, ३० नोव्हेंबर :** असोशिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजच्या ३९ व्या सेंट्रल झोन युवा महोत्सवांतर्गत झालेल्या शिल्पकला स्पर्धेत विद्यार्थ्यांनी शाडू मातीपासून विविध प्रकारच्या गणपती बाप्पाचे अप्रतिम शिल्प साकारत प्रेक्षकांचे मन वेधून घेतले. महाराष्ट्राचे अधिष्ठाता दैवत असलेल्या गणपतीची पर्यावरणपूरक संकल्पना या वर्षी स्पर्धेसाठी देण्यात आली होती.

एकूण १८ विद्यापीठांतील स्पर्धक विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवत उभे, बसलेले, वाद्य हातात घेतलेले, नृत्यमुद्रांतील तसेच विविध पारंपरिक स्वरूपातील गणेशमूर्ती कलात्मकरीत्या घडविल्या. विद्यार्थ्यांच्या कल्पकता, शाडूमातीचा सुंदर वापर आणि कल्पनांना दिलेले आकार पाहून परीक्षकही प्रभावित झाले.

स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आपले अनुभवही अत्यंत उत्साहाने मांडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्रिती कदम यांनी सांगितले की, गणेशोत्सव–ाची संकल्पना मिळताच मी लोक प्रेमाने गणपतीची मूर्ती नेत असल्याचे दृश्य तयार केले. लहानपणापासून कला माझ्या रक्तात आहे आणि ही आवड बीएफए पदवीद्वारे पुढे नेत आहे. जिवाजी विद्यापीठाच्या अंशिका जैन यांनी आनंद व्यक्त करत म्हटले की, गणेशोत्सव या विषयावर काम करताना खूप मजा आली.

कॅम्पसचे वातावरण आणि स्पर्धेची रंगत खूप सुंदर आहे. ए.के.एस. विद्यापीठ, सतना (म.प्र.) चे अमर विश्र्वकर्मा म्हणाले, मी पूर्ण मनापासून गणेशमूर्ती साकारली. अजून चांगले करता आले असते,अशी भावना आहे, पण आता निकालाची प्रतीक्षा आहे.

पर्यावरणपूरक गणेशोत्सव या संकल्पनेतून परंपरा, निसर्गरक्षण आणि कलात्मक नवोन्मेष यांचा सुंदर संगम विद्यार्थ्यांनी घडवला. उदयोन्मुख कलाकारांना आपला कला विश्वास व्यक्त करण्याचे हे व्यासपीठ ठरले असून स्पर्धेने युवा महोत्सवात एक अनोखा आणि अर्थपूर्ण सांस्कृतिक पैलू उजळून टाकला.

# पक्ष निरीक्षकांच्या चुकीने उमेदवारांचे भवितव्य धोक्यात

**पैठण, २९ नोव्हेंबर :** पैठण नगर परिषद निवडणुकीत पक्ष निरीक्षकांच्या अडाणीपणामुळे भाजपा उमेदवारांना चुकीचे एबी फार्म दिल्याने राज्य भरात प्रकाशझोतात आलेल्या प्रकरणाला आता नवीन वळण मिळाले असून उच्च न्यायालया मार्फत संबंधित प्रभागातील निवडणूक रोखण्यात येणार असल्याचे संकेत मिळत आहे. पक्ष निरीक्षक आणि स्थानिक नेतृत्व यांच्या कृतीमुळे त्या प्रभागातील उमेदवारांचे आर्थिक, मानसिक नुकसान झाले आहे.त्यातल्या त्यात त्यांचा महत्वाचा वेळ निघत असल्याने त्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे.

पक्ष निरीक्षक कॅबिनेट मंत्री अतुल सावे, स्थानिक पक्ष निरीक्षक तुषार शिसोदे, लक्ष्मण औटे, उमेदवार सुरज लोळगे,शहर मंडळ अधिकारी बंडू आंधळे यांच्या चुकीमुळे प्रभाग ६ मधील उमेदवार सिद्धार्थ परदेशी, अश्विनी गव्हाणे, प्रभाग ११ मधील कुरेशी या उमेदवारांना उमेदवारी अर्ज भरतांना चुकीचा ए. बी. फार्म दिल्याने निवडणूक अधिकारी एस.डी.एम नीलम बाफना यांनी त्यांची उमेदवारी रद्द केली होती.

ही बाब कोर्टात गेल्यानंतर पैठण निवडणूक निर्णय अधिकारी यांनी उमेदवारिवर पुन्हा विचार करावा असे कोर्टाचे म्हणणे असल्याने फेर निर्णयासाठी पुन्हा हे प्रकरण उप विभागीय अधिकारी यांच्या समोर आले आणि कागद पत्राची पूर्तता पाहता या उमेदवारांना भाजपा पक्षाचे चिन्ह देण्यात आले.

सदरील प्रकरण उच्च न्यायालयात गेल्याने सदरील प्रभागातील निवडणूक थांबण्याची चिन्हे आहे. यामुळे शहरातील एकूण १२ प्रभाग व नगराध्यक्षा निवडणूकीवर प्रभाव पडणार आहे. पैठण नगराध्यक्षा पदासाठी भाजपातर्फे प्रभाग ७ चे उमेदवार सुरज लोळगे यांच्या सौभाग्यवती मोहिनी लोळगे या निवडणूक लढवत आहेत.

प्रभाग ७ मधील जनसंपर्क कार्यालय बंद करणारे पुन्हा निवडणूकीसाठी प्रभागात आले असल्याची चर्चा असून या दोन्ही उमेदरांचा वेगवेगळा पत्ता चर्चेचा विषय बनत आहे.

# विद्यार्थ्यांनी अनुभवली 'आईला लागणाऱ्या चटक्यांची' अनुभूती

**सोयगाव, २९ नोव्हेंबर :** जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, गटशिक्षणाधिकारी, सचिन शिंदे व केंद्रप्रमुख फिरोज तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली दशसूत्री व आनंददायी उपक्रमतार्गत शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील याच्या संकल्पनेतून स्वनिर्मितीचा आनंद कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना स्वावलंबनासह अन्ननिर्मितीतील श्रमांचे महत्त्व समजावणे होता. विद्यार्थ्यांनी स्वनिर्मिती, सृजनशीलता, स्वच्छता, गटकार्य आणि पाककला यांचे प्रत्यक्ष धडे घेतले. विशेष म्हणजे त्यांनी स्वतः हाताने पोळी, भाकरी, पुरी, भाजी, पिठले, पोहे, उपमा तयार करताना तव्याची उष्णता, हाताला बसणारे सूक्ष्म चटके, पोळी फुलविण्याची प्रक्रिया तसेच भाकरी भाजण्याची क्रिया यांचा अनुभव घेतला.

या अनुभवातून विद्यार्थ्यांना आई–वडिलांच्या कष्टांविषयी आदर, अन्नाची नासाडी टाळण्याचे महत्त्व तसेच श्रमाचे मूल्य समजले.मुलांमध्ये सहकार्य, संयम, गटभावना व आत्मविश्वास वाढला. कन्याकवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतील अरे संसार संसार, आधी हाताला चटके मग मिळते भाकर याचा अर्थ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभव पाहिला.

कार्यक्रमाला नगरसेवक राजेंद्र दुतोंडे व शालेय व्यवस्थापन समिती सदस्य रविंद्र साखळे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. सोयगावचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व पालकांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक किरणकुमार पाटील, सुरेखा चौधरी, पंकज रगडे, रामचंद्र महाकाळ, मंगला बोरसे, सविता पाटील, गणेश बाविस्कर, प्रतिभा कोळी, अंकुश काळे, विकार शेख, बी.वाय.बागवान, शुभम देसले तसेच अन्य शिक्षकांनी मोलाचे परिश्रम घेतले उपक्रमाचे पालक वर्गातून कौतुक होत आहे.

# एमजीएममध्ये 'पीएसपीए कॉन्क्लेव्ह ४' चर्चासत्र संपन्न

**छत्रपती संभाजीनगर, ३० नोव्हेंबर :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी आणि प्रायव्हेट स्कूल प्रिन्सिपल्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय 'पीएसपीए कॉन्क्लेव्ह ४' हे विशेष शैक्षणिक चर्चासत्र विनोबा भावे सभागृहात उत्साहात पार पडले. ट्रान्सफॉर्मिंग लर्निंग लँडस्केप्स – फ्रॉम विज्डम टू व्हिजन: द फ्युचर ऑफ एज्युकेशन इज हिअर या संकल्पनेवर आधारित या चर्चासत्रात राज्यभरातील शाळांचे प्राचार्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या चर्चासत्राला एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू. प्रा.डॉ. विलास सपकाळ, माजी कुलगुरू डॉ. सुधीर गव्हाणे, स्वामी विष्णुपदानंदजी, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके, अधिष्ठाता डॉ.एच. एच.शिंदे, संचालिका डॉ. परमिंदर कौर धिंग्रा, पीएसपीए' उपाध्यक्ष डॉ. बी. एस. एन. मूर्ती, पदाधिकारी, राज्यभरातील शाळांचे प्राचार्य व सर्व संबंधित उपस्थित होते.



यावेळी बोलताना कुलपती अंकुशराव कदम म्हणाले, या चर्चासत्राच्या माध्यमातून आपण शिक्षणावर चर्चा करणार आहात, याचा मला मनस्वी आनंद झाला. गौतम बौद्ध यांनी शील, समाधी आणि प्रज्ञा ही जी शिकवण दिली आहे, ती आपण आज विद्यार्थ्यांना शिकवायला हवी.

कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर यांनी उच्च शिक्षणासाठी शालेय विद्यार्थ्यांचे सक्षम मार्गदर्शन, कौशल्य विकास आणि मानसिक तयारी या मुद्द्यांवर प्रकाश टाकला. तर पीएसपीए' उपाध्यक्ष डॉ. बी. एस. एन. मूर्ती यांनी पीएसपीए'ची स्थापना, वार्षिक उपक्रम आणि प्राचार्यांच्या नैतिक जबाबदारीवर भाष्य करत शिक्षण हा व्यवसाय नसून संस्कारांची प्रक्रिया आहे असे सांगितले.

अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके यांनी त्यांच्या भाषणात अब्राहम लिंकन यांच्या सुप्रसिद्ध पत्राचा संदर्भ देत मूल्याधिष्ठित शिक्षणाची गरज अधोरेखित केली. संचालिका डॉ. परमिंदर कौर धिंग्रा यांनी शाळा शिक्षक आणि प्राचार्य यांची विद्यापीठाशी असलेली महत्त्वपूर्ण नाळ अधोरेखित करत शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या भूमिकेचे महत्त्व स्पष्ट केले.

प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे यांनी समारोप सत्रात शिक्षणातील मूल्यसंवर्धन, बदलत्या काळातील शैक्षणिक गरजा आणि नेतृत्वगुणांची आवश्यकता स्पष्ट केली.

कार्यक्रमाच्या शेवटी सुनील श्रीवास्तव यांनी आभारप्रदर्शन करत शिक्षण क्षेत्रातील सामूहिक नेतृत्वाच्या महत्त्वावर भर दिला. या कॉन्क्लेव्हमध्ये स्वामी विष्णुपदानंदजी, आनंद कृष्णस्वामी, डॉ.कल्याणी अभ्यंकर, राजकुमार श्रीवास्तव, ऋतुजा लिंगमपल्ले आदि मान्यवरांनी आपले विचार मांडले.

## जाहीर समन्स

मा. दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर गंगापुर यांचे न्यायालयात ता. गंगापूर जि. औरंगाबाद
नियमित दिवाणी दावा नं. २५७/२०२०
प्रवीण व इतर विरूध्द
मदन व इतर
प्रकरण : वाटणी, ताबा, जाहीर ठराव व मनाई हुकूम बाबत.
प्रति
३) फरिदाबेगम भ्र. शेख इब्राहीम, ४) शेख इस्माईल पि. शेख इब्राहीम, ५) शेख फारूक पि. शेख इब्राहीम, ६) शेख एजाज पि. शेख इब्राहीम, ७) शेख इरशाद पि. शेख इब्राहीम, ८) फरजाना बेगम भ्र. फय्युम बेग, ९) फातमा बेगम पि. शेख इब्राहीम, १०) शेख उमर पि. शेख इब्राहीम ११) आशाबेगम पि. शेख इब्राहीम, सर्व रा. रा. अलतमश कॉलनी औरंगाबाद १२) शेख फिरोज पि. शेख युसुफ रा. बायजिपुरा औरंगबाद.
१) प्रविण पि. मदन तुपे, वय २७ वर्ष, धंदा वाहन चालक, व शेती, रा. वरझडी, ता. गंगापूर जि. औरंगाबाद. २) प्रमिला पि. मदन तुपे, वय २९वर्ष, धंदा घरकाम रा. वरझडी, ता. गंगापूर जि. औरंगाबाद. ३) सौ. सिंधुबाई भ्र.मदन तुपे, वय ५९ वर्ष, धंदा घरकाम रा. वरझडी, ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांनी या न्यायालयामध्ये वाटणी, ताबा, जाहीर ठराव व मनाई हुकूम बाबत दावा सादर केला असून सदरचा दावा या न्यायालयामध्ये प्रलंबित असल्याने व सदरचे दाव्यामध्ये तुमचेवर समन्सची बजावणी होवू न शकल्याने त्याअर्थी तुम्हांस या जाहीर समन्सव्दारे सुचित करण्यात येते की, सदरील प्रकरणामध्ये तुमची उपस्थिती नोंदविणे कामी पुढील तारीख २७/०१/२०२६ या न्यायालया मध्ये ठेवण्यात आलेली आहे आणि म्हणून प्रस्तुतचे दाव्या मध्ये दि. २७/०१/२०२६ रोजी तुम्ही स्वतः अथवा तुमचे प्रतिनिधी मार्फत या न्यायालयमध्ये सकाळी १०:३०वाजता हजर होवून तुमचे लेखी उत्तर सादर करावे. दि २७/०१/२०२६ रोजी हजर होवून तुमचे न्यायालयात तुम्ही उपस्थित न झाल्यास नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी, म्हणून सदरचे जाहीर समन्स आज दि. २९/११/२०२५ न्यायालयाचे शिक्यानिशी व माझे सहिनिशी देण्यात येत आहे.
आदेशावरून

**सहाय्यक अधिक्षक न्यायालय, गंगापूर**
**दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर गंगापूर.**

# डॉ. मिर्झा : मनामनांत हास्याची पेरणी करणारा लोककवी

प्रासंगिक

**प्रवीण टाके**

कवितेने मारलं कवितेने तारलं
जवा होतो उपाशी कवितेने चारलं
पुढचं सारं जीवन कवितेनं भिजावं
कविता म्हणतांनी जीव माहा थिजावं
स्टेजवर कवी मेल्याचा चमत्कार घडावं
लढता लढता सैनिक धारातीर्थी पडावं

आपल्या कलाकृतीवर इतक्या निष्ठेने प्रेम करणारे वऱ्हाडी विनोदाचे बादशहा, मराठी-वऱ्हाडी भाषेला उंचीवर पोहोचवणारे हास्यसम्राट डॉ. मिर्झा रफी अहमद बेग आपल्या असंख्य चाहत्यांचा निरोप घेऊन निघून गेले. गेल्या ४०-४५ वर्षांचा त्यांचा-माझा स्नेह. धनजमाणिकवाडा या यवतमाळ जिल्ह्यातील जुळ्या गावातील त्यांचा जन्म. या छोट्याशा गावातील डॉ. मिर्झा रफी अहमद बेग म्हणजे अत्यंत गुणवान व्यक्तिमत्त्व. त्यांच्या कॉलेज जीवनाची सुरुवात त्यांनी अभियंता बनण्यासाठी केली. नंतर ते डॉक्टर झाले आणि पुढे कवी म्हणून त्यांनी नावलौकिक मिळविला.

अवघे ६८ वर्षांचे आयुष्य, पण तब्बल पन्नास वर्षे हास्यव्यंगाचा रंगमंच त्यांनी गाजवला. वयाच्या अकराव्या वर्षी कवितेची सुरू झालेली 'मिर्झा एक्सप्रेस' धडाकेबाज प्रवासानंतर ६८ व्या वर्षीच थांबली. मिर्झा एक्सप्रेस या सोलो कार्यक्रमांचे ६ हजारावर प्रयोग त्यांनी केले. २० पेक्षा अधिक पुस्तके, अनेक ध्वनिचित्रफिती आणि लाखो हृदयांवर उमटलेल्या खळखळाटाचे ठसे ही त्यांची मिळकत.

तीस-चाळीस वर्षांपूर्वी गावामध्ये रेडिओवर बीबीसी ऐकणारे, इंग्रजी वाचणारे, रामायण-महाभारतापासून भागवताशी, कीर्तनाशी नाळ जुळलेले मिर्झा हे संत साहित्याचे गाढे अभ्यासक होते. सर्वसमावेशकता त्यांच्या घरातील संस्कारातून त्यांच्याकडे आली आणि ही सर्वसमावेशकता त्यांच्या कवितेतही कायम उमटत राहिली. त्यामुळेच हा कवी महाराष्ट्रातल्या कवी संमेलनांना नवा स्वर, नवा विचार आणि नावीन्य देणारा ठरला. अनेक वाहिन्यांवरील हास्य व्यगांच्या कार्यक्रमांचे ते प्रमुख सादरकर्ते ठरले. महाराष्ट्राचे हास्य सम्राट म्हणून नावलौकिकास आले. वऱ्हाडी बोलीची चव, ग्रामीण साधेपणाची फोडणी आणि समाजप्रबोधनाचा ठेचा ही त्यांच्या सादरीकरणाची रेसिपी होती.



त्यांनी विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही भूषवले. इतर अनेक साहित्य संमेलनांचे ते अध्यक्ष होते. 'जांगडबुत्ता' या शब्दाचे ते जनक असून, याच नावाने त्यांचा काव्यसंग्रहही प्रसिद्ध आहे. अवघ्या दोन ते तीन मिनिटांत श्रोत्यांशी थेट एकरूप होण्याचे अजब कसब त्यांच्याकडे होते.

डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी विदर्भातल्या छोट्या छोट्या गावांना कविता, कविसंमेलन, हास्य व्यंग म्हणजे काय याची शिकवण दिली. विदर्भात नव्वदीच्या काळात डॉ. मिर्झा अहमद बेग, डॉ. विठ्ठल वाघ, शंकर बडे यांच्यासह विदर्भातील काही कवींनी कविसंमेलन हा प्रकार गावागावांमध्ये लोकप्रिय केला. विठ्ठल वाघ यांची तिफण कविता, पहाडी आवाजातील मांडणी, शंकर बडे यांचा बॅरिस्टर गुलब्या, गेय कवितांची मांडणी आणि डॉ. मिर्झा यांची मोठा माणूस, सातवा महिना, जांगडबुत्ता, ऊठ आता गणपत या विनोदी कवितांनी त्या काळात धूम केली होती.

बाकी सगळं होत राहील...
पैसा राह्यला तर गणगोत राहील...

अशी व्यवहारी मांडणी ते करायचे. त्यांच्या कवितेवर टीकाटिप्पणी व्हायची. मात्र सादरीकरणात ते विरोधकांनाही जिंकून घ्यायचे. त्यांच्याच भाषेत ते यावर भाष्य करताना म्हणायचे....

आज जरी कवितेले किंमत नाही माया
लोक मले समजते फुटाणे अन् लाया
उद्या पहा माझ्यासाठी पुष्पक विमान येईन
तुकारामासारखा मले स्वर्गामध्ये नेईन

आपल्या श्रोत्यांना कायम हसत ठेवण्याचे अजब कसब त्यांच्याकडे होते. त्यांच्या कविता शेती, माती, शेतकरी, कामगार यांच्यावर अधिक होत्या. ते शेतकऱ्यांच्या समस्या साध्या सोप्या पद्धतीने मांडत. या संदर्भात त्यांनी 'उठ आता गणपत' या कवितेतून दीर्घ मांडणी केली होती...

उठ आता गणपत हाती घे तूत्या
तू पेरतो तूती तुझ्या हाती तोत्या
किंवा
शेतकरी समाधानी हे केवळ पुस्तकी असते
जगभऱ्याचे दुःख त्याच्या मस्तकी असते
किंवा
शेतकऱ्यांना संसाराचा मेळ कसा जोडावं
कुठून घ्यावं श्वास अन् गॅस कुठून सोडावं
खरिपात अलग बोलाचं वेगळं रब्बीत
डब्बा भरुन पेराचं सावडाच डब्बीत

ग्रामीण भागातील श्रोत्याना लक्षात घेऊन अनेक कवितांची मांडणी त्यांनी केली. नवरा बायकोतील संवाद एका कवितेत त्यांनी शानदारपणे मांडला आहे...

दिवस-रात्र राबतो या बुवाऱ्या पोटासाठी
कुठून आणू लिपस्टिक तुझ्या लाल चुटूक होटासाठी
एक मले शर्ट आणि एकच पॅन्ट
नौकरी करतो ते शाळा नॉन ग्रॅन्ट
कपडा नाही भेटत मीटरभर कोटासाठी
कुठून आणून लिपस्टिक या लाल चुटूक होटासाठी

मिर्झा हे वऱ्हाडी बोलीचे विद्यापीठ होते. हसत-हसत प्रबोधन, मनात घर करणारी शैली या साऱ्या गुणांचं एकमेव संमिश्रण म्हणजे मिर्झा एक्सप्रेस. त्यांच्या अनेक कविता विद्यापीठात अभ्यासालाही आहेत. भाषेच्या संदर्भात त्यांची ही कविता खूप बोलकी आहे.

मराठीनेच तुकड्याला तुकडोजी केले
गाडगेबाबा मराठीतच जन्म घेऊन गेले
अमृतासंग पैज जिंकते अशी मराठी बोली
आभाळाची उंची जिला समुद्राची खोली

दिल्लीपासून गल्लीपर्यंत त्यांनी आपल्या कवितांनी लोकांच्या आयुष्यात रंग भरला. ते फक्त कवितेतच विचार करायचे. त्यांच्या पुस्तकांच्या प्रस्तावनापासून त्यांचे आत्मचरित्र देखील त्यांनी कवितेतच लिहिले. त्यांच्या कवितेची समीक्षा करताना डॉ. मिर्झांनी एक वेगळ्या पद्धतीची मांडणी आयुष्यभर केली आणि ती यशस्वी केली हे अधोरेखित व्हायला हवे. गेली ५० वर्षे महाराष्ट्राची जनता या आनंदात भिजून निघाली. त्यांचे असे जाणे अनेकांना रुचले नाही. सगळ्यांनाच वाटत होते की, मिर्झा एक्सप्रेस धावत राहिली पाहिजे. आजोबांपासून तर नातवांपर्यंत जवळपास तीन पिढ्या त्यांच्या काव्य मैफिलीच्या साक्षीदार आहेत. डॉ. मिर्झा, तुम्ही काव्यप्रेमींच्या स्मरणात दीर्घकाळ राहणार आहात. डॉक्टर साहेबांना विनम्र आदारांजली.

उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर
९७०२८५८७७७

# वाढता दहशतवाद

दखल

**प्रवीण दीक्षित**

१० नोव्हेंबर २०२५ रोजी संध्याकाळी सातच्या सुमारास दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ अत्यंत शक्तिशाली असा स्फोट एका हळूहळू पुढे सरकणाऱ्या गाडीमधून झाला व त्यात १३ जण मृत्यू पावले व अनेकजण जखमी झाले. मृतांमधील अनेक जण मुस्लिम आहेत. हा स्फोट हे दहशतवादी कृत्य होते व त्यात अनेक निष्पाप लोकांना ठार मारून जगाचे लक्ष्य त्यांच्याकडे वेधणे हेच होते. सध्या या स्फोटाचा तपास एनआयए करत आहे. आतापर्यंतच्या तपासात असे दिसते की डॉ. उमर नबी, जो दिल्लीजवळील फरिदाबाद येथे असलेल्या अल् फलाह विद्यापीठात शिकवत होता, हा मूळचा काश्मिरी पण त्याने २०२४ मधे काश्मीर सोडले होते. आयईडी स्फोट करण्यात तो प्रशिक्षित होता. त्यापूर्वी मागच्या १५ दिवसात जम्मू-काश्मीर, हरयाणा आणि उत्तरप्रदेश पोलिसांनी ३ डॉक्टरांसह ८ लोकांना पकडले होते. त्यामधे पुलवामा येथे राहणाऱ्या डॉ. मुझामिल अहमद गनेय ऊर्फ मुसाईब आणि लखनौ येथे राहणाऱ्या डॉ. शाहीन सईद यांना अनुक्रमे ३० ऑक्टोबर आणि ८ नोव्हेंबर रोजी अटक करण्यात आली होती. हे दोघेही अल फलाह रुग्णालयात काम करत होते. डॉ. अदिल जो जम्मू-काश्मीरमधील पुलगामा, वानपोरा इथला रहिवासी होता, त्याला उत्तर प्रदेशातील सहारनपूर येथून ५ नोव्हेंबरला पकडण्यात आले होते. १० नोव्हेंबर रोजी डॉ. गनेय हा ज्या घरात भाड्याने राहात होता, तेथून ३५० किलो स्फोटके व शस्त्रे पकडल्याचे फरिदाबाद पोलिसांनी १० नोव्हेंबर रोजी वृत्त प्रतिनिधींना सांगितल्यानंतर वरील लोकांना अटक केल्याचे उघडकीस आले होते. जम्मू-काश्मीर पोलिसांनीही जाहीर केले की, २९०० किलो स्फोटके, शस्त्रे, टाइमर्स, बॅटरीज व मेटल शीटस् पकडली आहेत. बाकीचे लोक पकडले गेल्यानंतर घाईघाईत आपण पकडले जाऊ नये म्हणून डॉ. उमर नबी हा काही स्फोटके घेऊन गाडीने जात असताना त्याने लाल किल्ल्याजवळील, मेट्रोस्टेशनच्या जवळ, संध्याकाळी गर्दीच्यावेळी स्फोट केला.

डॉ. शाहीन सईद ही नुकत्याच बनविण्यात आलेल्या 'जमात-उल-मोमिनात' या संघटनेची कार्यकर्ती होती. ही महिलांची संघटना जैश-ए-मोहमद या बंदी असलेल्या संघटनेनी ऑपरेशन सिंदूर नंतर भारतात दहशतवादी कृत्ये करण्यासाठी महिलांची भरती करणारी संस्था बनविण्यात आली होती. जैश-ए-मोहमदचा प्रमुख मसूद अझर याने सादिया अझर हिला या संघटनेचा प्रमुख म्हणून ऑक्टोबरमध्ये जाहीर केले होते. सादिया ही युसुफ अजहर, जो ७ मे रोजी मर्काझ सुभानअल्ला बहवालपूर पाकिस्तान येथे भारताने केलेल्या ऑपरेशन सिंदूरमधे मारला गेला होता त्याची बायको आहे.

डॉ. सईदच्या अटकेतून हे स्पष्ट होते की, जैश-ए-मोहमद ही संघटना इस्लामिक स्टेट ऑफ इराक ॲण्ड सीरिया (आयएसआयएस) प्रमाणे महिलांचा उपयोग हा हल्ले करण्यासाठी व आत्मघातकी कारवायांसाठी करत आहे. मूलतत्त्ववादी मौलवी हे शिक्षणसंस्थांमध्ये, मदरशांमध्ये तरुण मुला-मुलींना मोठ्या प्रमाणात आपल्या जाळ्यात ओढताना दिसतात.



जैश-ए-मोहमद या संघटनेस पाकिस्तान सरकार व लष्कराचा उघडपणे पाठिंबा आहे व त्यांना भारताविरुद्ध कारवायांना ते सतत मदत करत आहेत. ऑपरेशन सिंदूरमध्ये उद्ध्वस्त केलेली दहशतवादी संघटनांची ठिकाणे पाकिस्तान सरकार पुन्हा बांधून देण्यास मदत करत आहे.

आतापर्यंत उपलब्ध माहितीवरून दिसते की, मोठ्या प्रमाणात वैद्यकीय तसेच संगणकीय, उच्च शिक्षण घेतलेल्या मुला-मुलींना वापरून त्यांच्या माध्यमातून नवीन तरुणांना व तरुणींना दहशतवादी आपल्या जाळ्यात ओढत आहेत. काही दिवसांपूर्वीच पुण्यातूनही अशाच प्रकारे काम करणाऱ्या डॉक्टर व आयटीमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींना अटक केली होती. अल् कायदाचा म्होरक्या ओसामा बिन लादेन हासुद्धा खूप शिकलेला व धनाढ्य होता पण तितकाच अत्यंत कडवा दहशतवादी होता.

दहशतवादी संघटना या मोठ्या प्रमाणात इंटरनेटचा वापर करून तरुणांची डोकी भडकवत असतात. त्यांना खोटे व्हिडीओ दाखवले जातात व त्यांना दहशतवादी कृत्ये करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. या व्यक्ती आधुनिक शिक्षण घेतलेल्या, सर्व नवीन तंत्रज्ञानात कुशल, सॅटेलाईट फोनने सुसज्ज, भरपूर पैसे असणाऱ्या परंतु धार्मिक क़डव्या अशा आहेत. नुकत्याच अटक झालेल्या व्यक्तींच्या जबाबातून स्पष्ट होते की, हैदराबाद येथे राहणाऱ्या व्यक्ती शस्त्रे मिळविण्यासाठी गुजरातच्या सीमावर्ती भागात आदलाद येथे गेले असताना पाकिस्तानमधून ड्रोनच्या मदतीने शस्त्रे पाठवली होती ती घ्यायला ते गेलेले होते. पूर्ण गुप्तता राखली जाईल या तत्त्वावर अमेरिकेतून चालवल्या जाणाऱ्या व्हॉटस् ॲपसारखे सामाजिक प्लॅटफॉर्म्स यांचा दहशतवादी संघटना पुरेपूर गैरफायदा घेत आहेत व सार्वभौम असलेल्या इतर देशांतील सुरक्षा यंत्रणांना त्यावर काहीही कारवाई करणे वा माहिती मिळवणे हे जवळजवळ अशक्य आहे. इंग्लंड, युरोप व अन्य देशांनी या सामाजिक प्लॅटफॉर्म्सकडून मागितलेली माहिती सुरक्षेच्या कारणासाठी देण्यास अमेरिकेच्या प्रशासनाने पूर्णपणे नकार दिला आहे. इंटरनेटचा वापर करून प्रचंड प्रमाणात बिटकॉईन्सच्या माध्यमातून आज करोडो रुपये भारतातील तरुण त्यात खर्च करत आहेत. त्याचा वापर करून ड्रग्ज तसेच शस्त्रास्त्रे यांचा व्यापार होत आहे. अनेक गुन्ह्यांच्या तपासात दहशतवादी ड्रग्जचा वापर करून शस्त्रे खरेदी करतात व दहशतवादी कृत्ये करतात हे स्पष्ट झाले आहे.

या उलट भारतीय व्यक्तींनीच बनवलेली झोहो मेल, आरात्ताई यांचा वापर अद्याप नगण्य आहे. त्यामुळे एकतर भारतातील सर्व डेटा हा अमेरिकेसारख्या परकीय देशाला सहज उपलब्ध होत आहे व त्यातून मिळणारी माहिती भारतीय सुरक्षा यंत्रणांना उपलब्ध होत नाही व दहशतवाद्यांचे आंतरराष्ट्रीय जाळे मजबूत होत आहे. या उलट चीनने सुरुवातीपासूनच या अमेरिकन संस्थांवर बंदी घालून स्वतःचे सामाजिक प्लॅटफॉर्म्स तयार केलेले आहेत.

कोणतेही घर भाड्याने द्यायचे असल्यास त्या संबंधीची माहिती पोलिसांना देणे बंधनकारक असूनही फार क्वचित ती पुरवली जाते व माहिती न देणाऱ्यांवरही न्यायालयातून कठोर शिक्षा झाल्याचे दिसत नाही. त्यामुळे पैशाच्या लोभाने दहशतवादी मनात येईल त्या ठिकाणी भाडेकरू म्हणून राहतात व आपले उद्दिष्ट साध्य करतात हे वारंवार अनेक घटनांनी दाखवले आहे. लोकांना दाखविण्यासाठी समाजात प्रतिष्ठा असेल अशा पदाचा वापर करून ते आपल्या दहशतवादी कारवाया करताना दिसतात. फरिदाबाद येथे सापडलेली २९०० किलो स्फोटके हे दहशतवादी अनेक महिन्यांपासून साठवत होते. स्फोटकांसाठी आवश्यक अशी रासायनिक द्रव्ये, टायमर्स, मेटलशीट्स विकणाऱ्या सर्व विक्रेत्यांवरही या गोष्टी कोणाला विकल्या ही माहिती पोलिसांना देणे आवश्यक करण्याची गरज आहे. या सर्व स्फोटकांची वाहतूक ही लक्षात येणार नाही अशाप्रकारे विविध वाहनांमधून होताना दिसते. त्यासाठी ठिकठिकाणी वाहनांची तपासणी करणे गरजेचे आहे. वाहने खरेदी करताना खोटे पत्ते दिले जातात व ते सहज मान्य केले जातात ही चिंतची बाब आहे.

दहशतवादी कृत्ये करणाऱ्यांची माहिती केवळ तंत्रज्ञानाचा वापर करून मिळेल हे समजणे पुरेसे नाही. वर चर्चा केल्याप्रमाणे ही माहिती मिळण्यावर अनेक बंधने आहेत व सर्व दहशतवादी ही माहिती विविध खोटी नावे किंवा कोड वापरून पाठवत असतात. त्यामुळे त्यांची खरी ओळख फारच क्वचित होऊ शकते. त्यामुळे व्यक्तींच्या साहाय्याने गोळा केलेली गुप्त माहिती (ह्युमन इन्टलिजन्स) ही सद्धा अत्यंत महत्त्वाची आहे. दहशतवादाविरुद्ध लढा हे सर्व थरांनी एकत्र येऊन लढणे अत्यंत आवश्यक आहे. भारतातील लोकशाहीवर विश्वास असलेल्या अशा मुस्लिम समाजातील लोकांनाच त्यासाठी प्रोत्साहन देऊन या कृत्यांचा त्यांनीही निषेध करणे गरजेचे आहे. त्यांच्या आजूबाजूला कडवे विचार पसरविणारे कोण आहेत, गैरकृत्ये करणारे कोण आहेत याची माहिती त्यांनी सुरक्षा यंत्रणांपर्यंत पोचविणे अत्यंत आवश्यक आहे. त्याचप्रमाणे कडव्या विचारांना प्रत्युत्तर देण्याचे कामही या मुस्लिम संघटनांनी करणे आवश्यक आहे. त्याच बरोबर सर्व सामान्य लोकांना देखील पोलिस मित्र म्हणून सामावून घेऊन त्यांना चौकस राहणे, संशयित व्यक्तींची माहिती सुरक्षा यंत्रणांना पुरवणे याचे प्रशिक्षण देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आर्थिक विकास झाला किंवा वैद्यकीय, तांत्रिक प्रगत शिक्षण मिळाले म्हणजे लोक धार्मिक कडव्या विचारांपासून दूर जातील असे समजणे म्हणजे स्वतःची फसवणूक करणे आहे. अमेरिकेतील ९/११ पासून ते दिल्लीतील १०/११ पर्यंत घडलेल्या दहशतवादी घटनांमधून लवकरात लवकर हा बोध घेणे गरजेचे आहे.

(लेखक महाराष्ट्राचे निवृत्त पोलिस महासंचालक आहेत.)

# रविवारची पत्रे

## टीईटी: गुणवत्ता, न्याय आणि भविष्याचा समतोल

महाराष्ट्रातील शिक्षणव्यवस्था आज एका महत्त्वाच्या वळणावर उभी आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी पात्र, दक्ष आणि प्रशिक्षित शिक्षकांची गरज अधिकाधिक प्रकर्षाने जाणवू लागली आहे. याच पृष्ठभूमीवर मुलांसाठी मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कायदा, २००९ आणि शासनाच्या २०१३ मधील निर्णयाने शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) सर्व शिक्षकांसाठी अनिवार्य करण्यात आली. शिक्षकांची गुणवत्ता तपासण्यासाठी ही परीक्षा एक महत्त्वाचे साधन मानले गेले. परंतु गेल्या दहा वर्षांच्या प्रवासात या परीक्षेने काही गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत, ज्यावर विचारपूर्वक निर्णय घेण्याची आज अत्यंत गरज आहे.

टीईटी परीक्षेत उत्तीर्ण होण्याचे प्रमाण अत्यंत कमी राहिले आहे. २०१३ पासून आजपर्यंत जवळपास ३० लाख उमेदवारांनी या परीक्षेला बसूनही केवळ १.०६ लाख उमेदवार उत्तीर्ण झाले आहेत. हे प्रमाण फक्त ३.५ टक्के इतके आहे. इतक्या मोठ्या संख्येने प्रशिक्षणप्राप्त (डी.एड, बी.एड, एम.एड) उमेदवारांचा अपयश दर हा परीक्षा पद्धतीत, परीक्षेच्या कठीणतेत किंवा मूल्यांकन निकषांमध्ये असलेल्या विसंगतीकडे स्पष्टपणे निर्देश करतो. गुणवत्तेसाठी उच्च निकष ही आवश्यक बाब असली, तरी त्या निकषांची अंमलबजावणी वास्तवाशी संतुलित असायला हवी. अन्यथा योग्य शिक्षण घेऊनही शिक्षक बनण्याच्या तयारीत असलेल्या तरुणांसमोर रोजगाराचे दरवाजे कायमस्वरूपी बंद होण्याचा धोका निर्माण होतो.

याहून अधिक गंभीर परिस्थिती विद्यमान शिक्षकांची आहे. अनेक वर्षांपासून शाळांमध्ये सेवा बजावत असलेल्या शिक्षकांकडे डी.एड, बी.एड किंवा एम.एड सारखी आवश्यक शैक्षणिक पात्रता पूर्णपणे उपलब्ध आहे. त्यांनी शिक्षणाच्या गुणवत्तेचा स्तर सांभाळत मुलांमध्ये मूल्यशिक्षण, सुसंस्कार व शैक्षणिक प्रगती घडवून आणण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. परंतु टीईटीचे अनिवार्यत्व आणि अत्यंत कमी उत्तीर्णता दर यामुळे या शिक्षकांवर नोकरी असुरक्षिततेची छाया पसरली आहे. शिक्षण क्षेत्रात अनेक वर्षे सेवा दिल्यानंतरही अचानक असुरक्षिततेची भावना निर्माण होणे हे शिक्षकांच्या मानसिक आणि व्यावसायिक स्थिरतेवर विपरीत परिणाम करणारे आहे.

१ सप्टेंबर २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे टीईटीची अनिवार्यता अधिक बळकट झाली असून, सर्व शिक्षकांना या परीक्षेत उत्तीर्ण होणे बंधनकारक झाले आहे. त्यामुळे हजारो विद्यमान शिक्षकांना नोकरी गमावण्याची भीती निर्माण झाली आहे. यावर उपाय म्हणून, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या हितासाठी टीईटीच्या उत्तीर्णतेची मर्यादा ५० टक्क्यांपर्यंत शिथिल करणे हा एक समतोल दृष्टिकोन ठरू शकतो. यामुळे गुणवत्ता निकष कमी न करता अधिक वास्तववादी पातळीवर शिक्षकांच्या क्षमतेचे मूल्यमापन करता येईल. जगभरातील अनेक पात्रता चाचण्यांमध्ये ५० टक्के गुण हे आधारभूत उत्तीर्णतेचे प्रमाण मानले जाते. महाराष्ट्रातील टीईटी परीक्षेत ही मर्यादा लागू केल्यास खालील तीन महत्त्वाचे परिणाम अपेक्षित आहेत :


पहिला म्हणजे विद्यमान पात्र व अनुभवी शिक्षकांना नोकरीची सुरक्षितता लाभेल. त्यांच्यावर येणारा मानसिक ताण कमी होईल आणि ते अधिक केंद्रितपणे शैक्षणिक कार्य करू शकतील. दुसरे म्हणजे बेरोजगार असलेल्या प्रशिक्षित युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध होईल. टीईटी उत्तीर्ण न झाल्यामुळे अनेक तरुण नोकरीपासून वंचित राहतात; ५० टक्के उत्तीर्णता निकषामुळे ही समस्या मोठ्या प्रमाणात सुटेल आणि तिसरा म्हणजे शाळांमधील शिक्षकांची कमतरता दूर होईल, ज्यामुळे शैक्षणिक प्रक्रिया अधिक सुरळीतपणे पार पडेल.

राज्य शासनाने या प्रश्नाचा विचार केवळ एक प्रशासकीय निर्णय म्हणून न करता सामाजिक आणि शैक्षणिक परिणामांच्या दृष्टीने करणे आवश्यक आहे. शिक्षक हे शिक्षणव्यवस्थेचे कणा आहेत. त्यांच्या सुरक्षिततेचा, आत्मविश्वासाचा आणि व्यावसायिक स्थैर्याचा थेट संबंध विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेशी आहे. आज महाराष्ट्राचे शिक्षक शासनाकडे अपेक्षेने पाहत आहेत. प्रशिक्षित शिक्षकांची कौशल्ये, त्यांचा अनुभव आणि समाजघडणीसाठीचे योगदान लक्षात घेऊन टीईटीसंदर्भात योग्य, न्याय्य आणि सुजाण निर्णय घेणे अत्यावश्यक आहे.

**सचिन चव्हाण**/९१५८३९३२६०

## नको रे मना क्रोध खेदकारी

समर्थ रामदास स्वामी यांनी ''मनाचे श्लोक''ची रचना केली आहे. त्यात मनाला असे समजावले आहे की क्रोध आल्यानंतर मनाला खेद उत्पन्न व्हावयास नको. क्रोधाची गणना षडरिपूमध्ये होत असली तरी विवेकरुपी क्रोध हा सकृद्दर्शनी व्यक्त होत नसून हा अन्याय, विषमता, व्यवस्था विरुद्ध व्यक्त होऊन त्यास क्रांती किंवा चळवळीचे स्वरूप प्राप्त होऊ शकते, जनसामान्यांचे हित साधले जाते, समर्थन प्राप्त होऊ शकते, ह्यास इतिहास साक्षी आहे. क्रोध हा अवगुण असला तरी शूर माणसाचा तो अलंकार आहे. अन्यायाच्या विरोधात लढण्यासाठी, शरीरात बळ संचारण्यासाठी क्रोध उत्पन्न झालाच पाहिजे. त्या शिवाय संरक्षण किंवा आक्रमण होऊ शकत नाही. शूर सैनिक जेव्हा उपरोक्त क्रिया करतो तेव्हा त्याच्या परिणामाची वाट पाहत नाही, कृतीबद्दल खेद पण व्यक्त करीत नाही. याचा अर्थ विवेकपूर्ण क्रोध आवश्यक आहे.



व्यक्तिगत क्रोध व्यक्त करताना झालेल्या परिणामाची (अपमान, नामुष्की, हानी, अपमान, हिंसा इ.) जाणीव झाली आणि खेद व्यक्त करून क्षमायाचना परिस्थिती निर्माण होणे म्हणजे त्या कृतीचे अपयश होय. प्रत्येक व्यक्तीची शारीरिक आणि मानसिक जडणघडण विभिन्न असते. आरोग्यशास्त्रानुसार आनुवंशिकता आणि जनुकीय रचना, तसेच आयुर्वेद शास्त्रानुसार वात, पित्त आणि कफ या सिद्धांतानुसार पित्त दोषांचे आधिक्य होणे हे स्वभाव अस्थिर, चंचल, अहंकारी आणि उष्ण प्रकृती असू शकतो.

षडरिपूंपैकी क्रोध हा मन, बुद्धी, चित्त व अहंकार या चतुष्टयपैकी 'चित्त'शी संलग्न आहे. आपण ज्या कुटुंबीयांत जन्म घेतो त्यातील मातुल वंश आणि पितृवंश (पूर्वज) कडून आलेल्या गुणसूत्रांनुसार चित्ताची बैठक तयार होऊन स्वभाव तयार होतो. स्वभाव बदलत नाही असे म्हटले जाते ते यासाठीच. क्रोधी स्वभावास काळ, वेळ, विषय व परिस्थितीचे भान नसल्याने मनाविरुद्ध झाले की तमवृत्ती उफाळून येते आणि अनर्थ घडतो. क्रोध त्वरित शमन झाला नाही तर रक्तदाब वाढून त्याचा शारीरिक व मानसिक प्रकृतीवर विपरीत परिणाम होत असतो.

आपल्या अवती-भवती, कुटुंबीय, मित्र मंडळ, समाजात अशा गुणांचे धनी आढळतात. ह्यांच्या स्वभावाचा अति जवळच्या किंवा सतत संपर्कात येणाऱ्या व्यक्तीवर नकारात्मक परिणाम होत असतो. त्या व्यक्तीच्या स्वभावाचा कयास बांधता येत नाही. क्रोधासोबत अहंकार, द्वेष यांनी मैत्री केली की एकत्रित कट कारस्थान करून भयानक प्रकार घडतात. दुसऱ्या व्यक्तीचे मन दुखावले असता नम्र होऊन क्षमायाचना करणे हे त्यांच्या बुद्धी आणि मनाला पटत नसते. स्वाभिमानाला ठेच लागली आहे, हे मनाला पटले निखारा रुपी क्रोध आतून धगधगत असतो आणि बळजबरी चित्त शांत ठेवून त्या अपमानाचा बदला घेण्यासाठी आसुरी योजना आखल्या जातात. ही लक्षणे असामाजिक तत्त्वाच्या व्यक्तीमध्ये प्रामुख्याने आढळतात आणि त्यातूनच अपहरण, कट, हिंसाचार, खून यासारखे भयानक प्रकार घडतात. अशा घटना होऊ नये म्हणून पालकांनी मुलांचा स्वभाव ओळखून वेळीच तज्ज्ञ मंडळींकडून समुपदेशन केल्यास स्वभावात बदल होण्यास मदत होऊ शकते.

नको रे मना क्रोध हा खेदकारी
नको रे मना काम नाना विकारी
नको रे मना सर्वदा अंगीकारु
नको रे मना मत्सरु दंभ भारू

समर्थ रामदास स्वामींनी या श्लोकात हाच उपदेश केला आहे.

**संजय पाठक**/नागपूर

## अर्बन नक्षलवादाचा अस्सल चेहरा

देशाच्या राष्ट्रीय स्मरणशक्तीशी खेळणाऱ्यांची संख्या आज इतकी वाढली आहे की जणू विस्मरणता हेच त्यांचं प्रमुख राजकीय साधन बनलं आहे. स्वतःला पर्यावरणवादी, मानवतावादी, उदारमतवादी म्हणवणारी एक टोळी आज देशाच्या मुळांवर असा घाव घालत बसली आहे की, त्यांच्या शब्दांतील मधुरतेच्या आड लपलेली विषारी धार सामान्य माणसाला कळतच नाही. समाजाला भुलवणे, राष्ट्राला अपराधी ठरवणे आणि हिंसेला 'प्रतिरोध' म्हणून गौरवणे हा नवीन फॅशन ट्रेंडच जणू बनलाय.



हेच लोक जंगल वाचवण्याच्या नावाने पहिल्यांदा समोर येतात आणि काही दिवसांतच त्यांच्या लिखाणात, भाषणांत हिडमासारख्या रक्तपिपासू दहशतवाद्यांचा 'पुरस्कृत' प्रतिकार दिसू लागतो. थोडं मागे पाहा- जंगल जपायचं म्हणताना ते माणसांना जाळणाऱ्यांच्या बाजूने उभे राहिले. आदिवासींना न्याय द्यायचा म्हणताना त्यांनी देशावर गोळ्या झाडणाऱ्यांना तारणहार म्हटलं. आणि विरोध केल्यावर तुमचं-माझं देशप्रेम हिणवलं. तेव्हा कुणी विचारतच नाही, एका हातात संविधानाची शपथ आणि दुसऱ्या हातात हिंसेला मूक पाठिंबा! हा कोणता उदारमतवाद? कोणता मानवतावाद?

या लेफ्टिस्ट जमातीचं तर्क असं विकृत झालं आहे की जो देशाचा शत्रू असेल तो त्यांचा मित्र; आणि जो देशाचं भलं करेल तो त्यांच्या नजरेत 'फॅसिस्ट'. देशाची सेना त्यांना अत्याचारी वाटते, पण देश तोडणाऱ्यांना ते क्रांतिकारी म्हणतात. त्यांना नागरी हक्क तेव्हाच आठवतात जेव्हा दगड भारताला लागतो; हुतात्मा जवानांचे रडणारे आई-वडील कधी त्यांना दिसतच नाहीत. 'अंधश्रद्धा' म्हणत मंदिरांवर टीका करणारेच लोक एका खुनी विचारसरणीला धर्माच्या रूपात साजरे करतात. त्यांना हिडमा 'प्रतिकार' वाटतो; पण त्याच्यामुळे एका मुलाचा बाप, एका स्त्रीचा पती, एका आईचा मुलगा मृतदेहात घरी पोचतो हे त्यांना दिसत नाही. दिसतं ते फक्त आपलं अजेंडा, आपलं 'सेक्युलर' सर्टिफिकेट आणि आपल्या गटातल्या उरलेल्या लोकांचं टाळ्यांचं राजकारण.

स्वतःला 'वर्गसंघर्ष' समजवणारेच लोक देशातला सर्वांत मोठा संघर्ष राष्ट्र आणि राष्ट्रद्रोह यांचा संघर्ष कधीच मान्य करत नाहीत; कारण त्यांची प्राणज्योतच राष्ट्रद्रोहात आहे. ते देशाचे नसतातच; ते एका 'नॅरेटिव्ह' चे असतात. त्यांचं देशप्रेम तेव्हाच पेटतं जेव्हा पाकिस्तानची बाजू घ्यायची वेळ येते. त्यांचा संविधानवाद तेव्हाच जागा होतो जेव्हा देशाचे कायदे मोडणाऱ्यांना संरक्षण द्यायचं असतं. आणि सर्वांत मजेशीर हे लोक स्वतःला 'विचारवंत' म्हणवतात. पण त्यांच्या सर्व विचारांचा पाया एकच भारत नेहमी चुकीचा, हिंदू समाज नेहमी दोषी आणि राष्ट्र नेहमी अपमानास पात्र. त्यांना कधीच दिसत नाही की हे राष्ट्र त्या लोकांचं आहे ज्यांनी आपल्या रक्ताने इतिहास लिहिला आहे. ज्यांच्या हाडांवर हा देश उभा आहे त्यांचा अपमान करणेच त्यांच्या बुद्धिमत्तेचा 'मार्क' बनून बसला आहे.

हिंसेची व्याख्या त्यांनी अशी केली आहे की दहशतवाद्यांच्या हातून जे मरतात ते त्यांच्या नजरेत 'स्टेट-कोलेटरल'. पण जेव्हा देशद्रोह्याला अटक केली जाते तेव्हा ते म्हणतात 'लोकशाही मरत आहे.' अरे लोकशाहीचा गळा तुम्हीच तर घोटताय आपल्या शब्दांनी, आपल्या लेखांनी, आपल्या विषारी मतांनी! ही मंडळी बाहेरून नरम, आतून कठोर; वरून शहाणी, आतून षडयंत्री. देशाच्या नकाशात भेगा पाडण्याच्या योजनेचा भाग असूनसुद्धा ते स्वतःला विवेकवादाचे रक्षक समजतात. त्यांना देश फुटला तरी त्रास होत नाही; पण राष्ट्रवाद बोलणारा एकही आवाज वर उठला की त्याची त्यांना प्रचंड चीड येते.

आज या अर्बन नक्षलवाद्यांचा एक अजून धोकादायक चेहरा समोर आला आहे. सेंट्रल युनिव्हर्सिटीजमध्ये प्रवेश मिळवणे, तिथे बसून आपली पिलावळ तयार करणे आणि नंतर योग्य वेळ आली की देशाच्या पाठीवर सुरा खुपसणे. हीच त्यांची दशकभराची रणनीती आहे. वर्गात शिक्षक, वसतिगृहात मार्गदर्शक, चर्चासत्रात विचारवंत आणि पडद्यामागे राष्ट्रद्रोही कारवायांचे कारखानदार. देशाच्या पैशावर शिकायचं, देशाच्या संस्थांमध्ये वाढायचं आणि वेळ आल्यावर देशालाच खायचं या परजीवी वृत्तीला आता आवर घालण्याची वेळ आली आहे. आणि स्पष्ट सांगायला हवं हा प्रकार यापुढे खपवून घ्यायचा नाही.

हे लोक देशाचा नाश बंद खोलीतल्या चर्चेत करत नाहीत; ते हा नाश समाजातल्या भोळ्याभाबड्या मनात करतात. त्यांची भाषा गोड, मुद्रा सोज्ज्वळ, पण हेतू भयंकर.

आज आवश्यक आहे निर्भीडपणे म्हणणं- ''जो देशाला कमजोर करतो तो कुठल्याही विचारसरणीचा असो तो शत्रूच.'' आणि ''जो भारताच्या बाजूने उभा राहतो तो माझा.''

**प्रा. भागवत माणिकराव भांगे**/७२७६४६९८००

## गीतेच्या गाभाऱ्यात

गीतेच्या गाभाऱ्यात प्रवेश करताच तन मन तेजोमय होते अशी ही गीतेची महती... अनुभव हीच खात्री आहे त्यासाठी गीता वाचन, मनन आणि चिंतन केले पाहिजे... धर्माने चालणाऱ्या व्यक्तींवर बरेचदा पेचप्रसंग येतात पण धर्माचा बारकावा न उमगल्याने त्याची पेचप्रसंगातून सुटका होत नाही. कृष्ण असा आहे ज्याने धर्म जाणला आणि त्यामुळे कोणत्याही परिस्थितीवर मात करण्याची शक्ती त्याच्या ठायी आहे. मानवी जीवनात जेव्हा पेच निर्माण होतो तेव्हा कृष्णाचे तत्त्वज्ञान जाणून घेणे आवश्यक आहे कारण त्यातूनच कोणत्याही समस्येवर तोडगा मिळतो ही शाश्वती आहे.

कृष्णाने निरनिराळ्या विचारांचे समुद्र मंथन करून मानवी जीवनातील प्रत्येक समस्येवर उपयोगी पडणारे अमृत निर्माण केले हेच गीतामृत होय. भोगाच्या आणि त्यागाच्या टोकाला गेलेला समाज अध:पतित होतो पण भोग आणि त्याग, प्रवृत्ती आणि निवृत्ती यांचा सुवर्णमध्य साधतो तोच या जगात कृतार्थ होतो. कृष्णाने आपल्या तत्त्वज्ञानाने प्रवृत्ती आणि निवृत्ती यांचा सुरेख समन्वय केला म्हणूनच सर्व तत्त्वज्ञानात सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञान म्हणजे गीतेचे तत्त्वज्ञान आहे.

कृष्णाने जीवनातील सर्व तत्त्वज्ञान जाणून असे जीवनामृत तयार केले की जीवनातील कोणत्याही परिस्थितीत ते खात्रीने उपयोगी आहे. कृष्णाने वैदिक लोकांची कर्मनिष्ठा, वेदांती लोकांची संन्यासनिष्ठा, सांख्य लोकांची ज्ञाननिष्ठा व योगी लोकांची चित्त निरोधनिष्ठा या सर्वांना मान दिला आणि कर्तव्य कर्माचे तिळ भक्तीच्या साखरेत घालून असा अप्रतिम हलवा तयार केला की हा हलव्याचा मेवा म्हणजे मानवी जीवनातील अनमोल ठेवा ठरला आहे.

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

### आजचे संघगीत-९८

रविवार, ३० नोव्हेंबर २०२५

**उजाळिले तू तममय जीवन संघयुगाचा शालीवाहन**

उजाळिले तू तममय जीवन संघयुगाचा शालीवाहन ॥धृ.॥

कर्मयोग तव ज्वलंत प्रेरक मातीतुनही उठले सैनिक
वाण सतीचे घेउनि दाहक प्रकाश फुलवित अंधारातुन ॥१॥

सामर्थ्यातुन तत्त्वाचा जय धर्म रक्षण्या शक्तीसंचय
राष्ट्र आपुले हे मृत्युंजय तूच दाविले निजहवनातुन ॥२॥

हिंदुत्वाचा विशाल सागर विभिन्नतेच्या लाटा वरवर
परी अंतरी एकच सुस्वर जागविले हे सत्य सनातन ॥३॥

तव शब्दांचे अमृतसिंचन देशाचे या फुलले यौवन
पुरुषार्थाचे जगण्या जीवन अगणित सेवक झिजले कणकण ॥४॥

महिमा आता संघयुगाचा विशालतेचा उदात्ततेचा
जीवन इथले बहरविण्याचा तुझी तपस्या मंगल पावन ॥५॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# नळदुर्ग नगरपालिकेच्या निवडणुकीत काँग्रेस-शिवसेना (ठाकरे) युतीची शक्तीप्रदर्शन सभा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२९ नोव्हेंबर -**

नळदुर्ग शहराच्या विकासासाठी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार अशोक जगदाळे यांच्या हातात नळदुर्गच्या तिजोरीची चावी द्या, असे आवाहन काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव व आमदार अमित देशमुख यांनी जाहीर सभेत केले.

२९ नोव्हेंबर रोजी भवानी चौकात झालेल्या या सभेला काँग्रेस-शिवसेना (ठाकरे) युतीच्या प्रचारासाठी प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता. सभेस पूर्वी संविधान चौकातून भव्य पदयात्रा काढण्यात आली. जनतेला संबोधित करताना अमित देशमुख म्हणाले की, महायुती सरकारने राज्यावर १० लाख कोटींचे कर्ज लादले आहे. कंत्राटदारांना पैसे न दिल्याने राज्यात प्रथमच ते उपोषणाला बसले आहेत. तुळजापुरात




ड्रग्जचे लोन पोहोचल्याची स्थिती गंभीर असून, अशा गुन्ह्यात आरोपी असलेल्या व्यक्तीला भाजपकडून उमेदवारी देणे अत्यंत लज्जास्पद आहे.

अशोक जगदाळे हे स्वच्छ प्रतिमेचे उमेदवार असून त्यांच्या नेतृत्वाखाली नळदुर्ग शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, असेही ते म्हणाले.

खासदार ओमराजे निंबाळकर यांनीही सरकार व स्थानिक नेतृत्वावर तीव्र टीका करताना म्हटले की, धाराशिव जिल्हा केंद्राच्या दरिद्री जिल्ह्यांच्या यादीत तिसऱ्या क्रमांकावर आहे.

गेली ४०-४५ वर्षे मंत्री असणाऱ्या नेतृत्वाने जिल्ह्याचा विकास केला नाही, पण स्वतःची संपत्ती मात्र वाढवली येड्या बाभळीची शेती करून कोणाच्या गाड्या ८ कोटींच्या झाल्या? असा टोला त्यांनी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांना लगावला.

सभेत आमदार प्रविण स्वामी, नगराध्यक्ष उमेदवार अशोक जगदाळे यांनीही भाषणे केली. प्रास्ताविक कम लाकर चव्हाण यांनी केले तर सूत्रसंचालन संतोष पुदाले यांनी केले.

युतीच्या पदाधिकारी-कार्यकर्त्यांसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. पदयात्रा आणि सभेला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे युतीत उत्साहाचे वातावरण दिसून आले.

# नळदुर्गमध्ये विवाह सोहळ्यात सामाजिक उपक्रमाची अनोखी जोड

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२९ नोव्हेंबर -**

नळदुर्ग येथील धोंडीराम निंगु अंगुले यांचे सुपुत्र काशिनाथ आणि सोलापूर येथील शिवाजी तायाप्पा बनसोडे यांची कन्या पूजा यांचा विवाह सोहळा दि. २६ नोव्हेंबर रोजी नळदुर्ग येथे उत्साहात पार पडला. या मंगल सोहळ्याला सामाजिक भानाची अनोखी जोड देण्यात आली.

गणेश धोंडीराम अंगुले यांच्या संकल्पनेतून भारतीय संविधान दिनाच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधत चैतन्य मुकबधिर विद्यालयातील विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय बॅग, वह्या, पेन, कंपास पेटी आदी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, संत रविदास आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक पठण करून कार्यक्रमाला राष्ट्रभावनेची प्रेरणादायी सुरुवात दिली. शैक्षणिक साहित्य वितरण कार्यक्रमात नववधू-वरांचे आई-वडील आणि परिवारासह निवृत्त पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल अंगुले, निवृत्त केंद्रप्रमुख अरुण अंगुले, सहाय्यक पोलीस निरीक्षक कांचन कानडे, उद्योजक अनिल भिसे, राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक भैरवनाथ कानडे, दिलीप अंगुले, दत्तात्रय अंगुले, उद्योजक अमित शेडगे, अमितकुमार नाईक, रमेश जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

विवाह सोहळ्यास सामाजिक जाणिवेची जोड देत अंगुले परिवाराने समाजापुढे उत्कृष्ट आदर्श ठेवला असून या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# जिल्हास्तरीय युवा महोत्सवात तेरणा महाविद्यालयाचा उत्कृष्ट सहभाग




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ नोव्हेंबर -**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नेहरू युवा केंद्र आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तर युवा महोत्सव २०२५ मध्ये तेरणा महाविद्यालयाच्या सात विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये उत्तम यश मिळवले.

चित्रकला स्पर्धेत जगदीश सुतार द्वितीय, गौरी सुतार तृतीय, वक्तृत्व स्पर्धेत समीर शेख तृतीय, तर विज्ञान प्रदर्शनात दीक्षा मस्के, तनुजा सावतार, स्नेहा शिंदे व मेघराज पोतदार यांच्या समूहाने तृतीय क्रमांक पटकावला.

नांदेड येथे होणाऱ्या विभागीय युवा महोत्सवासाठी संगणकशास्त्र विभागातील अंतिम वर्षातील विद्यार्थी जगदीश सुतार याची चित्रकला स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

महाविद्यालयातील आरॲंडडी विभागाच्या उपक्रमांना स्टार्टअपमध्ये रूपांतर करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे प्राचार्य डॉ. विक्रम सिंह माने यांनी सांगितले. महाविद्यालयात यापूर्वीही मानवी रोबोट, इलेक्ट्रिकल कार-स्कूटर, RFID आधारित उपस्थिती प्रणाली, लोकेशन बेस्ड वर्क ट्रॅकिंग यांसारखे प्रकल्प पूर्ण करण्यात आले आहेत.

कार्यक्रमासाठी डॉ. सुशीलकुमार होळंबे, प्रा. रवींद्र गुरव, प्रा. ठाकूर, प्रा. भक्ते, प्रा. चव्हाण, प्रा. पिंपळे, प्रा. बोंदर, डॉ. ननवरे यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल तेरणा ट्रस्टचे प्रा. गणेश भातलवंडे तसेच सर्व विभाग प्रमुख यांच्यासह आदिंनी अभिनंदन केले.

# प्रेमप्रकरणातून एकास मारहाण

**धाराशिव, दि.२९ नोव्हेंबर -**

प्रेमप्रकरणावरून तरुणाला मारहाण केल्याप्रकरणी सहा जणांविरुद्ध धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि.१८ नोव्हेंबर रोजी पहाटे येडशी घाटात विशाल गायकवाड (२५) यांना आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी, लाकूड व बेल्टने मारहाण करून जखमी केले तसेच जिवे ठार मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी धीरज गायकवाड, परशुराम गायकवाड, हणमंत ईटकर, सुरज ईटकर, गणेश गायकवाड (सर्व तक्रार दाखल केली.

# कळंब नगरपरिषद निवडणूक २०२५ : मतदान केंद्र कर्मचाऱ्यांसाठी दुसरे प्रत्यक्ष प्रशिक्षण संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२९ नोव्हेंबर -**

कळंब नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पारदर्शक व सुरळीत मतदान प्रक्रियेसाठी आज दि.२९ नोव्हेंबर रोजी शहरातील सर्व मतदान केंद्रावरील नियुक्त अधिकारी आणि कर्मचार्यांसाठी दुसरे HNDS ON TRINING (प्रत्यक्ष प्रशिक्षण) आयोजित करण्यात आले.



प्रशिक्षण कार्यशाळेत निवडणूक निर्णय अधिकारी हेमंत ढोकले आणि सहा. निवडणूक निर्णय अधिकारी व मुख्याधिकारी मंजूषा गुरमे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणात उपस्थित कर्मचाऱ्यांना EVM² मशीन संचालना, तांत्रिक बाबी, कागदपत्रे, विविध लिफाफेयाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. प्रशिक्षणादरम्यान कर्मचाऱ्यांनी प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून EVM² मशीन संचालन आणि मतदान प्रक्रियेत येणाऱ्या संभाव्य अडचणी समजून घेतल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नगरपरिषदेचे कर्मचारी कर निर्धारण अधिकारी अजय काकडे, संगणक अभियंता महेश माने, सहा. प्रकल्प अधिकारी विक्रम समुद्रे यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

नगरपरिषद प्रशासनाने स्पष्ट केले की, या प्रशिक्षणामुळे सर्व मतदान केंद्रावरील कर्मचाऱ्यांचे कार्यकुशलता आणि मतदान प्रक्रियेतील पारदर्शकता सुनिश्चित केली जाईल.

# तुळजापूर पंचायत समितीचे माजी उपसभापती उतरणार जिल्हा परिषदेच्या आखाड्यात !

## चित्तरंजन सरडे भाजपाकडून उमेदवारीचे प्रमुख दावेदार...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ नोव्हेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ येथील पंचायत समितीचे माजी उपसभापती चित्तरंजन सरडे आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपाकडून प्रमुख दावेदार म्हणून पुढे येत आहेत.

धाराशिव जिल्हा परिषदेतील एकूण ५५ जागांपैकी २८ जागा महिलांसाठी राखीव आहेत. तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ जिल्हा परिषद गट कायमस्वरूपी चर्चेत असतो. यंदाच्या निवडणुकीत मंगरूळ जिल्हा परिषद मतदारसंघ सर्वसाधारण महिला श्रेणीत राखीव झाल्याने मंगरूळमधील माजी उपसभापती चित्तरंजन सरडे यांच्या पत्नी स्वाती चित्तरंजन सरडे यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

### आ. राणाजगजितसिंह पाटील यांचे विश्वासू सहकारी म्हणून सरडे यांची ओळख...

मंगरूळ पंचायत समिती गणातील माजी उपसभापती चित्तरंजन सरडे हे आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि अर्चनाताई पाटील यांचे विश्वासू सहकारी म्हणून स्थानिक राजकीय वर्तुळात ओळखले जातात. तालुक्याच्या विकासासाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांत त्यांनी सातत्याने सहभाग,पक्षाच्या कार्यक्रमांचे आयोजन,गावात इंग्रजी स्कुलची निर्मिती,महिलांसाठी प्रतिवर्षी हळदी कुंकू उपक्रम, गावपातळीवरील अडचणींचे निराकरण, तसेच विविध योजनांच्या पाठपुराव्यात सरडे यांनी दाखविलेल्या सक्रिय भूमिकेमुळे जिल्हा परिषद निवडणुकीतील त्यांच्या दावेदारीला अधिक वजन मिळत असल्याचा राजकीय अंदाज वर्तविला जात आहे.




मंगरूळ जिल्हा परिषद गटात मंगरूळ आणि आरळी बुद्रुक पंचायत समिती गणाचा समावेश असून दोन्ही गणात सरडे यांचा सकारात्मक राजकीय आणि मैत्रीपूर्ण संवाद महत्वाचा ठरतोय. सध्या तालुक्यात विविध पक्षांचे अंतर्गत समिकरण वेगाने बदलत असून, नवीन चेहरे पुढे येत आहेत. अशा परिस्थितीत माजी उपसभापतींच्या उमेदवारीमुळे काही प्रस्थापित राजकीय समीकरणांना धक्का बसू शकतो, अशी राजकीय वर्तुळातील चर्चा आहे.





राजकिय तरुण भारत दंगल

भाजपच्या तालुकास्तरीय बैठकीत आणि इतर स्थानिक पातळीवरील नेत्यांमध्ये स्वाती चित्तरंजन सरडे यांच्या नावाची चर्चा सुरू असून सरडेंच्या नावाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्षा अर्चनाताई पाटील आणि आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या ममाध्यमातून मंगरूळ मतदार संघाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी स्वातीताई सरडे यांना उमेदवारी मिळेल अशी खात्री आहे. अंतिम निर्णय मात्र पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाकडेच राहणार असून अधिकृत घोषणा लवकरच अपेक्षित आहे.

तुळजापूर पंचायत समितीचे माजी उपसभापती चित्तरंजन सरडे यांनी आपल्या कार्यकाळात ग्रामीण भागातील संघटन बांधणी, विकासकामांमध्ये पुढाकार तसेच कार्यकर्ते आणि ग्रामस्थांमध्ये असलेला मजबूत संपर्क यामुळे त्यांच्या नावावर पक्षांतर्गत स्तरावर गंभीर चर्चा सुरू आहे.

स्वाती चित्तरंजन सरडे यांचा जिल्हा परिषदेच्या राजकीय रिंगणात प्रवेश झाल्यास स्पर्धा अधिक रंगतदार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पक्षाकडून अधिकृत उमेदवारीची घोषणा अद्याप झालेली नसली तरी, महिला आरक्षणामुळे स्वाती सरडे यांच्या संधींना बळ मिळाले असून, या मतदारसंघात नवीन समीकरणे तयार होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

# पांगरदरवाडीच्या भावना चौधरी डॉक्यूमेंटरी स्पर्धेत प्रथम

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ नोव्हेंबर -**

तालुक्यातील जि प प्रा शाळा, पांगरदरवाडी येथील भावना बाबुराव चौधरी यांनी डॉक्यूमेंटरी स्पर्धेत प्रथम व व्हिडीओ निर्मिती स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकविला.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांच्या वतीने २०२५-२०२६ शिक्षक अधिकारी कर्मचारी यांच्या बेचाळीस स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. भावना चौधरी यांनी दिनांक २८ नोव्हेंबर रोजी झालेल्या डॉक्यूमेंटरी स्पर्धेत तुळजापूर तालुक्यातून अव्वलं क्रमांक पटकविला. त्यामुळे त्यांना पुढे विभाग स्तरावर संधी मिळणार आहे.



या यशाचे कौतुक डाएट प्राचार्य डॉ. दयानंद जटनुरे, अधिव्याख्याता डॉ. शोभा मिसाळ, डॉ. मलिंद आघोर, डॉ. बिराप्पा शिंदे, गटशिक्षणाधिकारी अर्जुन जाधव, दळवी, उंबरे, गायकवाड, वाकडे, उंडे, मुख्याध्यापक व्यंकट कोळी, शिक्षकवृंद आणि शालेय समिती व शिक्षणप्रेमी नागरिकांनी कौतुक करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# पोद्दार इंटरनॅशनल स्कूल, धाराशिव येथे वार्षिक क्रीडा दिन उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ नोव्हेंबर -**

पोद्दार इंटरनॅशनल स्कूल, धाराशिव येथे वार्षिक क्रीडा दिन मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सौम्यश्री किर्ती पुजार, तसेच पोडार हब लातूरचे जनरल मॅनेजर श्री. प्रसाद पोंक्षे यांचे ढोल-ताशा आणि लेझीम पथकाच्या तालावर स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात स्कूलचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंच्या हस्ते टॉर्च रन आणि नंतर ध्वजारोहण करून करण्यात आली.

प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना खेळांमधून मिळणाऱ्या मूल्यांचे महत्त्व समजावून सांगत त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रे व बक्षिसे वाटप करण्यात आले.

# नळदुर्ग नगरपरिषद निवडणूक : भाजप उमेदवार प्रचारार्थ ग्रामीण भागातील कार्यकर्ते सक्रिय

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२९ नोव्हेंबर -**

नळदुर्ग नगरपरिषद निवडणुकीत भारतीय जनता पक्षाकडून नगराध्यक्षपदासाठी बसवराज आप्पा धरणे तसेच युतीतील २० उमेदवारांच्या प्रचारासाठी अणदूर परिसरासह ग्रामीण भागातील कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर सक्रिय झाले आहेत. तालुक्यातील विविध गावांमध्ये प्रचाराची जबाबदारी अनेक पदाधिकाऱ्यांना देण्यात आल्याने पक्षाची प्रचारयंत्रणा वेग घेत असल्याचे समजते.

नगराध्यक्षपदासाठी पंचरंगी लढत रंगत असून, प्रमुख सामना काँग्रेसचे उमेदवार अशोक जगदाळे आणि भाजपाचे बसवराज धरणे यांच्यात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, युवा नेते सुनील चव्हाण यांच्या सक्रिय सहभागामुळे निवडणूक अधिक चुरशीची बनली आहे. अणदूर, खुदावाडी, फुलवाडी, केशेगाव, इटकळ, नंदगाव, शहापूर, जळकोट आदी गावांमधील भाजप कार्यकर्ते बूथस्तरावर प्रचार करत असून दीपक आलुरे, साहेबराव घुगे, दत्ता राजमाने, निहाल काझी, विलास राठोड, अरविंद पाटील, आशिष सोनटक्के, संजय मोटे, भिवा इंगोले, सिद्धेश्वर कोरे आदी कार्यकर्ते विविध वार्डांमध्ये कॉर्नर सभा व घरभेटी घेत आहेत.

प्रचारादरम्यान केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात येत असून, ग्रामीण व पंचक्रोशी भागातून मिळत असलेल्या प्रतिसादामुळे पक्षाचा आत्मविश्वास वाढल्याचे सांगितले जाते.

दरम्यान, आमदार राणा पाटील, नितीन काळे, दत्ताभाऊ कुलकर्णी, सुजितसिंह ठाकूर आदी नेते निवडणूक प्रक्रियेकडे लक्ष ठेवून आहेत. शहरातील मतदारसंख्येतील युवा नेते सुनील चव्हाण यांचा प्रभावी पक्षासाठी निर्णायक ठरू शकतो, असे पक्षातील सूत्रांचे मत आहे.

# अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२९ नोव्हेंबर -**

उमरगा शहरातील काळे प्लॉट येथील सुलेमान जाफरसाब पटेल यांच्यावर प्रतिबंधित गुटखा साठवून विक्रीसाठी जवळ बाळगल्याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

दि. २८ नोव्हेंबर रोजी उमरगा पोलीस पथकास आई साहेब मंगल कार्यालयाच्या पाठीमागे, एस.टी. कॉलनी, उमरगा येथे आरोपी गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत ठिकाणी धाड टाकली.

येथे विमल पान मसाला, त-१ टोबॅको आदी गुटख्याचा सुमारे रु. १४,६४० किंमतीचा साठा मिळून आला.

# आर.पी. कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये ओरिएंटेशन व फ्रेशर्स पार्टी उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ नोव्हेंबर -**

डॉ. वेदप्रकाश पाटील शैक्षणिक संकुल, गडपाटी, धाराशिव येथील आर. पी. कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये डी. फार्मसी, बी. फार्मसी व एम. फार्मसीच्या प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी ओरिएंटेशन आणि फ्रेशर्स पार्टीचे भव्य आयोजन करण्यात आले. डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.



कार्यक्रमाला शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय, धाराशिव येथील रोगनिदानशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मयूर देशमुख आणि रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांची प्रमुख उपस्थिती लाभली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेख गाझी यांनी प्रास्ताविकातून नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत करत महाविद्यालयातील विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली.

मार्गदर्शन करताना डॉ. मयूर देशमुख यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत, फक्त 'एंड यूजर' न बनता संशोधनाची आवड जोपासून 'ड्रग मेकर्स' बनण्याचे आवाहन केले. त्याचप्रमाणे प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांनी औषध निर्मिती क्षेत्रातील नवनवीन संधींचा लाभ घेत विद्यार्थ्यांनी स्वतःचे आणि देशाचे नाव उज्ज्वल करावे, असे सांगत पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

मार्गदर्शन सत्रानंतर फ्रेशर्स पार्टीला सुरुवात झाली. विविध मनोरंजक गेम्समध्ये सहभागी होत विद्यार्थ्यांनी उत्साह व्यक्त केला. स्पर्धांमधून मिस्टर फ्रेशर्स आणि मिस फ्रेशर्स पुरस्कारांसाठी विजेत्यांची निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन मधुलक्ष्मी थोरात, स्नेहा गरड, मंदार माने, सिद्धी विभुते यांनी केले.

या कार्यक्रमाला बी. फार्मसी, डी. फार्मसी व एम. फार्मसीचे विद्यार्थी, पालक तसेच प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# योगेश्वरी कर्मचारी पतसंस्थेत सहकार विभागाचे संचालक,कर्मचारी प्रशिक्षण वर्ग संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२९ नोव्हेंबर**

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ म पुणे चे सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर, मा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड व योगेश्वरी शिक्षण संस्था कर्मचारी सहकारी पतसंस्था म अंबाजोगाई यांचे संयुक्त विद्यमाने अंबाजोगाई येथे तालुक्यातील नागरी, ग्रामीण बिगरशेती, पगारदार सहकारी पतसंस्था संचालक, कर्मचारी प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले.



कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी योगेश्वरी महाविद्यालय कर्मचारी पतसंस्थेचे अध्यक्ष बी. के. मसने होते. दोनदिवसीय प्रशिक्षण वर्गात जयंत पाठक सहाय्यक निबंधक सहकारी संस्था अंबाजोगाई, सहकार अधिकारी विलास मोरे, योगेश्वरी महाविद्यालय कर्मचारी पतसंस्थेचे सचिव आर. एम. साळवी, प्रमाणित लेखा परीक्षक सी. ए. खोडसे, सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर चे उपप्राचार्य एस.आर. कोळे, वसुंधरा महिला नागरी सहकारी बँकेचे सीईओ जयप्रकाशजी शर्मा, यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन, चर्चा करण्यात आली. सर्व सर्वच व्याख्यात्यांनी पतसंस्थांची कार्यपद्धती, सहकार क्षेत्रातील होणारे बदल तसेच सहकार विभाग नियमक मंडळातील नवीन परिपत्रकांचा दाखला देत ठेवी आणि कर्जे यांचा समन्वय साधण्याबाबत मार्गदर्शन केले सीडी रेशो, सी आर आर ,एस एल आर ,सी आर ए आर या विषयी विस्तृत माहिती देण्यात आली पतसंस्थांनी सांभाळावयाचा एनपीए रेशो कर्ज वसुली १०१ ची कारवाई याबाबत ही उहापोह करण्यात आला.

समारोप समारंभाच्या अध्यक्ष स्थानी योगेश्वरी महाविद्यालय कर्मचारी पतसंस्थेचे कोषाध्यक्ष शिवहर ढगे यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्र संचलन, आभार प्रदर्शन वर्ग संयोजक एस.आर. कोळे लातूर यांनी केले.

# पालक मेळावा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० नोव्हेंबर**

दीनदयाल शोध संस्थान संचलित, गोकुळ शिशु वाटिका बीड चा २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील प्रथम पालक मेळावा




दिनांक २९ नोव्हेंबर रोजी संपन्न झाला. पालक मेळाव्याची सुरुवात पंडित दीनदयाल उपाध्याय व भारतरत्न नानाजी देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलनाने करण्यात आली. व्यासपीठावर शैक्षणिक समितीचे सदस्य,डॉ.मधुराताई कुलकर्णी, गंगाधर देशमुख , श्रीमती सुनंदाताई कुलकर्णी, प्रभारी मुख्याध्यापक अर्चना मोराळे व गोकुळ शिशू वाटिका प्रमुख आरती जोशी उपस्थित होते. पालक मेळावा वर्गनीहाय आयोजित करण्यात आला होता. अनुक्रमे सर्वप्रथम स्वच्छंद गट, ध्रुव गट, प्रल्हाद गटांच्या पालकांसोबत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

प्रास्ताविक अर्चना मोराळे, आरती जोशी यांनी केले. स्वागत गीताचे सादरीकरण वैष्णवी कदम, मधुरा गुळवेलकर व जगदाळे यांनी केले. या मेळाव्यात पालकांनी विद्यार्थ्यांप्रती असलेल्या त्यांच्या समस्या मांडल्या, शाळेबद्दल चांगल्या प्रतिक्रिया दिल्या सुधारणा , चुका यावर देखील चर्चा करण्यात आली. व्यासपीठावरील मान्यवरांनी पालकांच्या शंकेचे निरसन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिता कुलकर्णी, स्नेहल गोसावी, स्वाती देशपांडे यांनी केले.पालक मेळावा यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षिका व इतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# बाळराजे पवारांचा संजयनगर भागात डोअर टू डोअर झंझावात

## मतदारांच्या अभूतपूर्व साथीने सौ.गीताभाभीसह सर्व उमेदवारांच्या विजयावर शिक्कामोर्तब

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.३० नोव्हेंबर**

गेवराई नगरपरिषद निवडणुकीत भाजपने सुरुवातीपासून जोरदार आघाडी घेतली असताना आज शेवटच्या टप्प्यात भाजप नेते बाळराजे पवार यांनी शहरातील राजकीय वातावरण अक्षरशः ढवळून काढले आहे. आज सकाळी त्यांनी संजय नगर भागात घेतलेल्या डोअर टू डोअर प्रचार फेरीने सौ.गीताभाभी व सर्वच प्रभागातील उमेदवारांच्या विजयावर शिक्कामोर्तब केले आहे.



भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. गीताभाभी बाळराजे (त्रिंबक) पवार यांच्या प्रचारात बाळराजे पवार यांनी संपूर्ण शहरातील प्रभागांसाठी आखलेले काटेकोर नियोजन आणि उमेदवारी प्रक्रियेत दाखवलेली अचूकता आता त्याचे परिणाम दाखवत आहे. गेल्या आठ दिवसांपासून त्यांनी घेतलेल्या सलग बैठकांमध्ये कार्यकर्त्यांना संघटित करून प्रत्येक प्रभागासाठी सर्वाधिक जनमत मिळवल्याचे दिसत आहे.

बाळराजे पवारांनी आज संजय नगरात घराघरांत जाऊन मतदारांच्या भेटी घेतल्या असता नागरिकांनी त्यांचे केलेले स्वागत, महिलांचा उत्साह, युवकांची उपस्थिती यामुळे भाजपची लाट स्पष्ट जाणवत आहे. या दरम्यान बाळराजे यांनी मतदारांना आवाहन केले की, भाजपच्या नगराध्यक्षांसह सर्व प्रभागातील उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करून गेवराईचा विकासरथ थांबू देऊ नका. गेवराईला विकासाचा मार्ग भाजपच दाखवू शकते. बाळराजे पवारांच्या या झंझावाती प्रचारामुळे राष्ट्रवादीच्या गोटात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. रस्त्यावर दिसणारी लोकांची गर्दी, प्रत्येक प्रभागातून मिळणारा सकारात्मक प्रतिसाद, भाजप उमेदवारांच्या बाजूने वाढती हवा हे सर्व पाहता राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता वाढलेली दिसत आहे. बाळराजे पवारांचा प्रचार दौरा शहरभर झंझावात निर्माण करत आसल्याने गेवराईत भाजपचा विजय अटळ आसल्याचे चित्र दिसत आहे

संजयनगर प्रभाग क्रमांक ३ व ४ मधील भारतीय जनता पक्षाचे अधिकृत उमेदवार ज्ञानेश्वर भाले, सज्जु बागवान, व प्रभाग ४ चे माऊली वांदे,अन्वर पठाण यांच्या प्रचारार्थ भेटीगाठी घेऊन भाजपाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.गिताभाभी पवार व सर्व उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन लोकनेते बाळराजे पवार यांनी मतदारांना केले यावेळी वार्डातील नागरिक पदाधिकारी उपस्थित होते

# महायुतीची विजयाकडे झेप:प्रभाग क्रमांक ५ मधील प्रचार पदयात्रेला प्रचंड प्रतिसाद: सर्वाधिक मताधिक्य देण्याचा निर्धार

### भरभक्कम साथ द्या; परळीचा सर्वांगीण विकास करण्याचे काम महायुतीकडूनच होईल- सौ.राजश्रीताई धनंजय मुंडे

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३० नोव्हेंबर**

नगर परिषद निवडणुकीत महायुतीला भरभक्कम साथ द्या, परळीचा सर्वांगीण विकास करण्याचे काम महायुतीकडूनच होईल असा विश्वास सौ.राजश्रीताई धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला.आपले खंबीर नेतृत्व आ.धनंजय मुंडे यांनी गेली अनेक वर्षे जनसेवेची कामे केलेली आहेत. साहेब व त्यांचे सर्व सहकारी कायमच काम करत आले आहेत. यापुढेही परळीचा चौफेर व सर्वांगीण विकास करण्याचे काम करतच राहणार. त्यामुळे काम करणाऱ्या महायुतीला भक्कम आशिर्वाद द्या असे आवाहन सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे यांनी केले.प्रभाग क्रमांक ५ मधील प्रचार पदयात्रेला प्रचंड प्रतिसाद देत आमच्या प्रभागातून महायुतीच्या नगराध्यक्षपदासह सर्व उमेदवारांना सर्वाधिक मताधिक्य देण्याचा निर्धार नागरिकांनी व्यक्त केला.



राष्ट्रवादी व महायुतीच्या नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी व प्रभाग क्रमांक ५ अ मधील अधिकृत उमेदवार सौ.जयश्री शंकरअप्पा मोगरकर,प्रभाग क्रमांक ५ ब मधील अधिकृत उमेदवार वैजनाथ भानुदास सोळंके यांच्या प्रचारार्थ सौ.राजश्रीताई धनंजय मुंडे यांनी डोअर टू डोअर जात या प्रभागात प्रचारफेरी काढली.या प्रचार पदयात्रेला प्रचंड प्रतिसाद मिळाला. या प्रभागातून महायुतीच्या सर्व उमेदवारांना सर्वाधिक मताधिक्य देण्याचा निर्धार नागरिकांनी व्यक्त केला.या प्रभागातील नागरिकांनी उस्फूर्त व आत्मियतेने स्वागत करत आमची शक्ती महायुतीच्याच पाठीशी असल्याची खात्री दिली. या प्रभागात ठिकठिकाणी जोरदार स्वागत झाले. यावेळी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी,प्रभाग क्रमांक ५ अ मधील अधिकृत उमेदवार सौ.जयश्री शंकरअप्पा मोगरकर,प्रभाग क्रमांक ५ ब मधील अधिकृत उमेदवार वैजनाथ भानुदास सोळंके यांच्यासह या प्रभागातील पदाधिकारी, महायुतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने या पदयाचे सहभागी झाले होते. या पदयात्रेत नागरिकांनी स्वयंपूर्ण सहभाग घेतला. महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचाराला उस्फूर्त प्रतिसाद देत एक प्रकारे या प्रभागातून महायुतीच्या नगराध्यक्षपदासह नगरसेवक पदाच्या उमेदवारांना सर्वाधिक मताधिक्य देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. या पदयात्रेला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता परळी नगरपरिषदेवर महायुतीचा झेंडा फडकणार यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

# सुभाष सुतार यांच्या ३० वर्षांच्या सेवेला मतदारांची साथ

## गेवराईत प्रभाग क्रमांक आठमध्ये कु.सोनाली सुतार यांच्या विजयावर शिक्कामोर्तब

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.३० नोव्हेंबर**

गेवराई नगरपरिषद निवडणुकीत प्रभाग क्रमांक ८ मध्ये प्रचाराचा जोर चांगलाच वाढला असून, जेष्ठ पत्रकार सुभाष सुतार यांच्या ३० वर्षांच्या अखंड सेवाभावाला मतदारांनी मोठ्या उत्साहाने प्रतिसाद दिला आहे. भाजपकडून या प्रभागातून उमेदवारी मिळालेल्या त्यांच्या कन्या कु. सोनाली सुभाष सुतार यांच्या नावाला चांगला पाठिंबा मिळत असून, मतदारांनी त्यांच्या विजयावर शिक्कामोर्तब केल्याचे चित्र स्पष्ट दिसत असून, प्रभाग क्रमांक आठ मधील भाजपाच्या अधिकृत उमेदवार सोनाली सुभाष सुतार आणि शहदाद भाईंचा विजय निश्चित असल्याची चर्चा होऊ लागली आहे.

गेवराई शहरातील अनुभवी, पदवीप्राप्त आणि सत्यनिष्ठ पत्रकार म्हणून सुभाष सुतार यांचा लौकिक दीर्घकाळापासून कायम आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक, नागरी व विकासकामांवर त्यांनी नेहमीच निर्भीडपणे आवाज उठवत जनतेचा आवाज प्रशासनापर्यंत पोहोचवला. त्यांच्या या निस्वार्थ कार्याची दखल घेऊनच भाजप नेते बाळराजे पवार यांनी प्रभाग क्रमांक ८ मधून त्यांच्या कन्या कु. सोनाली सुतार यांना उमेदवारी देण्याचा निर्णय घेतला. पत्रकार समाजाचा प्रतिनिधी सभागृहात जावा आणि विकासाच्या प्रश्नांवर प्रभावीपणे आवाज उठावा, यासाठी दिलेली ही उमेदवारी विशेष महत्त्वाची मानली जात आहे. या प्रभागातून रेकॉर्डब्रेक मताधिक्याने त्यांचा विजय निश्चित असून, त्यांच्या नेतृत्वामुळे प्रभाग ८ चा चेहरामोहरा बदलणार आहे. लोकसेवेचा वारसा, प्रामाणिक भूमिकांचा ठसा आणि जनतेचा अपार विश्वास या तीन स्तंभांवर उभ्या असलेल्या सुभाष सुतार यांच्या मुलीच्या उमेदवारीला मिळणारा प्रतिसाद पाहता, प्रभाग ८ मध्ये विकासाच्या नव्या पर्वाची सुरूवात होणार असल्याचे चित्र स्पष्ट दिसत असून, भाजपाचे अधिकृत उमेदवार सोनाली सुभाष सुतार आणि शहदाद भाईंचा विजय निश्चित असल्याची चर्चा होऊ लागली आहे.

# आजारी असतानाही बहादूर भाई रणांगणात विरोधकांच्या अफवांवर परळीकरांनो विश्वास ठेवू नका

### पाल्यांच्या भविष्यासाठी कांग्रेस वंचित बहुजन आघाडीलाच विजयी करा - बहादूर भाई



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३० नोव्हेंबर**

मागील दोन-तीन दिवसापासून आजारी असल्याने शहरातील माझ्या मतदार बंधूंना भेटू शकलो नाही. याची खंत आहे. विरोधकांच्या अपप्रचाराला बळी न पडता परळीकरांनो पाल्यांच्या भविष्यासाठी काँग्रेस वंचित बहुजन आघाडीलाच प्रचंड मताने २ डिसेंबर रोजी मतदान करून विजयी करावे असे आवाहन काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादुर भाई यांनी आज दिनांक ३० रोजी सायंकाळी पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले.

पत्रकार परिषदेत पुढे बोलताना काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादुर भाई म्हणाले की,आजारी असल्याने प्रचारात विश्रांती घेतली.किडनीवर परिणाम झाला पण थांबलो नाही.प्रत्यक्ष परळीच्या जनतेशी भेटू शकलो नाही. तरीही प्रचार कोठेही थांबला नाही. आणि थांबणारही नाही याचा विरोधकांनी विचार करावा आणि अपप्रचार थांबवावा.आजारी असल्याने दोन दिवस दिसलो नाही याचा काही जणांनी गैरसमज निर्माण केला.पण तसे नाही सर्व ताकद लावून लढत आहोत.आमचा प्रचार आपल्या माध्यमातून सुरू आहे.

# धनंजय मुंडेंना 'तो' भेटला अन् १२ वर्षांपूर्वी केलेल्या मदतीची काढली आठवण!

### कधी काळी केलेली मदत आशीर्वाद बनून पाठीशी उभी राहते यापेक्षा मोठे भाग्य अन् आनंद कोणता? मुंडेंची भावनिक पोस्ट व्हायरल

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३० नोव्हेंबर**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी बारा वर्षांपूर्वी एका लहान मुलाच्या हृदयावरील शस्त्रक्रियेला मदत केल्याची आठवण तब्बल १२ वर्षांच्या नंतर मूर्त स्वरूपात भेटल्याने एक वेगळाच सुखद धक्का बसल्याचे समोर आले आहे.




घडले असे की परळी शहरातील गणेशपार भागात राहणाऱ्या चि. सुरेश शंकरराव मस्के हा दोन वर्षांचा असताना म्हणजेच बारा वर्षांपूर्वी त्याच्या हृदयाला गंभीर आजार झाला होता. घरची परिस्थिती अतिशय सामान्य असल्याने त्याचे वडील शंकरराव यांनी त्यावेळी धनंजय मुंडे यांना मदत मागितली. त्यावेळी धनंजय मुंडे यांनी त्यांच्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात सुरेशच्या हृदयावर शस्त्रक्रिया करण्याचा ते अगदी ये जा करण्यापर्यंत संपूर्ण खर्च केला आणि सुरेशचे प्राण वाचले. हाच सुरेश आता चौदा वर्षांचा झाला असून काल सायंकाळी प्रचारादरम्यान आपल्या वडिलांसह अचानक धनंजय मुंडे यांना भेटला. यावेळी त्याच्या वडिलांनी बारा वर्षांपूर्वी केलेल्या मदतीची आठवण करून दिली आणि अत्यंत सुस्थितीत असलेल्या सुरेशला पाहून धनंजय मुंडे यांना सुखद धक्काच बसला!

त्यानंतर धनंजय मुंडे यांनी सुरेशची आस्थेवाईकपणे चौकशी केली. याबद्दल धनंजय मुंडे यांनी एक्स पोस्ट शेअर आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. सुरेश वर अतिशय गंभीर शस्त्रक्रिया करण्याची वेळ आली त्यावेळी दैवयोगाने आपल्या नाथ प्रतिष्ठान मार्फत सुरेशची शस्त्रक्रिया करून दिली आणि त्याचे प्राण वाचले. आज १४ वर्षांचा सुरेश त्याच्या वडिलांसह भेटला आणि केलेल्या मदतीची आठवण करून दिली; कधी एकेकाळी केलेली छोटीशी मदत आशीर्वाद बनवून पाठीशी उभी राहते, यापेक्षा मोठे भाग्य आणि आनंद दुसरा कोणता? अशा शब्दात मुंडेंनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. तर सोशल मीडियावर ही पोस्ट व्हायरल झाली असून धनंजय मुंडे यांनी याप्रकारे अनेकांना आजवर मदत केल्याचे लोक सांगत आहेत.काही दिवसांपूर्वीच आष्टी तालुक्यातील पाटसरा गावातील आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू सनी फुलमाळी याने आंतरराष्ट्रीय बीच कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक जिंकल्यानंतर त्याच्या आईने देखील सनी फुलमाळी याचा पाय मोडल्यानंतर त्याच्या लिगामेंटच्या शस्त्रक्रियेसाठी धनंजय मुंडे यांनी नाथ प्रतिष्ठान मार्फत आर्थिक मदत केली व त्यामुळेच तो आंतरराष्ट्रीय कुस्ती खेळू शकला, अशा शब्दात मुंडेंनी केलेल्या मदतीबद्दल आभार मानले होते.

# राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिवस : पर्यावरण , प्राणवायू आणि जीवन वाचवण्याची तातडीची हाक – २ डिसेंबर स्मरण व समज

## निसर्गाशी जुळवून घ्या , नाहीतर भविष्याशी तडजोड करावी लागेल

२ डिसेंबर हा दिवस भारतात ' राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिवस ' म्हणून साजरा केला जातो . या दिवसाचे मूळ १९८४ च्या भोपाल वायू दुर्घटनेशी जोडलेले आहे – मानव इतिहासातील सर्वात भीषण औद्योगिक दुर्घटनांपैकी एक . हजारो निरपराध लोक एका रात्रीत मृत्यूमुखी पडले , लाखो लोक अपंग , आजारी आणि मानसिक आघाताखाली गेले . आज ४० वर्षांनंतरही त्या घटनांचे दुष्परिणाम अनेक कुटुंबांत जिवंत आहेत . या दिवसाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे पर्यावरण प्रदूषणाचे वाढते संकट समजावून सांगणे , प्रदूषण नियंत्रणाचे कायदे व जनजागृती मजबूत करणे , आणि भोपाल वायू दुर्घटनेतील पीडितांचे स्मरण ठेवत अशा घटना पुन्हा होऊ नयेत यासाठी प्रणालींची क्षमता वाढवणे . हवामान बदल , वायू – जल – माती प्रदूषण , प्लास्टिक , धुके , उष्ण लाट , औद्योगिक रसायने – हे सर्व आज जगासाठी एकत्रित संकट बनले आहे . म्हणूनच राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिवस हा केवळ एक वार्षिक दिन नाही ; तर निसर्ग वाचवा म्हणजे भविष्य वाचेल याची ठळक आठवण आहे . निसर्ग रागावला तर जगाचा श्वास थांबेल – ही ओळ आज अधिक खरी ठरते .



२ डिसेंबर १९८४ ची रात्र – इतिहासातील काळी सावली . मध्यप्रदेशातील भोपाल येथे ' युनियन कार्बाईड ' या कारखान्यात प्राणघातक ' मिथाईल आयसोसायनेट ' ( एम आय सी ) गॅसाची गळती झाली . काही मिनिटांत हजारो जीव संपले ; संपूर्ण शहर मृत्यूच्या धुक्याने झाकले गेले . रस्ते , घरे , दवाखाने – सर्वत्र मृतदेहांची रांग . त्यानंतर अनेक वर्षे जन्मलेल्या मुलांत शारीरिक व मानसिक विकार दिसून आले . आजही अनेक कुटुंबे न्यायासाठी लढत आहेत . ही घटना आपल्याला सांगते – उद्योग , नफा , विकास – या सर्वांहून महत्त्वाचे आहे मानवी जीवन आणि पर्यावरणाची सुरक्षा . म्हण आहे : जीवनाची किंमत कळायला हादरा लागतो – भोपाल दुर्घटना तोच हादरा होता .

प्रदूषण म्हणजे नैसर्गिक वातावरणात हानिकारक पदार्थ मिसळून ते अस्वस्थ , अपायकारक किंवा जीवघेणे बनणे . वायू प्रदूषण , जल प्रदूषण , माती प्रदूषण , ध्वनी प्रदूषण , रसायनिक कचरा , प्लास्टिक प्रदूषण – हे प्रमुख प्रकार मानवाच्या आरोग्यावर , अर्थव्यवस्थेवर व पिढ्यानपिढ्या परिणाम करतात . भारत आज जगातील सर्वाधिक प्रदूषणग्रस्त देशांपैकी एक आहे . दिल्ली , मुंबई , कोलकाता , पटना , नागपूर , पुणे – अनेक शहरांत वायू गुणवत्ता निर्देशांक ( ए क्यू आय ) अत्यंत खराब पातळीवर असतो . मुख्य कारणे म्हणजे वाहनांचे धूर , औद्योगिक चिमण्या , बांधकाम धूळ , प्लास्टिक कचरा , शेतातील जाळपोळ , जंगलतोड , अकार्यक्षम वाहतूक व्यवस्था . दरवर्षी हजारो मुलांचे आणि वृद्धांचे मृत्यू केवळ वायू प्रदूषणामुळे होतात . दमा , हृदयरोग , कर्करोग , त्वचारोग – ही प्रदूषणाची उघडी जखम .

वायू प्रदूषणात पीएम २ . ५ हे सर्वात घातक कण आहेत . ते फुफ्फुसात जाऊन रक्तात मिसळतात आणि स्ट्रोक , हृदयरोग , कर्करोगाची शक्यता वाढवतात . जागतिक आरोग्य संघटनेनुसार भारतातील अनेक शहरांत पीएम २ . ५ पातळी जागतिक मर्यादेपेक्षा ७ ते १० पट जास्त असते . जलप्रदूषणही गंभीर आहे . गंगा , यमुना , गोदावरी , कृष्णा , नर्मदा – या नद्यांत औद्योगिक रसायने , मलजल , प्लास्टिक , कीटकनाशके मिसळतात . बी ओ डी आणि सी ओ डी पातळी वाढल्याने पाण्याची गुणवत्ता खालावली आहे . याचा परिणाम म्हणजे अतिसार , त्वचारोग , आर्सेनिक – फ्लोराईड – लोह वाढ , हाडांचे व दातांचे विकार . ग्रामीण भागांत पाणी म्हणजे जीवन ; पण आज प्रदूषित पाणीच मोठा शत्रू ठरतो .

माती प्रदूषण वाढले आहे . रासायनिक खतांचा अतिरेक , कीटकनाशके , प्लास्टिक , औद्योगिक कचरा – यामुळे मातीची सुपीकता नष्ट होते . याचा सरळ परिणाम म्हणजे अन्नातील रसायने वाढणे . आज अन्नात पोषण कमी , विष दुप्पट अशी स्थिती निर्माण झाली आहे . प्लास्टिक प्रदूषण तर आधुनिक युगातील संक्रामक आजारच आहे . नद्या , समुद्र , शेती – सर्वत्र मायक्रोप्लास्टिक . आज मानवी रक्तातही मायक्रोप्लास्टिक असल्याचे संशोधन सांगते . म्हणजेच आपण स्वतःच्या शरीरात प्लास्टिक पोसत आहोत . हा एक शांत विष आहे .

ध्वनी प्रदूषण – मोठे हॉर्न , लाऊडस्पीकर , बांधकाम – यामुळे हृदयाचे आजार , निद्रानाश , तणाव वाढतो . भारतातील पर्यावरण कायदे चांगले आहेत , जसे – पर्यावरण संरक्षण अधिनियम , जल व वायू प्रदूषण प्रतिबंध अधिनियम , प्लास्टिक बंदी , राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण ( एन जी टी ) – पण कायद्यांची अंमलबजावणी आणि जनजागृती अजूनही अपुरी . म्हण आहे : कायद्यापेक्षा कर्म मोठे – पर्यावरण संरक्षण हा कागदोपत्री नियम नसून प्रत्यक्ष कृतीचा विषय आहे .

महाराष्ट्रातील अनेक शहरांत वायू प्रदूषण गंभीर आहे . गोदावरी , मुळा – मुठा , वाशा , उल्हास – नद्यांची परिस्थिती चिंताजनक आहे . मराठवाडा आणि विदर्भातील मातीची सुपीकता रसायनांमुळे कमी होत आहे . शेती , आरोग्य , अर्थव्यवस्था – सर्वच क्षेत्रांना प्रदूषणाचा फटका बसतो .

प्रदूषणाचा मानवी आरोग्यावर परिणाम अत्यंत भीषण आहे . दमा , हृदयविकार , कर्करोग , स्ट्रोक , त्वचारोग , गर्भवती महिलांतील गुंतागुंत , मुलांमध्ये श्वसन क्षमता घटणे – ही प्रदूषणाची देणगी . म्हणून प्रदूषण हे नवीन युगाचे आरोग्य संकट आहे .

आपण काय करू शकतो ? – खाजगी वाहनांचा वापर कमी करणे , सार्वजनिक वाहतूक वापरणे , कार-पूल , कचरा विभाजन , प्लास्टिक टाळणे , वृक्षलागवड , ऊर्जा बचत , रसायने कमी वापरणे , उद्योगांवर कडक कारवाई , जनजागृती मोहिमा . प्रदूषण हा केवळ सरकारचा विषय नाही ; तो प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे . एक एक पाऊल टाकले की पर्वत हलतो – लहान कृती मोठा बदल घडवू शकते .

तंत्रज्ञानही मदत करते – हवा शुद्ध करणारे टॉवर , इलेक्ट्रिक वाहने , सोलर ऊर्जा , कचरा पुनर्वापर तंत्रज्ञान , ड्रोन आधारित निरीक्षण , ए आय आधारित मॉनिटरिंग – याने भविष्य उज्वल होऊ शकते . भोपाल दुर्घटना आपल्याला सांगते – मानवी बेपर्वाई , व्यवस्थेतील त्रुटी आणि सुरक्षिततेचा अभाव यामुळे लाखो जीव उद्ध्वस्त होतात . त्यामुळे २ डिसेंबर आपल्याला स्मरण करून देतो : उद्योग विकास म्हणजे पर्यावरण नष्ट करणे नव्हे ; संतुलन साधणे हीच खरी प्रगती .

राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिवस हा निसर्गाचा प्रखर आवाज आहे . प्रदूषण हे येणाऱ्या पिढ्यांना मिळणारे सर्वात मोठे संकट आहे . आपण आज केलेली चूक उद्याच्या मुलांना अपंग करते . आजची गरज आहे – स्वच्छ हवा , स्वच्छ पाणी , हिरवी पृथ्वी , आरोग्यदायी जीवन . ही जबाबदारी सरकारची नाही ; आपल्या सर्वांची आहे.

धरतीचे रडणे थांबवा , प्रदूषणाला आळा घाला
हवा , पाणी , जमीन – तिन्हींचा सन्मान ; तेच जगण्याचे भक्कम आधारस्तंभ

चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके
तहसीलदार , बीड

# धरण विरोधकांनी निम्न पैनगंगा प्रकल्पाचे काम बंद पाडले; कामावरील वाहनांवर दगडफेक

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ३० नोव्हेंबर-**

मराठवाडा-विदर्भाच्या सिमेवरुन वाहणाऱ्या पैनगंगा नदीवर होऊ घातलेल्या निम्न पैनगंगा प्रकल्प ऊर्फ चिमटा धरणाचे सुरू असलेले काम आज शनिवार दिनांक २९ नोव्हेंबर रोजी यवतमाळ जिल्ह्याच्या घाटंजी तालुक्यातील खडका येथील प्रकल्प स्थळी हजारोच्या संख्येने एकवटलेल्या धरण विरोधकांनी प्रशासनाला दिलेल्या अल्टीमेटमप्रमाणे पुन्हाएकदा बंद पाडले.



तब्बल २९ वर्षांपासून प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांसह विस्थापित होणाऱ्या नागरिकांचा धरण विरोधी संघर्ष समितीच्या दिमतीने सुरू असलेला प्रचंड विरोधाचा लढा आता शिगेला पोहचला असून,प्राण जाए पर,जमिन न जाए! अशा ठाम निर्धाराने जान की बाजी लावण्यापर्यंत धरणाला विरोध वाढला असल्याचे आजच्या धरणविरोधकांच्या आक्रमकतेवरुन दिसून येत आहे.

निम्न पैनगंगा धरण विरोधी संघर्ष समितीने दिनांक २४ नोव्हेंबर सोमवार रोजी प्रकल्याचे सुरू असलेले काम बंद करण्याबाबत रीतसर जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, कार्यकारी अभियंता, पोलीस स्टेशन पारवा, पोलीस स्टेशन मांडवी यांना लिखित निवेदन देऊन काम बंद करण्याची विनंती केली होती. मात्र पाटबंधारे विभागाने काम बंद न केल्यामुळे दिनांक २९ नोव्हेंबर शनिवारला निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या प्रकल्प स्थळी धरण विरोधी संघर्ष समितीचे पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने काम बंद आंदोलन करण्यासाठी स्वयंस्फूर्तीने जमा झाले असता अशाही परिस्थितीत धरणाचे काम सुरूच असल्यामुळे प्रकल्पग्रस्त प्रचंड संतप्त झाले. त्यांनी कामावर असलेल्या जेसीबी व टिप्परच्या काचा फोडल्या व त्या वाहनांवर तुफान दगडफेक केली.

दि.२८ नोव्हेंबरला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे यवतमाळ येथे आले असता धरण विरोधी समितीच्या कार्यकर्त्यांसोबत चर्चा केली असता त्यांनी मी आर्णी व किनवट विधानसभा प्रचारा दरम्यान प्रकल्पाबाबत जे आश्वासन दिले होते त्यावर मी कायम आहे! असे सांगितले.

शनिवारी पोलीस बंदोबस्तात कार्यकारी जलसंपदा विभाग, यवतमाळ अभियंता सुरज राठोड,अनिकेत गुल्हाने, टेमरे या अधीकाकाऱ्यांसोबत चर्चा झाली. त्यांनी काम बंद करण्याचे आश्वासनही दिले. परंतु, कायमस्वरूपी काम बंद करण्याचे आश्वासन लेखी स्वरूपात देण्यास असमर्थता दर्शविल्याने मोठ्या संख्येने उपस्थित प्रकल्पग्रस्त ज्या ठिकाणी काम चालू होते तेथे गेले.त्यातील काहींनी नंबर नसलेल्या टिप्परचे काचा फोडल्या व उभ्या वाहनांवर तुफान दगडफेक केली.

त्यानंतर जोपर्यत प्रकल्प स्थळावरून उभ्या असलेल्या जेसीबी व टिप्पर हलविण्यात येणार नाहीत तोपर्यंत आम्ही येथेच ठिय्या मांडू असा आक्रमक पवित्रा धरण विरोधी लोकांनी घेतल्यामुळे पोलीसांनी कामावरील सर्व वाहने पोलिस बंदोबस्तात प्रकल्प स्थळावरून हलविल्यानंतर आंदोलक आपापल्या गावाकडे परतले.

आजच्या आंदोलनात विदर्भ मराठवाडयातील चार ते पाच हजार महिला पुरुष मंडळी धरणाचे काम सुरू असलेल्या ठिकाणी जमा झाले होते.आजच्या आंदोलनात धरण विरोधी संघर्ष समितीचे प्रल्हाद पाटील जगताप, मुबारक तंवर, बंडुसिंग नाईक, विजय पाटील राऊत, प्रल्हादराव गावंडे सर, बंटी पाटील जोमदे, जयराम मिश्रा, गजानन डाखोरे,

डॉ.बाबा डाखोरे,गुलाब मेश्राम,विजय पाझारे, शंकर सिडाम यासह हजारो प्रकल्पग्रस्त शेतकरी, धरण विरोधक उपस्थित होते.

आता आजच्या या धरणविरोधकांच्या आक्रमक पवित्र्यापुढे काहिसे नरमलेले प्रशासन पुढे काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले असून, प्रचंड कडाक्याच्या थंडीतही चिमटा धरणावरुन प्रशासनाच्या विरोधातील धरण विरोधी संघर्ष समितीच्या गरमागरमीमुळे प्रकल्प क्षेत्रातील वातावरण चांगलेच तापले असल्याचे दिसून येत आहे.

## स्वारातीम विद्यापीठाच्या १ व २ डिसेंबरच्या परीक्षा रद्द

**नांदेड** -स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या हिवाळी-२०२५ परीक्षांना ११ नोव्हेंबरपासून सुरुवात झाली आहे. दरम्यान, दि. २ डिसेंबर रोजी नगरपरिषद व नगरपंचायत सार्वजनिक निवडणुकीसाठी मतदान होत असल्याने आणि विद्यापीठाशी संलग्न असलेल्या काही महाविद्यालयांचा मतदान केंद्र म्हणून वापर होत असल्यामुळे दि. १ डिसेंबर व २ डिसेंबर २०२५ रोजी नियोजित परीक्षा रद्द करण्यात आल्याची माहिती परीक्षा मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हुशारसिंग साबळे यांनी दिली. रद्द झालेल्या परीक्षा संबंधित अभ्यासक्रमाच्या शेवटच्या दिवशी आयोजित करण्यात येणार असून याबाबत सर्व विद्यार्थ्यांनी अद्ययावत वेळापत्रकाची नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी, तसेच ही सूचना सर्व संबंधित विद्यार्थी, प्राध्यापक आणि महाविद्यालयांपर्यंत पोहोचवावी, असेही पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

## कार्यक्रम अधिकारी विश्वास वाघमारे यांना पदोन्नती

**नांदेड** - आकाशवाणी केंद्राचे कार्यक्रमाधिकारी विश्वास वाघमारे आणि प्रसारण अधिकारी राहुल आत्राम यांची नुकतीच पदोन्नती झाली असून वाघमारे यांची सहाय्यक निदेशक म्हणून तर राहुल आत्राम यांची कार्यक्रम अधिकारी म्हणून पदोन्नती करण्यात आली आहे. नांदेड आकाशवाणी केंद्र येथे २०१५ मध्ये कार्यक्रम अधिकारी म्हणून रुजू झालेले विश्वास वाघमारे हे गेल्या दहा वर्षापासून माहिती , मनोरंजन आणि शिक्षण ही त्रिसूत्री घेऊन आकाशवाणी केंद्राच्या माध्यमातून श्रोत्यांची सेवा केली आहे तर याचवेळी २००९ मध्ये नांदेड आकाशवाणी केंद्रात प्रसारण अधिकारी म्हणून रुजू झालेले राहुल आत्राम यांनीही आकाशवाणी मध्ये भरीव असे योगदान दिले आहे. सर्वच कार्यक्रमांमध्ये हिरीरीने सहभाग घेणाऱ्या आत्राम यांनी अनेक नाविन्यपूर्ण उपक्रमही राहुल आहेत . दोन्ही अधिकाऱ्यांची नुकतीच पदोन्नती करण्यात आली आहे. प्रसार भारती महानिदेशालय आकाशवाणी दिल्ली यांनी या पदोन्नत्या केल्या असून कार्यक्रमाधिकारी विश्वास वाघमारे यांची सहाय्यक निदेशक म्हणून तर प्रसारन अधिकारी राहुल आत्राम यांना कार्यक्रम अधिकारी म्हणून पदोन्नती देण्यात आली आहे . पदोन्नती मिळालयाबदल दोन्ही अधिकाऱ्यांचे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आणि आकाशवाणी नांदेड केंद्रातील नैमित्तिक निवेदकांनी स्वागत करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत. दरम्यान नांदेड आकाशवाणी केंद्राचे नैतिक उद्धोषक मिलिंद व्यवहारे, प्रदीप भद्रे, मधुकर गजभारे, आनंद गोडबोले ,शेख हसीना ,शेख अहमद, नम्रता वावळे , जीवक खंदारे , राम तरटे, दिनेश कवडे , किरण टेकाळे आदींनी दोन्ही अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.



## मतदान केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**नांदेड** -जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नगरपरिषद/नगरपंचायत निवडणूकीच्या मतदानाच्या दिवस मंगळवार २ डिसेंबर २०२५ रोजी सर्व मतदान केंद्र परिसरात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश जिल्हादंडाधिकारी राहूल कर्डिले यांनी निर्गमीत केले आहेत. या नगरपरिषद/ नगरपंचायत निवडणूक मतदानाच्या दिवशी २ डिसेंबर रोजी मतदान सुरु झाल्यापासून ते मतदान संपेपर्यन्त हा आदेश अंमलात राहणार आहे. नांदेड जिल्ह्यातील नगरपरिषद/ नगरपंचायत-बिलोली, देगलुर, धर्माबाद, हदगाव, हिमायतनगर, कंधार, कुंडलवाडी, मुदखेड, मुखेड, उमरी, भोकर, किनवट, लोहा या निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोणातून कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहण्यासाठी ज्या ठिकाणी मतदान होणार आहे त्या ठिकाणापासून २०० मीटर परिसरातील सर्व पक्षकारांचे मंडपे, सर्व दुकाने, मोबाईल, कॉडलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके, सर्व प्रकारचे फेरीवाले व इतर इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, निवडणुकीच्या कामाव्यतीरिक्त खाजगी वाहन, संबंधीत पक्षाचे चिन्हांचे प्रदर्शन व निवडणूकीच्या कामाव्यतीरीक्त व्यक्तीस प्रवेश करण्याकरीता मंगळवार २ डिसेंबर २०२५ रोजी प्रतिबंधीत करण्यात आले आहे.

## गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपींनाअटक

**नांदेड** -अर्धापूर तालुक्यातील दाभड येथील आकाश साहेबराव सूर्यवंशी व तरोडा नाका नांदेड येथील राजेश उर्फ राजू देवराव बगाटे यांच्यावर बलात्कार व पोक्सो असे गंभीर गुन्हे दाखल होते. हे दोघेही मागील तीन वर्षापासून फरार होते. भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक विनोद देशमुख, नरेश वाडेवाले यांचे पथक गस्त घालत असताना हे दोघे आरोपी दाभड या गावात असल्याची गोपनिय माहिती त्यांना मिळाली. या माहितीवरुन पोलिसांनी दाभड येथे जावून आकाश सूर्यवंशी यास ताब्यात घेतले. त्यास राजेश बगाटे याच्याविषयी विचारले असता त्याने राजेश बगाटे हा कल्याणनगर येथे असल्याची माहिती सांगितली. या माहितीवरुन पोलिसांनी राजेश बगाटे याला देखील अटक केली आहे. या प्रकरणी पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विनोद देशमुख हे करीत आहेत. हि कारवाई पोलीस निरीक्षक संतोष तांबे, गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक विनोद देशमुख, नरेश वाडेवाले, पोहेकॉ. विशाल माळवे, गजानन किडे, विष्णूकांत मुंढे, राहुल लाठकर, नागनाथ चापके, देवीसिंग सिंघल, राजू घुले, अदनान पठाण, अंकुश कांबळे यांच्या पथकाने केली.

# नगरपंचायतीवर भगवा फडकवा : गुलाबराव पाटील



**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. ३० नोव्हेंबर-**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना सुरू करून राज्यातील लाखो महिलांना आर्थिक बळ देणारे मुख्यमंत्री एकनाथभाई शिंदे यांनी महिलांच्या विकासाचे नवे पर्वच सुरू केले. या योजनेमुळे लाडक्या बहिणींनी महायुतीला उदंड पाठिंबा दिला. ही योजना पुढेही कायम राहणार आहे. मात्र हिमायतनगरचा नगराध्यक्ष 'आपल्या विचारांचा' असणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन राज्याचे पाणीपुरवठा मंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी केले.

दिनांक २८ रोज शुक्रवारी येथील श्री परमेश्वर मंदिर मैदानात झालेल्या जाहीर सभेत प्रचंड उत्साहात बोलताना ना. पाटील म्हणाले कि, ३० वर्षे शिवसेनेची पताका खांद्यावर घेऊन काम करणाऱ्या राम ठाकरे यांना शिवसेनेने नगराध्यक्षपदाची उमेदवारी दिली आहे. खऱ्या अर्थाने हिमायतनगरला रामराज्य आणायचे असेल तर 'धनुष्यबाण' या निशाणीवरील बटन दाबून नगरपंचायतीवर भगवा फडकवा! असे आवाहन त्यांनी जनतेला केले.

सभेत विरोधकांना लक्ष्य करताना ना. पाटील यांनी खा. अशोकराव चव्हाण यांच्यावर तीव्र टीका केली.

ते म्हणाले कि, तुमच्या पिढ्यान् पिढ्या राजकारणात असताना या भागाची इतकी दुर्दशा का? जनतेत संभ्रम निर्माण करण्याचे राजकारण आता चालणार नाही.

यावेळी बोलताना आमदार बाबुराव कदम कोहळीकर म्हणाले कि, राज्यात एकनाथभाई यांच्या नेतृत्वात मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. हा वेग कायम ठेवायचा असेल तर हिमायतनगरातील सर्व शिवसेना उमेदवारांना विजयी करा. कार्यक्रमास शिवसेनेचे उपनेते आमदार हेमंत भाऊ पाटील, जिल्हाप्रमुख विवेक देशमुख, विकास पाटील देवसरकर, विजय वळसे पाटील, तसेच शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला-पुरुष मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ. भीमराव केराम यांचे संबोधन : १८० कोटींच्या विकासकामांची वचनपूर्ती, वचननामा जाहीर

**तभा वृतसेवा**
**किनवट , दि. ३० नोव्हेंबर-**

शहराचा सर्वांगीण विकास ही आमची बांधिलकी असून १८० कोटी रुपयांच्या विकासकामांची वचनपूर्ती आम्ही यशस्वीरीत्या केली आहे. आगामी काळातही वचननाम्यातील प्रत्येक मुद्दा पूर्णत्वास नेऊ, असे स्पष्ट विधान आमदार भीमराव केराम यांनी विशेष सभेमध्ये केले. या सभेत महायुतीचे पदाधिकारी, माजी नगराध्यक्ष, ज्येष्ठ कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेला तालुका प्रमुख बालाजी मुरकुटे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुका अध्यक्ष बाळू पाटील, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, माजी नगराध्यक्ष साजिद खान, रमण जयभये, माजी अध्यक्ष दिनकर दहिफळे, बाळकृष्ण कदम, विश्वस्व कोल्हारीकर, बाबुराव केंद्रे, वैजनाथ करपुडे, नारायणराव सीडम आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

**महायुतीचे २१ नगरसेवक म्हणजे विकासाचे शिलेदार**

आमदार केराम म्हणाले की, शहरातील नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी भारतीय जनता पक्षाने सातत्याने प्रयत्न केले आहेत. महायुतीद्वारे निवडून येणारे २१ नगरसेवक हेच माझ्या वचनपूर्तीचे शिलेदार ठरणार आहेत.




ते पुढे म्हणाले, विरोधकांनी उभा केलेला उमेदवार हा केविलवाणा प्रयत्न असून ही निवडणूक एकतर्फी आहे. शहरातील कॉस्मोपॉलिटन वातावरण गढूळ करण्याचा प्रयत्न काही जण करत आहेत; मात्र जनता विकासाच्या बाजूने उभी आहे.

**पहिल्या कार्यकाळातील कामांचा ठसा**

आपल्या पहिल्या कार्यकाळाचा उल्लेख करताना त्यांनी स्व. प्रकाश नगराळे यांचे विशेष स्मरण केले. सभागृहात एकमेव नगरसेवक असतानाही आम्ही कोणताही दूजाभाव न ठेवता गाळे विकसित केले, नागझरी तलावातून पिण्याचे पाणी आणले आणि शहराचा विकास साधला, असे त्यांनी नमूद केले.

**माझं शहर स्वच्छ, सुंदर आणि प्रगतिशील असलं पाहिजे**

आमदार केराम म्हणाले, किनवट शहर स्वच्छ, सुंदर आणि आधुनिक सुविधांनी समृद्ध राहिले पाहिजे. यासाठी प्रामाणिकपणे काम करत आहोत. लोकसहभागातून विकासाला गती मिळाली तर आगामी पाच वर्षांत किनवट शहर आदर्श नगरपरिषद ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सभेच्या शेवटी त्यांनी पुन्हा एकदा नागरिकांना आवाहन केले की, भाजपाचे सर्व २१ उमेदवार दणदणीत बहुमताने निवडून द्या. आमचे वचननामेतील सर्व मुद्दे १००% प्रत्यक्षात आणू.

# हजारों युवकांच्या गराड्यात युवा नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. २९ नोव्हेंबर-**

शहरातील व तालुक्यातील युवक कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव काल दिनांक २८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता बाबा सरकार सोनापीर दर्गा परिसरात अनेक गणमान्य स्नेहांकितांच्या उपस्थिती मध्ये हजारो युवकांच्या गराडयात माहूर चे युवा नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांचा वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.

माहूर शहरातील विकासाचे व्हिजन असलेले मितभाषी व सर्वसमावेश राजकीय व्यक्तीत्व म्हणून ओळख निर्माण केलेले कार्यसम्राट नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आयोजित अभिष्टचिंतन कार्यक्रमात केक कापण्यापूर्वी दिवंगत आमदार प्रदीप नाईक यांच्या आठवणीना स्मरण करून वराडी कवी मिर्झा रफी अहमद बेग यांना शब्दसुमनाने श्रद्धांजली अर्पित केल्या नंतर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या नेत्या बेबी ताई नाईक,युवा नेते कपिल नाईक, जिपचे माजी उपाध्यक्ष समाधान जाधव,

किनवट चे तालुकाध्यक्ष प्रकाश राठोड,माहूर चे तालुकाध्यक्ष मेघराज जाधव,सभापती दत्तराव मोहिते,माजी सभापती उस्मान खान चांद खा यांनी नगराध्यक्ष फिरोज भाई दोसानी यांचा शाल पुष्पगुच्छ व भेट वस्तू देऊन वाढदिवसानिमित शुभेच्छा दिल्या व त्या नंतर केक कापण्यात आले.या वेळी बेबी ताई नाईक,शिवसेना उबठा गटाचे जिल्हा प्रमुख ज्योतिबादादा खराटे ,युवा नेते कपिल नाईक, जिप चे माजी उपाध्यक्ष समाधान जाधव यांचा दोसानी परिवाराच्या वतीने संयुक्त सत्कार करण्यात आला.त्या नंतर सुप्रसिद्ध कव्वाल अपसर साबरी यांच्या बहारदार सुफी संगीताचा कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. दुसऱ्या बाजूने हितचिंतक व चाहत्यांनी फिरोज दोसानी यांना शुभेच्छा देण्यासाठी गर्दी केली होती. अमरावतीचे माजी उपमहापौर जाफर भाई, यवतमाळ येथील राष्ट्रवादीचे नेते भाई अमन,युवा नेते अर्चित नाईक, ऍड राहुल नाईक,उपनगराध्यक्ष नाना लाड,माजी जीप सदस्य बंडू नाईक,विनोद राठोड, युवासेनेचे जिल्हाध्यक्ष यश खराटे, नगरपंचायत चे मुख्याधिकारी विवेक कांदे, सिने अभिनेता संजय नेम्मानीवर, अनिल कराळे, भाजपा नेते धरमसिंग राठोड राहुल नाईक किनवटकर , अनिल रुणवाल, मारुती रेकुलवार, नितीन कन्नलवार, बंडू पाटील भुसारे, कुंदन पाटील,माजी जिप सदस्य साहेबराव कदम पाटील हिवरेकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद घोडके, तलाठी चंद्रकांत बाबर, कार्यालयीन अधीक्षक वैजनाथ स्वामी, अभियंता राहूल नाईक, संदीप गजलवाड, विशाल ढोरे, देविदास सिडाम,भारतीय स्टेट बँकेचे शाखा अधिकारी कमलेश कुमार,शिवम चव्हाण, विनोद पाटील सूर्यवंशी शिरूबाई चिखलीकर, रोहिदास जाधव, पंडित राठोड,आशिष नाईक, उकंडराव जाधव, संदीप सिद्धेवार, गोंडवडसा येथील माजी सरपंच अमजदभाई यांच्यासह हजारो चाहते, हितचिंतक,समाजबांधव, व व्यापारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन सैफ दोसानी मित्र मंडळाकडून अमित येवतीकर, इरफान सय्यद,अमजद खान आझाद खान, राजू चव्हाण, अब्दुल रहमान शेख आली, व मित्रमंडळी यांनी केले होते संचलन मनोज कीर्तने यांनी तर आभार सरफराज दोसानी यांनी मानले.



# महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव ४ डिसेंबर पासुन सुरू

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ३० नोव्हेंबर-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात दि. ४ ते ८ डिसेंबर २०२५ दरम्यान २७ वा महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात आलेला आहे. या भव्य क्रीडा महोत्सवासाठी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध समित्या स्थापन करून तयारी जोरात सुरू आहे.

या पार्श्वभूमीवर आज दि. २८ नोव्हेंबर रोजी मा. राज्यपाल नियुक्त मा. राजभवन स्पर्धा परीक्षा निरीक्षण समितीने विद्यापीठाच्या क्रीडा सुविधांचे निरीक्षण केले. समितीने विविध विभागांकडून अद्यावत माहिती घेत संपूर्ण तयारीचे परीक्षण केले. या समितीमध्ये अध्यक्ष म्हणून दापोली येथील डॉ. अरुण माने, तर सदस्य म्हणून छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. सचिन देशमुख आणि मुंबई येथील आदित्य कुलकर्णी उपस्थित होते.

विद्यापीठातील क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने, कार्यकारी अभियंता तानाजी हुसेकर आणि जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम यांनी समितीसमोर क्रीडा महोत्सवाच्या तयारीचा विस्तृत आढावा सादर केला.

या क्रीडा महोत्सवात कब्बडी, खो-खो, बॅडमिंटन, टेबल टेनिस, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, बुद्धिबळ आणि थलेटिक्स यांसारख्या विविध क्रीडा प्रकारांचा समावेश असून, राज्यभरातील विद्यापीठांमधून अंदाजे ५००० खेळाडू सहभागी होणार आहेत. अशा राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन ही विद्यापीठासाठी अभिमानाची बाब असल्याचे मत कुलगुरू डॉ. चासकर आणि क्रीडा संचालक डॉ. माने यांनी व्यक्त केले आहे.

क्रीडांगणे अद्ययावत करण्यासाठी कार्यकारी अभियंता तानाजी हुसेकर यांच्यासह डॉ. मनोज पैजने, हिरामण वाघमारे, राजासाहेब बोराळे, अरुण इंगोले, केशव कल्याणकर, प्रदीप बिडला तसेच विविध समित्यांचे अध्यक्ष, सदस्य, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी परिश्रमपूर्वक कार्यरत आहेत.

# जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजनांचा आढावा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० नोव्हेंबर-**

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजनांचा आढावा नुकताच घेण्यात आला. या बैठकीत सर्व सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, पशुधन विकास अधिकारी, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक तसेच 'मैत्री' आणि 'नॅशनल डेअरी स्कीम' अंतर्गत कार्यरत सेवादाते उपस्थित होते.



बैठकीत नांदेड जिल्ह्यातील पशुप्रजनन कार्य, दुग्ध उत्पादन वाढीसाठी विदर्भमराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प (टप्पा २) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या बाबी तसेच किसान क्रेडिट कार्ड, महाराष्ट्र गोजातीय प्रजनन कायदा इत्यादी योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

प्रजननक्षम गाय व म्हैसवर्गीय जनावरांच्या वंध्यत्व निवारण शिबिरांचे आयोजन करून कृत्रिम रेतनाची टक्केवारी वाढविण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्री. कर्डिले यांनी दिल्या. जास्त दूध उत्पादन देणाऱ्या जनावरांची निर्मिती करण्यासाठी लिंगवर्गीकृत रेत मात्राचा प्रभावी वापर करण्यावर भर देण्यात आला. दुग्ध उत्पादनात वाढ करण्यासाठी प्रकल्पाचा कृती आराखडा तयार करून काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच पशुधनातील लसीकरणाची स्थितीचाही यावेळी आढावा घेण्यात आला.

नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीवर आधारित अर्थव्यवस्था दोलायमान झाल्यामुळे पशुसंवर्धन व्यवसाय हाच शाश्वत आर्थिक लाभ देऊ शकतो, असे जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले. पुढील काळात स्वतः आणि अधिनस्त सर्व यंत्रणा पशुसंवर्धन क्षेत्राला प्राधान्य देऊन शेतकरी व पशुपालकांना आवश्यक सहकार्य करतील, असे त्यांनी सांगितले. दरमहा पशुसंवर्धन विभागाचा नियमित आढावा घेण्यात येईल, असेही त्यांनी नमूद केले.

नांदेड जिल्ह्यातील कृत्रिम रेतनाचे कार्य दुप्पट करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या नियंत्रित प्रजनन कार्यक्रमाची प्रगती पाहून एक गाव एक फार्म या संकल्पनेवर आधारित प्रकल्प राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०२५२०२६ अंतर्गत चारा उत्पादन योजनेतून मका, ज्वारी व बाजरी बियाण्यांचे प्रातिनिधिक स्वरूपात वितरण जिल्हाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले.

बैठकीस जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. राजकुमार पाडिले, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रविणकुमार घुले, डॉ. विजय काटकाडे, डॉ. अरविंद गायकवाड, जिल्हा अग्रणी बँक अधिकारी श्री. सोनकांबळे, जिल्हा उद्योग केंद्राचे श्री. प्रविण चव्हाण, जिल्हा दुग्ध व्यवसाय अधिकारी श्री. अनिल चव्हाण, नॅशनल डेअरी स्कीमचे प्रकल्प समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर सोनटक्के, विदर्भमराठवाडा दुग्ध विकास प्रकल्पाचे जिल्हा प्रकल्प अधिकारी डॉ. सतीश खिल्लारे तसेच सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# अहमदपूर शहरात पोलिसांचे 'शांतता मार्च'!

## नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचे पथसंचलन



**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, ३० नोव्हेंबर :** अहमदपूर नगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि मतदारांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी अहमदपूर पोलिसांच्या वतीने पथसंचलन करण्यात आले. उपविभागीय पो-लीस अधिकारी अरविंद रायबोले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अहमदपूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार यांच्या नेतृत्वात हे संचलन पार पडले.

अहमदपूर पोलिसांनी संपूर्ण शहरातून संचलन करत निवडणुकीच्या काळात शांतता राखण्याचे आवाहन केले. या संचलनाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोरून झाली. त्यानंतर सावरकर चौक, किनगावकर हॉस्पिटल, भाग्यनगर, मोंढा चौक, काळेगाव रोड, हिना चौक, हनुमान मंदिर, आझाद चौक या प्रमुख मार्गांवरून हे संचलन पुढे सरकले.

पथसंचलनाची सांगता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे करण्यात आली. या ठिकाणी पोलिसांनी दंगा काबू योजनेचे प्रभावी प्रात्यक्षिक सादर केले. निवडणुकीदरम्यान कोणताही तणावपूर्ण किंवा अनुचित प्रसंग उद्भवल्यास परिस्थिती त्वरित कशी हाताळायची, याची तयारी या प्रात्यक्षिकातून दर्शविण्यात आली. या महत्त्वपूर्ण प्रात्यक्षिकानंतर संचलनाची यशस्वी सांगता झाली. नगरपालिकेसाठी २ डिसेंबर रोजी मतदान होणार असून, मतमोजणी व निकाल ३ डिसेंबर रोजी घोषित करण्यात येणार आहे. या संवेदनशील काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे.

या पथसंचलनात पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि होमगार्ड यांनी मोठा सहभाग नोंदवला. यात सहायक पोलीस निरीक्षक केदासे, पोलीस उपनिरीक्षक स्मिता जाधव, पोलीस हेड कॉन्स्टेबल सुकेश केंद्रे यांच्यासह अन्य पोलीस कर्मचारी आणि होमगार्ड सहभागी होते.

# औसेकर विकासासोबतच राहणार : पाटील

**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, ३० नोव्हेंबर :** औसा शहरात १०० खाटांचे अत्याधुनिक पाचमजली उपजिल्हा रुग्णालय उभारून अभिमन्यू पवार यांनी आरोग्य सुविधेत ऐतिहासिक वाढ केली आहे. त्याचबरोबर तालुक्यात शेतरस्त्यांचे विस्तृत जाळे विणले आहे. शहरातील अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा योजना अशी अनेक विकासकामे पूर्ण करण्यात आली आहेत. त्यामुळे मत मागण्याचा नैतिक व विकासाधिष्ठित अधिकार आमच्याकडे अधिक आहे.असे मत माजी मंत्री व भाजपाचे जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील यांनी भाजप-शिवसेना-रिपाई महायुतीच्या अधिकृत उमेदवार डॉ. ज्योती महादेव बनसुडे यांच्या प्रचारार्थ सभेत व्यक्त केले.

जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील म्हणा-ले, विकासातूनच औशाची स्वतंत्र ओळख राज्यात निर्माण झाली आहे.त्यामुळे ही निवडणूक विकासाची आहे. विरोधकांनी आरोप-प्रत्यारोप न करता आपण पदावर असताना लोकांसाठी कोणती कामे केली, यावर बोलावे. आम्ही विकासाची कामे मांडतो तेव्हा लोक आम्हाला पुन्हा पुन्हा संधी देतात.

आमदार अभिमन्यू पवार यांनी आपल्या पदाला खऱ्या अर्थाने न्याय देत मोठ्या प्रमाणात मूलभूत सुविधा आणि विकासनिधीतून प्रकल्प उभारले. त्यामुळे औसा आज झपाट्याने प्रगती करत आहे. औसेकर नेहमीच विकासाच्या बाजूने उभे राहिले आहेत आणि या निवडणुकीतही उभे राहतील, असा ठाम विश्वास माजी मंत्री बसवराज पाटील यांनी व्यक्त केला. महायुतीचे उमेदवार नगरपरिषदेत निवडून आल्यास यापेक्षाही मोठी विकासकामे उभी राहतील, असे त्यांनी यावेळी सांगितले. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ. ज्योती बनसुडे, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नगर-सेवक पदाचे सर्व उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**शहराच्या विकासाला वेग देण्यासाठी संधी द्या : आ. पवार**

विरोधकांकडे विकासावर बोलण्यासारखा एकही मुद्दा नाही. यामुळे निवडणूक जातीवर खेचण्याचा प्रयत्न करत आहेत. मतदारांची दिशाभूल करण्यासाठी आमिषे दाखवून त्यांना गोंधळवण्याचे काम विरोधकांकडून सुरू आहे. मात्र औशाची जनता सुजाण आहे आणि ती विकासालाच साथ देईल, जातिभेदाचे राजकारण जनता कधीच स्वीकारणार नाही. तुम्ही मला आमदार म्हणून सहा वर्षांपूर्वी संधी दिली आणि मी त्या काळात तालुक्याचा कायापालट केला.याचप्रमाणे शहराच्या विकासाला वेग देण्यासाठी संधी द्या आसे आवाहन आ. अभिमन्यू पवार यांनी यावेळी केले.

# उदयगिरी महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा



**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ३० नोव्हेंबर :** येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त भारतीय संविधानावर आधारित सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात आले. या परीक्षेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. गुणानुक्रमे मुंडकर अपेक्षा दत्तात्रेय यांनी प्रथम, केंद्रे नेहा विष्णू यांनी द्वितीय, तर आदित्य अनिल सोमवंशी यांनी तृतीय क्रमांक मिळवून यश संपादन केले. विजेत्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के आणि दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुरेश लांडगे यांच्या हस्ते संविधानाच्या उद्देशपत्रिकेची प्रत देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन लोकप्रशासन विभागाचे प्रमुख डॉ. गौरव जेवळीकर यांनी केले. यावेळी प्रा. स्वामी फुलवळकर, प्रा. संजय बिबीनवरे तसेच प्राध्यापक उपस्थित होते.

# महावितरणच्या कारभाराविरोधात रयत क्रांती'चे हलगी आंदोलन

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, ३० नोव्हेंबर :** शिरूर अनंतपाळ तालुका विज मंडळ कार्यालयातील झोपेचे सोंग घेतलेल्या कर्मचाऱ्यांना जागे करण्यासाठी रयत क्रांती संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष शिव-ाजीराव समर्थ पेटे यांच्या नेतृत्वाखाली तालुका कार्यालयासमोर प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराच्या विरोधात उलटी हा-लगी वाजवून तब्बल तीन तास आंदोलन करण्यात आले.

तालुका विज मंडळ कार्यालयाकडून तालुक्यातील येरोळ, लक्कडजवळगा, हिप्पळगाव, आरी, रापका, उमरदरा, थेरगाव,साकोळ, तळेगाव, कानेगाव सह सर्व गावांमध्ये घरगुती विज वापर करणाऱ्या ग्राहकांना विनाकारण ग्राहकाची




आर्थिक लुट करण्याचा चंग विजमंडळाने बांधला असून घरगुती ग्राहकांना आवरेज विज बिल देणे,विज मीटर सुरुळीत चालू असताना फॉल्टी आहे म्हणून नवीन स्मार्ट विज मीटर बसवून ग्राहकांना अधिकचे विज बिल देऊन बेसुमार लुट केली जात आहे. यामुळे सर्व सामान्य ग्राहक मेटाकुटीला आला आहे. विज मंडळाकडून मागील चार महिन्यांपासून अधिकचे आ-वरेज दिलेले विज बिल रद्द करावे,व स्मार्ट विज मीटर बसवलेले काढून घेऊन जावे,विज आकार ४रु२८ पैसे पर युनिट असताना अगाऊ चार्जेस लाऊन करण्यात आलेली लुट थांबवावे.या व इतर मागण्या आंदोलकाकडून मागण्यासाठी आंदोलन करण्यात आले आसता या आंदोलनाला विज मंडळाचे उपअभियंता मुजाहिद सिद्दीकीने आंदोलक ग्राहकांना आंदोलन मागे घेण्याची विनंती करित लेखी पत्रातून मागण्याची पुर्तता करण्याची हमी दिले.

दिलेल्या पत्रात नुमुद केले आहे की, स्मार्ट विज मीटर वरिष्ठांना कळवून काढून घेण्याची कार्यवाही करु,चार महिन्यांपासूनचे आवरेज बिल दिले ती जवाबदारी महावितरणची असून ते बिल रद्द करुन दिले जाईल. यापुढे स्मार्ट मीटर बसविणे थांबविण्यात येईल असे लेखी दिल्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.

यावेळी आंदोलनात सहभागी हणमंत चामले, विनोद कुंभार, गोविंद मादळे,बालाजी कुंभार,बालाजी पांचाळ, माधव झरकर, संदीपान भांगे,महादेव लिंबापुरे, रामदास गायकवाड, अण्णाराव जाधव, रामदास पेटे यांच्या सह शेकडो विज ग्राहक नागरिक उपस्थित होते.



# होंडाळा खंडोबा यात्रेत जंगी कुस्त्यांचा थरार

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, ३० नोव्हेंबर :** येथुन जवळच असलेल्या होंडाळा येथील खंडोबा देवाच्या यात्रेच्या निमित्ताने जंगी कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते. या यात्रेनिमित्त कुस्त्यांचे आयोजन समस्त गावकरी करतात. पहिली कुस्ती ५० रुपये ते शेवटची कुस्ती ५ हजार १५१ रुपयांची झाली. या कुस्तीच्या मैदानात अनेक गावचे पैलवान उतरले होते. यात परभणी, नांदेड, लातूर, हिंगोली, बीड, धाराशिव, संभाजीनगर, सातारा, सांगली या जिल्ह्यासह कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा राज्यातील पैलवान उतरले होते.

अनेक पैलवान जिंकून आपल्या गुरुला नमण करून आनंदोत्सव साजरा करत होते. तर तुरळकच पैलवानांना बोरोबरीत कुस्ती सोडण्याचा निर्णय पंचांनी घेतल्यामुळे प्रेक्षकांच्या नाराजीच्या प्रतिक्रिया ऐकायला मिळत होत्या. शेवटची कुस्ती लातूर जिल्ह्या-तील नळेगाव येथील पै.अयुब शेख यांनी परभणी येथील रमेश तुडमे यांना चित्तपट करून पाच हजार एकशे एकावन्न रुपयांची कुस्ती खेळुन जिंकली. त्यामुळे होंडाळा नगरीचे सरपंच उमाकांत येंडे, उपसरपंच संदीप सुर्यवंशी, दिगांबर सोनटक्के, कल्याण सुर्यवंशी, गोलंदाज सोनकांबळे, बाबुराव फसमल्ले, शिवा महार-ाज सांगवीकर, शिवाजी पाटील, नामदेव गुडमे यांनी यथोचित सन्मान देवून पै. अयुब शेख याचा सत्कार करण्यात आला. यांच्या सहकार्याला रामराव कोंडामंगले, भगवान सोनटक्के, बसवेश्र्वर पाटील, बालाजी कोंडामंगले, भाजपा शाखा अध्यक्ष रमाकांत चाकोरे सह इत्यादी कुस्ती प्रेमींनी परिश्रम घेवून कुस्त्यांचे आयोजन केले होते.

# शिरूर अनंतपाळ तहसीलमध्ये संविधान दिन

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, ३० नोव्हेंबर :** दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ रोजी शिरूर अनंतपाळ तहसील परिसरात तालुका विधायक कृती समितीच्या वतीने संविधान दिन उत्साहात आणि शिस्तबद्धपणे साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका विधायक कृती समितीचे अध्यक्ष प्रा. राम काकडे होते. यावेळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक रमेश सोनवणे यांनी करताना संविधानाचे महत्व, त्याची आजच्या काळातील गरज आणि त्यातील मूलभूत तत्त्वांचा उहापोह केला. प्रा. राम काकडे यांनी संविधानावर सविस्तर प्रकाश टाकला.कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांमध्ये हिपळगावचे सरपंच ज्ञानोबा माऊली, पत्रकार रहीम पाटील, माजी सभापती उद्धव जाधव, उत्तम कदम, निवृत्ती सूर्यवंशी, माधव कुंडे, नागनाथ कांबळे, उजेड, सुभाष कांबळे, सचिन गायकवाड आदींचा समावेश होता.

# कलापंढरीच्या वतीने बालकांची अभ्यास सहल

**त.भा. वृत्तसेवा,**

**रेणापूर, २९ नोव्हेंबर :** बालकांना बाल संरक्षण यंत्रणाची माहीती व्हावी तसेच विधी सेवा प्राधिकरणाचे कार्य माहीती व्हावे तसेच विज्ञान ही एक चळवळ असल्याची जाणिव व्हावी म्हणून कलापंढरी सामाजीक संस्थेच्या वतीने बालकांची जिल्हा स्तरीय अभ्यास सह-लीचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष बी पी सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २८ नोव्हेंबर रोजी लातूर येथील विधीसेवा प्राधिकरण, बालकल्याण समिती, बालन्याय मंडळ आणि स्टेम एज्यूकेशन सेंटरला या ठिकाणी आयोजन करण्यात आले होते.

या वेळी अनेक जणांना विधी सेवा प्राधिकरण यांच्याकडून मोफत कायदेशीर मदत मिळते या मध्ये स्त्री, पुरुष, बालक, दिव्यांग व्यक्ती, तस्करीचा बळी, कैदी, अनूसुचीत जातीचा, अनुसुचित जमातीचा, औद्योगीक



कामगार, आपत्ती, जातीय किंवा अनुसुचित जमातीचा सदस्य आदी या विधिसेवा प्राधिकरणाकडून मिळत मिळवू शकतात अशी माहीती दिली.

या नंतर विज्ञान प्रयोग शाळेला भेट देऊन ग्रह, उपग्रह, तारे, तारांगण आदी विषयी सविस्तर माहीती करुन घेतली. विशेषता: या प्रयोग शाळेत आकाशीतील चंद्राविषयी सविस्तर माहीती घेतली. विज्ञानाची चळवळ ही सर्वांपर्यंत गेली पाहीजेत आणि त्याचा उपयोग विशेषतः विद्यार्थांना व्हावा म्हणून ही या ठिकाणी प्रयोग शाळेची पहाणी करुन सविस्तर माहीती प्रयोग शाळेतील तानाजी कदम यांनी विद्यार्थांनी दिली. बालकल्याण समितीच्या सदस्या स्वाती तोडकरी यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. या जिल्हा स्तरीय अभ्यास सहलीसाठी पानगाव,बिटरगाव, वडवळ, नांदगाव आदी सह अनेक गावांतील किशोर व किशोरी सहभागी झाल्या होत्या. यशस्वीतेसाठी मंगल मगर, सुनैना ठाकूर, जयवंत जंगापल्ले, धनराज पवार, मधुकर गालफाडे, फरहाना शेख, सुप्रिया रामदासी, सोनी ढेंपे, संध्याराणी गालफाडे आदींनी परीश्रम घेतले.

# शिवलिंगेश्वर फार्मसीचे संशोधन स्पर्धेत यश

**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, ३० नोव्हेंबर :** औसा तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयातील बी. फार्मसी व फार्म. डी च्या विद्यार्थ्यांनी स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ आयोजित विद्यापीठस्तरीय विद्यार्थी संशोधन अधिवेशन अन्वेषण संशोधन प्रकल्पात सहभाग नोंदवुन प्रभावीपणे सादरीकरण केले.त्यामध्ये विद्यार्थ्यांनी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे मानांकन मिळविले आहे. स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. डॉ. अशोक महाजन नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, डॉ. एस.एस. पेक्कमवार, डॉ. एच.एस. फडेवार, डॉ. वसंत वाघ, डॉ. बाबुराव जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. भारतीय विद्यापीठाच्या वतीने देशभर राबविण्यात येणारा अन्वेषण उपक्रम विद्यार्थ्यामध्ये संशोधन संस्कृती जोपासण्यासाठी अत्यंत प्रेरणादायी ठरत असल्याचे मत कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांनी व्यक्त केले. शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीच्या विशाल वाडेकर, अचल मुलगीर, गौतम दुर्गम, सोफिया पठाण, अस्मिता इंगळे, गायत्री वाघमारे, साक्षी चामे, संजीवनी फुले, मयुरी थोटे, संजना गुप्ता, अजीज बागवान या विद्यार्थीनी संशोधन प्रकल्पाचे सादरीकरण करुन प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे मानांकन मिळविले.

# लाल बहादूर शास्त्री विद्यालयातील खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ३० नोव्हेंबर :** येथील लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयातील खेळाडुंची राज्यस्तरीय स्पर्धे साठी निवड झाली आहे.महाराष्ट्र खो - खो असोसिएशनची ५१ वी कुमार - मुली राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा बुऱ्हाणनगर जि.अहिल्यानगर येथे दिनांक ४ ते ७ डिसेंबर २०२५ या कालावधीत संपन्न होणार आहे. या स्पर्धेत ला-तूर जिल्हा खो-खो असोसिएशनचा संघ सहभागी होणार आहे. त्यापूर्वी लातूर येथे लातूर जिल्ह्याची निवड चाचणी घेण्यात आली असून या निवड चाचणीमध्ये लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयातील कु.भाग्यश्री निलेवाड चि.नागेश जंगमवाड, चि.वेदांत येनगे यांची निवड झाली आहे.



या खेळाडुंना क्रीडाशिक्षक संतोष कोले यांचे विशेष मार्गदर्शन लाभले आहे.

या यशस्वी खेळाडुंचे स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार कार्यवाह शंकरराव लासूणे शालेय समितीचे अध्यक्ष सतनप्पा हुरदळे मुख्याध्यापक संजय कुलकर्णी उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर पर्यवेक्षक कृष्णा मारावार किरण नेमट माधव मठवाले यांसहित सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# महापरिनिर्वाण दिनी पानगावात उसळणार भीम अनुयायांचा जनसागर!

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ३० नोव्हेंबर :** पानगाव ता. रेणापुर जिल्हा लातुर येथे बौद्ध अनुयायी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र अस्थी कलशाला अभिवादन करण्याकरिता दर ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिनी मराठवाडयासह सिमावर्ती आंध्र प्रदेश, तेंलगना, कर्नाटक भागातुन लाखों आंबेडकरी आनुयांयी अभिवादनाकरिता येत असतात येणाऱ्या अनुयांयीची संख्या दरवर्षी वाढत जात असल्याने येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक ट्रस्टच्या वतीने येणाऱ्या अनुयांयीची अभिवादनाची गैरसोय होऊ नये म्हणून जय्यत तयारी केली असुन विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

६ डिसेंबर १९५६ रोजी बहुजणांचे मुक्ती दाते महामानव पं.पु.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दिल्ली येथे महापरिनिर्वाण झाले.आंबेडकरी अनुयांयीसह सारा देश शोकसागरात बुडाला. बाबासाहेबांच्या निर्वाणाची बातमी आकाशवाणी रेडीओ वरून प्रसारीत करण्यात आली. ही दुखःद बातमी पानगांव ता.रेणापूर जि.लातूर येथील

लिंबाजी आचार्य, दगडू आचार्य, प्रभाकर आचार्य, किशन आचार्य, वैजनाथ आचार्य, सुर्यभान आचार्य, यादव आचार्य यांना कळताच बाबासाहेबाचे अंतिम दर्शन घेण्या करिता मुंबईला गेले होते. येताना त्यांनी तेथील अस्थी पानगांवात आणल्या त्याच अस्थीनां अभिवादन करण्यासाठी दर ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिनी




लांखो आनुयांयी उपस्थित रहातात. येणाऱ्या अनुयांयीची गैरसोय होऊ नये म्हणुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक ट्रस्टच्या वतीने जय्यत तयारी केली गेली आहे. त्याचप्रमाणे खालील प्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आहे. दि.६ डिसेंबर रोजीच्या ००.०१ मिनिटाला अस्थी कलशास पुष्पचक्र अर्पन (भंदत डॉ.उपगुप्त महाथेरो, भंदत पय्यानंद थेरो हे सामुहिक पंचशिल-त्रिशरण, बुद्धवंदना घेवुन अभिवादनाची सुरवात करतील.) मा. मिना-ताई मोटाडे (सरपंच पानगाव) यांच्या हस्ते सकाळी १०.०० वा. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे ध्वजारोहन (निळा ध्वज अर्ध्यावर) करण्यात येईल. प्रशांत थोरात (रेणापुर तह-सीलदार) यांच्या हस्ते सकाळी १०.४० वाजता डॉ.आंबेडकर नगरात असलेल्या अस्थी कलशा जवळ ध्वजारोहन पार पडणार आहे.

दुपारी अस्थी स्थळावरूनच भिक्कू संघ धम्म देसना देणार आहेत. रात्री ९.०० वाजता अस्थी स्थळी परिसरातील विविध कला संचाचा भिम गितांचा कार्यक्रम होणार असल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक ट्रस्टचे भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो (अध्यक्ष) भदंत पय्यानंद थेरो, आबासाहेब चव्हाण, व्ही.बी. आचार्य (सचिव), एन. एल. आचार्य (उपाध्यक्ष), सुर्यभान आचार्य (अस्थी आणणारे) डी. एन. आचार्य (सहसचिव), पी. आर. रोडे (सहसचिव), के. ई. हरीदास, आयु. डि.बी. आचार्य, सुभाष आचार्य, गोरोबा आचार्य, जे.सी. पानगांवकर, किशोर आचार्य, ना-गनाथ चव्हाण, विष्णु आचार्य, पंडीत आचार्य, आयु. सुकेश भंडारे, गौतम आचार्य, क्षितीज रोडे, तुकाराम कांबळे, रमेश तिगोटे, नारायण आचार्य, रत्नराज आचार्य, रणजित आचार्य, महेंदकुमार आचार्य, विश्वजीत आचार्य, आण्णाराव आचार्य, किसन चव्हाण, भानुदास आचार्य, तुकाराम कांबळे, आयु. राजकुमार साळवे, गौतम गोडबोले, सत्यशिला आचार्य, प्रजावती आचार्य यांनी कळविले आहे.